
# माणूस



एक सप्टेंबर १९६४ : किंमत ५२ पैसे




जनता अंकाच्या यशस्वी
प्रयोगातून 'माणूस'
आता नवे स्वरूप घेत
आहे सप्टें. ६४ पासून
हे पहा ठळक बदल:

किं. ५२ न.पै.
नवा सोयीस्कर
सुटसुटीत आकार
महिन्यातून दोन
वेळा प्रकाशन

अधिक तपशील
बाजूचे पानावर

# सप्रेम नमस्कार

पावसाची सुरुवात गडगडाटाने झाली नाही तरच चुकल्यासारखे होते. पीक उगवते ते मात्र आवाजाशिवाय. फूल फुलावे तसे. म्हणूनच ' माणूस 'चा २५ पैसे किमतीचा ऑगस्ट जनता-अंकाचा प्रयोग गडगडाटासह झाला. पण हा ५२ पैसे किमतीचा ' माणूस 'चा नवा उपक्रम प्रसिद्धीची कुठलीही पूर्वयोजना न करता या अंकापासून सुरू होत आहे. सर्वसाधारणपणे ४८ ते ५६ च्या आसपास पृष्ठांच्या मराठी मासिकाची एक रुपया ही किंमत अलिकडे रुढ झालेली आहे. पृष्ठसंख्या ४८ पेक्षा कमी न करता किंमत मात्र पन्नास टक्क्यांनी खाली आणण्याचा हा ' माणूस 'चा उपक्रम एकाच हेतूने केला आहे, कीं यापुढे हा अंक अधिकाधिक मराठी कुटुंबात जावा.

किंमत कमी करणे हे ' माणूस 'ने आपल्या विकासासाठी उचललेले पहिले पाऊल आहे. याच अंकापासून उचलले जाणारे दुसरे पाऊल म्हणजे ' माणूस 'चे महिन्यातून दोन वेळा होणारे प्रकाशन. ' माणूस ' मध्ये केवळ ललित साहित्य येत नाही. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक विषयांशीं प्रथमपासूनच ' माणूस ' निकटचा संबंध ठेवून आहे. हा संबंध अधिक स्पष्ट व्हावा, सर्व क्षेत्रात सध्या वेगाने बदलणाऱ्या परिस्थितीचा व प्रवाहांचा अधिक उत्कटपणे ' माणूस'ला परामर्ष घेता यावा यासाठी प्रकाशनाची कालमर्यादा कमी करणे अवश्य वाटले. यामुळे अतिपरिचयाचा धोका टाळूनहि ' माणूस'मधून येणाऱ्या साहित्यात अधिक ताजेपणा व जोम येईल, वाचक-संपादक-लेखक यांचे संबंध अधिक जिव्हाळ्याचे होतील अशी आशा आहे.

कमी किंमत, महिन्यांतून दोन वेळा होणारे प्रकाशन, याशिवाय तिसरीहि एक सुधारणा अभिप्रेत आहे. सध्याचे धावपळीचे जीवन ध्यानात घेता ' माणूस'चा आकार अधिक सुटसुटीत करता आला तर पाहावा या दृष्टीने ही सुधारणा योजली आहे. चालू आकारात ४८ पृष्ठे दिली काय किंवा सध्याच्या चालू आकाराच्या निम्म्या आकारात, दुप्पट म्हणजे ९६ पृष्ठे दिली काय, हिशोब एकच; उलट उभयपक्षी सोय अधिक. अर्थात् याबाबत ' माणूस ' विशेष आग्रह धरणार नाही. वाचकांना चालू आकारच अधिक सोयीचा वाटतो असे आढळून आले, तर याबाबत फेरफार, तडजोड करणे केव्हाहि शक्य आहे.

तेव्हा ' माणूस'चा पुढील अंक दि. १५ सप्टेंबरला प्रसिद्ध होईल. त्याची किंमत ५२ पैसे व पृष्ठसंख्या सरासरी ९६ ते १०४ राहील. वार्षिक वर्गणी आहे तीच कायम, म्हणजे रुपये दहा केवळ.

दरमहा प्रसिद्धी : दिनांक १ व १५.

वाचकांनी ' माणूस'च्या या उत्क्रांत व स्थायी स्वरूपाविषयी आपले अनुकूल प्रतिकूल अभिप्राय कळविल्यास आभारी होऊ.

आपला स्नेहांकित
**श्री. ग. माजगावकर**
संपादक, ' माणूस '

वर्ष चौथे : अंक चौथा

★

सप्टेंबर १९६४ : बावन्न पैसे

★

संपादक : श्री. ग. माजगावकर

★

पत्ता : ४१९ नारायण, पुणे २

दूरध्वनी : ५७३५९

१. **वर्गणीदारांस सूचना** : दीपावली व सर्व खास अंकासह माणूसची वार्षिक वर्गणी दहा रुपये व परदेशी पंधरा रुपये आहे.

२. **वर्गणी मनीऑर्डरने** यावी. चेक पाठवायचा झाल्यास तो 'व्यवस्थापक माणूस मासिक' या नावे पुणे किंवा मुंबई बँकेवरचा असावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा असल्यास ७५ न. पै. वटणावळ पाठवावी.

३. **अंक न पोचल्याचे** कळवावयाचे झाल्यास ५ तारखेपर्यंत वाट पाहून मगच कळवावे. अंक आमचे कार्यालयात शिल्लक असल्यास जरूर पाठविला जातो.

४. **लेखकासाठी** : स्वीकृत साहित्याचाच फक्त निर्णय कळविला जातो. नापसंत साहित्याचा निर्णय व ते परत हवे असल्यास पुरेसे पोस्टेज सोबत पाठविणे अत्यावश्यक आहे.

५. प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे सर्व हक्क स्वाधीन.

६. या मासिकात व्यक्त झालेली मते 'माणूस' मासिकाच्या चालकांची अविकृत मते असतातच असे नाही.

७. **जाहिरातीचा व्यवहार** हा परस्पर विश्वासाचा असतो. गिऱ्हाइकाच्या इच्छेनुसार जाहिरात छापण्याचा आटोकाट प्रयत्न केला जातो. तरीही काही तांत्रिक अडचणीमुळे जाहिरातीत कमी जास्त फरक झाला तर त्याची जबाबदारी व्यवस्थापकांवर नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि. ३८३ नारायण पेठ पुणे, येथे छापून ४१९ नारायण पेठ पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.



## स्वरूप दर्शन

व्यक्ती आणि वार्ता :

● प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री

कथा :

● गोष्ट नसलेली गोष्ट

☐ आनंद फुले

● कावळा

☐ प्रल्हाद पांढारकर

ललित लेख :

● बाबीयार प्रसिद्ध होते....

☐ रतनलाल भंडारी

● छत्री

☐ सौ. शकुंतला फडणीस

कविता :

● चंद्रकांत पाटील, सुधा जोशी

गोविंद कुलकर्णी, राजा महाजन

पुस्तकपरिचय :

● नाझी भस्मासुराचा उदयास्त

☐ रा. म. शास्त्री

विविध विषय विभाग :

● रंगभूमी : मंतरलेले पाणी

● चित्रपट : श्रीमान बाळासाहेब

● माहितीपूर्ण चौकटी, पत्रव्यहार, इत्यादि

सजावट :

● मुखपृष्ठ : दत्ता महाबळेश्वरकर

● आतील रेखाटणे : सहस्रबुद्धे

*ऑगस्ट अंकाचे मुखपृष्ठावरील जाहीर केलेल्या स्पर्धेचा निर्णय पुढील अंकात देण्यात येईल.—सं.*

# शिव्या आणि ओव्या

स. न. ८–७–६४

येत्या ऑगस्टचा 'माणूस'चा जनता विशेषाक व त्याची विक्रीची आपण ठेवलेली अत्यल्प किंमत पाहून सामाजिक क्राती एका नव्या प्रकर्षाने उदयाला येत आहेसे वाटते. मराठी साहित्यात मासिकाची बाडगुळे झपाट्याने वाढत आहेत. त्यात व्यवस्थापकाचा अर्थार्जनाव्यतिरिक्त अन्य हेतू आढळत नाही. साहित्याला व्यापाराची सफेती चढत आहे. मराठी समाजाची साहित्यिक अभिरुची विकृतीच्या खाईत लोळण घेऊ पाहात आहे.

अशा स्थितीत 'माणूस'ने मराठी साहित्याचा स्वतंत्र बाणा आणि सदभिरुची तेवत ठेवण्याचा सकल्प केलेला आहे हा महाराष्ट्र सरस्वतीला शुभशकुनच आहे असे मी समजतो. 'माणूस' मराठी मनातील विकृत अभिरुचीची तणे मुळासकट काढून टाकण्याचा प्रयत्न करील व त्यात परमेश्वर आपणास यशस्वी करो हीच सदिच्छा !

**भास्कर गिरिधर राणे, अमरावती**

[आमच्या अंकाविषयी आपण जी सद्भावना व्यक्त केलीत त्याची आम्हाला निकड आहेच. परतु असे करताना मराठी मासिकाविषयी आपण जे सरसकट विधान केलेत ते आम्हांला मान्य नाही. मराठी साहित्यात, किर्लोस्कर 'रत्नाकर', 'वाङमयशोभा', 'अभिरुची', 'सत्यकथा', 'हस', 'दीपावली' ही परंपरा सदभिरुचिसंपन्नच आहे. सूर्यावर देखील अधूनमधून अभ्रे ही यायचीच ! सं ]

२९–६–६४

**व्यवस्थापक, 'मानुस' मासिक कार्यालय**

स. न. वी. वी.

आपली क्रांती अकाची (पधरा ऑगष्टच्या) जाहिरात वाचून व आपले पत्र वाचून अत्यत आनंद झाला. आपल्या या जुलै महिन्याचा ही 'माणूस'चा अंक गौरव करण्यासारखा निघाला. आपल्या प्रकाशनाला "अभीष्ट" चिंतुन मी आपल्या अपेक्षेबाहेर मागणी करीत आहे. मी ऑगष्ट विषेशांकाची आतुरतेने वाट पाहात आहे. त्या अकाच्या स्वागतासाठी अंक येण्याच्या वाटेकडे डोळे लावून बसलो आहे. कृपया ऑगस्टचे माणूस विषेशाकाच्या २५ प्रती पाठवून उपकृत कराल असी अपेक्षा बाळगुन आहे.

आपला विश्वासू
**वि. भा. चिंचणे.**
बुकसेलर, परभणी.

[आपल्याप्रमाणे आमच्या सर्व विक्रेत्यानी उत्स्फूर्त सहकार्य दिले म्हणूनच जनता अकाचा आमचा प्रयोग यशस्वी झाला. जुलै ६४ च्या अंकाची वाढती मागणी आम्ही पुरी करू शकलो नाही, व ऑगस्ट ६४ अकाचे स्वागत वाचकानी उत्तम केले. असख्य विक्रेत्यानी आम्हाला मधला दुवाही दिला. असाच कृपालोभ असू द्यावा. स.]

स. न. १०–८–६४

आपला आजच प्रसिद्ध झालेला जनता विशेषांक ऑगस्ट १९६४ चा वाचला. वाचून फार आनंद झाला. एवढा स्वस्त व भरपूर मजकूर असलेला अक फक्त आपणच दिला. शतशः धन्यवाद. 'माणूस' चिरायु होवो ही सदिच्छा.

'सगम'चे परीक्षण वाचले. गेले २।३ महिने अनेक पत्रातून त्याचा उदोउदोही वाचला. काही पत्रात मामुली निर्भीड परीक्षणे वाचली. पण आपल्याइतके निर्भीड, मार्मिक, सडेतोड परीक्षण प्रथमच व फक्त आपल्या 'माणूस' मध्येच वाचायला मिळाले. आपल्यासारखी काही निर्भीड, सडेतोड परीक्षणे करणारी पत्रे निघाल्यास भारतीय चित्रपटसृष्टी हा हा म्हणता सुधारेल व जनता आपणास धन्यवाद देईल. पुन्हा अभिनंदन.

**भय्यासाहेब नगरकर**
सोलापूर

['निर्भीड परीक्षणामुळे चित्रसृष्टी हां हां म्हणता सुधारेल' या आपल्या स्वप्नाशी आम्ही सहमत नाही. हिंदी चित्रपट भारतवर्षात प्रत्येक गावी दाखवले जातात. प्रत्येक गावात किमान दोन तीन आठवडे पुरतील एवढे 'फिल्मी' साप्ताहिक-पाक्षिकाचे वाचक-कम-प्रेक्षक असतातच. मग, करा हिशेब ! तरी धदा बुडीत नाही ! ! सं.]

स. न. १२–८–६४

आपला 'माणूस' चा ऑगस्टचा जनता विशेषाक वाचला. अल्प किमतीत भरपूर मजकूर देण्याचा प्रयत्न अभिनदनीय वाटला. त्यातल्या 'संगम' चित्रपटाचे मार्मिक परीक्षण खूपच आवडले. तसेच 'वाहतो ही दुर्वांची जुडी' या नाटकाचे परीक्षण खूपच समाधानकारक वाटले. अशाच तऱ्हेने आपण नेहमी लिहीत राहाल तर आपली प्रगती झपाट्याने होईल यात शका नाही.

**शशिकांत देशपांडे**
सोलापूर

[आमच्या प्रगतीची मदार असख्य क्षेत्रांतील मूर्खपणावर अवलंबून राहावी हे फारसे सुखदायक नाही. फक्त 'आलिया भोगासी' म्हणून प्रसगी परखड लिहावे लागते. –सं. ]

स. न. १६–८–६४

'माणूस' चा जनता विशेषाक वाचला. माफक किंमतीत दर्जेदार साहित्य वाचकाला द्यावयाच्या आपल्या या स्तुत्य प्रयोगाबद्दल आपले अभिनदन ! प्रत्येक अकात मजकूर नेहमीचाच पण वर मात्र " ××× विशेषाक " म्हणून प्रसिद्ध करावयाचे व अकाची किंमत वाढवावयाची असे नेहमीच चालू असते. अशा या " विशेषाक युगा "त आपला 'जनता विशेषाक' उपक्रम खचितच कौतुकास्पद आहे

रमेश के. सहस्रबुद्धे. पुणे

[जनता विशेषाकाची किंमत वस्तुतः एक रुपया पचवीस पैसे आम्ही ठेवणार होतो ! परंतु अकाच्या घाईगर्दीत फक्त पचवीस नये पैसे किंमत छापली गेली. जाऊं द्या ! उरलेल्या एका रुपयात आम्ही जी उदड सदिच्छा मिळविली तेवढी शिदोरी आम्हांस पुरे आहे –स. ]

स. न. १८–८–६४

अत्यत आतुरतेने ज्या अकाची वाट पाहात होतो तो अखेर मिळाला. सुयोग्य नि समर्पक शब्दाच्या शोधात मी सुद्धा असल्यामुळे आपल्या अभिनंदनाचा बेत तूर्तास पुढे ढकलते.

या अंकातील ' काळदरीचे काळीज ' ही कथा खरोखरच काळजास भिडली. कलिजाचा कब्जा किती थोड्या अवकाशात तिने घेतला. वेचक प्रसंगाना सजविणारे अर्थपूर्ण शब्द व भाववाही भाषा यांमुळे ही कथा अतिशय साजिरी झाली आहे. चांगल्या कथाबीजाला योग्य निवेदनाचे कोंदण लाभत नाही—हा नित्याचा अनुभव ! म्हणूनच अशा कथांची अपूर्वाई वाटते.

आपल्या ह्या अंकात श्री. चंद्रशेखर मराठे यांचा ' आपल्या स्वातंत्र्याची वाटचाल ' हा लेखही मानाचे स्थान पटकावून बसला आहे. त्यांच्या लेखाला प्रज्ञा व प्रतिमा या दोघींचा स्पर्श झाल्यामुळे, वाचकाना एकदम प्रभावित करण्याचे सामर्थ्य प्राप्त झाले आहे.

गेले दोन महिने आपल्याला धन्यवाद द्यावयाचे, असे मनाशी ठरवीत होते. शेवटी ह्या पत्रात त्याला मुहूर्त लागला. ' नाझी भस्मासुराचा उदयास्त ' हा श्री. रा. म. शास्त्री यांचा लेख म्हणजे माझ्यासारख्या इतिहासप्रेमी लोकांना आनंदाची पर्वणीच आहे. अर्थात् याचे सारे श्रेय William L. Shirar यांना देण्याचे काहीच कारण नाही. केव्हा केव्हा प्रतिबिंब हे मूळ बिंबापेक्षासुद्धा अधिक लोभस असते. त्यातलाच हा प्रकार.

आता आपल्या ' संगम 'च्या परीक्षणासंबंधी म्या पामरे काय बरे लिहावे ? आपले टीकाकार हे मुळी हाताच्या बोटांनी लिहितातच कुठे ? ते उपयोगात आणतात बोटांची नखे ! त्यामुळेच कोणत्याही बऱ्यावाईट कथावस्तूवर रक्त येईपर्यंत ओरखडे काढणे त्यांना सहज शक्य होते. वस्तुतः आपल्या प्रेयसीला आपल्याच मित्राशी लग्न करावयास सांगण्याची कल्पना मराठी मनाला अगदी नवी थोडीच आहे ? श्री. रा. ग. गडकरी यांच्या ' एकच प्याला ' मध्ये भागीरथ शरदला उद्देशून म्हणतो, " माझ्या जीविताची वाटेल ती वाट लागली तरी भाईसाहेबाच्या (रामलाल) सुखाच्या वाटेत मी कधीहि आड येणार नाही...भगीरथ प्रयत्नांनी शरद्च्या प्रेमाचा ओघ भाईसाहेबाकडे वळविला पाहिजे......रामलालच्या सुखासाठी अखिल ब्रह्मांडही ब्रह्मार्पण करणे हा भगीरथाचा एकच धर्म आहे. " गडकऱ्यांप्रमाणे बिचाऱ्या राजकपूरलाही कल्पना नसावी, की त्याग करण्याचा मक्ता फक्त अनॉक ऑर्डेनलाच मिळाला आहे. म्हणून तर राजचा गोपाळ हा अक्षरशः ' गो 'पाळ ठरतो. श्री. बा. सी. मर्ढेकर एके ठिकाणी लिहितातः " आमचे वाङमय परपुष्ट आहे एवढीच केवळ आमची तक्रार नाही; तर ते इतके एकांगी परपुष्ट आहे, की इंग्रजीशिवाय इतर कोणत्याही परकीय भाषेची दखलही घेऊ शकत नाही. " आमचे टीकावाङमयही याच ' भाष्यकाराते वाट पुसतु ' चालत असावे. मराठी वा इतर वाङमयातील तादृश दाखले द्यावयाला इथे कोण लेकाचा इतर वाङमय वाचतो ? Enoch Arden व संगम याच्या तुलनेचा हा प्रयत्न इतका विलक्षण हास्यास्पद आणि भोंगळ वाटतो, की वाचून वैताग आला. राजकपूरला Compliments काय, तर या चित्रपटाची निर्मितीमूल्ये कुठल्याही पाश्चिमात्य चित्रपटाच्या तोडीची राखण्यात त्याने यश मिळविले आहे. खरेच आहे ते, आमचे टीकाकार या भरतभूमध्ये कोठेही असोत, त्यांची ' विशाल ' दृष्टी सदैव त्या तिथेपलिकडे-पश्चिमेकडेच राहणार ! आमची सगळी मोजमापे ' तिकडून 'च तयार होऊन येणार ! ! तिकडच्या फूटपट्ट्यांऐवजी इकडच्या साध्या वितींनी कलाकृतीची उंची ज्या दिवशी आमचे टीकाकार मोजतील तो सुदिनच !

काहीही असो; पर्वताच्या उंचीशी आपला दर्जेदारपणा व श्रेष्ठतेमुळे स्पर्धा करणारे साहित्य व प्रत्यक्ष पाताळाच्या तळाला खाली पहावयास लावील इतकी कमी किंमत या दोन वैशिष्ट्यामुळे ' माणूस 'चा जनता विशेषांक प्रदीर्घ काळ चांगलाच लक्षात राहील. आपले हार्दिक अभिनंदन ! मनःपूर्वक अभिनंदन ! ! अगदी त्रिवार अभिनंदन ! ! !

**मेदिनी**

गिरगाव, मुंबई

[ मासिकातील ज्या साहित्याविषयी आपण स्तुतिपर लिहिले त्याविषयी बोलणे वाढवणे म्हणजे ' चादणे पिकत ' घालण्यासारखे होईल. तेव्हा आपल्या टीकाभागाकडेच एकदम वळू.

' सगम 'ची कथा ही ' इनॉक आर्डेन ' वरून घेतली व त्याचा कवी लॉर्ड टेनिसन् हा इंग्लिश माणूस आहे, या दोन्ही गोष्टी गृहीत आहेत. म्हणून याचा अर्थ चित्रपटावर टीका करताना आम्ही इंग्लिश फूटपट्टी आणली असा नाही. गटे, झोला, गोगोल, टॉलस्टॉय, चेकॉव्ह, फ्लॉऊबर्ट, स्टेंडाल, इब्सेन, झ्वाईग, हेमिंग्वे... यांच्या एखाद्या कथेचे भ्रष्ट रूपांतर केले असते, तरीही आम्ही ' सगम ' निर्मात्याला फैलावर घेतले असते. आमचा स्पष्ट आरोप... ' सगम ' ची कथा ही तर्कशून्य, हास्यास्पद आणि भोंगळ आहे, हा आहे. ही कथा तर्काला पेचात टाकीत नाही, अशी बाजू माडण्याकरता आपण गडकऱ्यांच्या नाटकाचा आधार दिला आहे. स्त्रीच्या प्रेमाचा ओघ हा म्हशीप्रमाणे एका व्यक्तीवरून दुसऱ्या व्यक्तीकडे ढोसकता येतो, असे गडकऱ्याच्या पात्राने कुठे म्हटले असले तरी तेही टीकाविषय होऊ शकते. तर्कशून्य विधाने ही नाटकाच्या रंगमंचावर सुललित भाषेत उच्चारली गेली तर ती नाटकगृहाच्या बाहेर पडेपर्यंतच हास्यास्पद वाटत नाही ! ' संगम '-वरील टीकेचा आमचा रोख या चित्रपटातील वातावरण, आशय हे सर्व तर्कशून्य आहे या बाजूवर आहे. मोराच्या पिसाऱ्यावरील डोळयाना ' दृष्टिशून्य ' म्हटल्याने टीकाकारावर कुणी रागावू नये ! ' संगम ' चा हा मोर चागला नाचतो...छान दिसतो... कदाचित तो आजचा राष्ट्रीय पक्षीही असेल. पण शेवटी तो मोरच. गरुड नव्हे हे ध्यानात असावे.

तुम्ही आमच्या परीक्षणाला डिवचून आमचे विचार अधिक सुस्पष्टपणे ठेवण्याची सधी दिलीत यावद्दल मन पूर्वक आभार. असाच लोभ ठेवावा. आपली पत्रे आम्हाला आवडतात. सं. ]

**प्रिय महाशय** २४–८–६४

आपल्या मासिकाच्या दि. १५ ऑगस्ट १९६४ च्या अकात माजी महापौर श्री. शिवाजीराव ढेरे यानी एक लेख लिहिला आहे. त्यामधे पृष्ठ क्र. १३ वर त्याचे लेखाचे शेवटी—" आणि नंतर जनसंघाचे एक प्रमुख नेते श्री. गो. प्र. भागवत तथा आप्पासाहेब भागवत यानी नवीन सभागृहामध्ये हे मोटार प्रकरण चर्चेस आले असता स्पष्ट सागितले की या मोटार प्रकरणाचा आम्ही निवडणुकांतील स्टंट म्हणून उपयोग केला ही आमची चूक होती. " असा मजकूर श्री. ढेरे यानी आपल्या लेखात घुसडला आहे.

या मजकुरामुळे माझेविषयी विनाकारण गैरसमज होण्याचा संभव आहे. म्हणून त्यासबधी माझे म्हणणे असे की, वरील

मजकूर संपूर्णत: असत्य आहे. त्याप्रमाणे मी वरील सभागृहामध्ये अगर कोठेही बोललो नाही. सभागृहात महानगरपालिकेतर्फे लघु-लेखक उपस्थित राहून शब्दशः वृत्तांत लिहून घेत असतात व तो वृत्तांत छापून प्रत्येक सभासदाकडे पाठविला जातो व नंतर तो पुढील सभेमध्ये कायम होतो. महानगरपालिकेचे सर्व सभेचे वृत्तांत महापालिकेचे दप्तरात दाखल आहेत. मी अशा प्रकारे बोलल्याचे सदर छापील वृत्तांतामध्ये श्री. ढेरे यांनी दाखवून द्यावे, अन्यथा माझ्या तोंडी घातलेला वरील मजकूर हा चुकीने लिहिला गेला आहे असे प्रांजळपणे कबूल करावे.

**गो. प्र. भागवत**
चेअरमन, स्टँडिंग कमेटी
पुणे महानगरपालिका

[ या वादावर आम्ही आताच पडदा टाकलेला नाही ! श्री. ढेरे यांनी खुलासा केल्यास त्याला अवश्य प्रसिद्धि देऊ. ]

**स. न.** २४–८–६४

आपला 'माणूस'चा जनता विशेषांक (ऑगस्ट १९६४) वाचला. मुखपृष्ठावरील चित्र व आतील सर्व लेख छान आहेत, गोड आहेत. पण पान २४ वरील 'रती आणि मस्ती' ही कथा वाचावयास सुरुवात केली मात्र आणि पान २७ पर्यंत म्हणजे शेवटचे वाक्य 'पूर्वीसार-खेच–? पर्यंत आलो. पुढे पान २८ वर काही संदर्भ लागेना. शेवटी ही काय गडबड आहे की लेखक असा कुठे भटकतो, असे वाटले. पुष्कळ शोध घेता घेता शेवटी त्याच पानावर– 'सोबत किंवा एकमेकांच्या फटकटचांवरून फिरत' हे वाक्य सापडलं व कथा जुळवून घेऊन वाचली. आपण ही गंमत प्रत्यक्ष मासिक वाचून पहावी. असा घोटाळा कुठेच आढळत नाही. तो आपल्या मासिकात आढळला. वाचक ही कथा चांगली असूनसुद्धा कसा गडबडतो हे यापासून आढळते. आपण ह्या चुकीची दुसऱ्या अंकांत वाच्यता अवश्य करावी.

कळावे.

**आपला,**
? (क्षमस्व...सही लागत नाही.)

[ चूक झाली की फक्त उच्चार करावयाचा व प्रायश्चित मात्र अजिबात घ्यावयाचे नाही असे चालू घडीला अनुसरून आम्ही करणार नाही. जनता अंकात अशी मोठी चूक व्हावी ही गोष्ट आम्हालाही उद्वेगजनक वाटली व सवडीनुसार या कथेचे पुनर्मुद्रण करू असे आम्ही कथालेखक श्री. पात्रीकर यांना कळवले आहे. रस्त्यात घसरून पडलेला माणूसच पुष्कळ वेळा जास्त लक्ष वेधून घेतो...असे भाग्य या कथेला लाभले खरे ! सं ]

• • •


**भरपूर कॅल्शियमयुक्त**

# बिटको

## ग्राइप

नेहमी दिल्याने
लहान मुले सशक्त बांधेसूद
व गुटगुटीत होतात.


**अत्यंत लोकप्रिय**

# बिटको

## काळी टूथ पावडर

नेहमी वापरल्याने
दात मोत्यासारखे स्वच्छ
व चकचकीत होतात.

## बिटको केमिकल इंडस्ट्रीज, नाशिक रोड



"कुटुंबाची काळजी घेणे हेच माझे जीवितकार्य आहे."—सौ. ललितादेवी

शास्त्रींचे कुटुंब म्हणजे नेहरू कुटुंबाचे दुसरे टोकच म्हटले पाहिजे. आकाराने भले मोठे, वृत्तीने सनातनी. राहणी कमालीची साधी. किती साधी ! शास्त्री पंतप्रधानपदाची शपथ घेण्यास निघणार तो दिवस. सकाळी नेहमीप्रमाणे शास्त्री खाटेवरून उठले. एका भल्या मोठ्या जुन्या खाटेवर शास्त्री आणि त्यांचा १६ वर्षांचा एक मुलगा एकत्रच झोपले होते. कोणाला न उठवता शास्त्रींनी आपले सकाळचे कार्यक्रम आटोपायला सुरुवात केली. हालचालीमुळे जे उठायचे ते अर्थात उठले. चहा झाला. कसलीही विशेष गडबड, धांदल न होता शास्त्री राष्ट्रपतिभवनाकडे शपथविधीसाठी नेहमी बाहेर पडावे तसे मोटारीतून निघूनही गेले.

श्रीमती ललितादेवी यांनी सार्वजनिक जीवनात भाग घ्यावा अशी मागणी करण्याकरिता महिलांचे एक शिष्टमंडळ नुकतेच श्री. शास्त्रींना भेटले. पण त्यांनी नम्रपणे त्यांना आपला नकार सांगितला.ते म्हणाले, "माझी पत्नी प्रार्थनेत आणि स्वयंपाकात मग्न असते. जर ती व्याख्याने देऊ लागली तर माझा किंवा माझ्या कुटुंबाचा काहीही फायदा होणार नाही."



शास्त्री कुटुंबवत्सल आहेत, खऱ्या अर्थाने. म्हणजे आपल्या मुलामाणसांच्या, नातेवाईकांच्या पसाऱ्यात ते मनापासून रमतात. पण कुटुंबहिताकडे लक्ष पुरवीत असता व्यापक सार्वजनिक हिताला कोठे बाधा येत नाही इकडेही त्यांचे बारकाईने लक्ष असते. शास्त्री पंतप्रधान होणार अशी चिन्हे दिसू लागताच त्यांची मुले ज्या खाजगी कंपन्यांतून नोकऱ्या करीत आहेत त्या कंपन्यांच्या मालकांकडून शास्त्रींच्या मुलांना विशेष सवलती दिल्या जाऊ लागल्या. एका ट्रक कंपनीत नोकरी करणाऱ्या शास्त्रींच्या तिसऱ्या मुलाला तर एकदम बरीच वरची बढती देऊ करण्यात आली. शास्त्रींनी आपल्या मुलांना स्पष्ट सल्ला दिला, की 'त्यांनी या प्रलोभनांना बळी पडू नये. विशेष सवलतींचा स्वीकार करू नये.'





शास्त्री समन्वयी आहेत. डावेही नाहित; उजवेहि नाहीत. मधला व्यवहारी सुवर्णमार्ग ते पत्करतात. पण मधला म्हणजे दुबळा, अनिश्चित, कोणताच निर्णय ठामपणे न घेण्याचा अप्रतिकारी मार्ग नव्हे. हा मार्ग आचरण्यास सर्वात अवघड; उजवी-डावीकडचे ताण सतत सहन करून, मधल्या वाटेवरून ठामपणे प्रगतीची वाटचाल चालू ठेवण्यास निग्रहाचे बळ विशेष अवश्य. शास्त्रीजींजवळ ही निग्रहशक्ती भरपूर असावी. पंजाबातील कैरों टोळीचा बंदोबस्त हे अधिकारग्रहणानंतरचे पहिलेच उदाहरण. आणि देशातील काळा पैसा बाहेर काढण्यासाठी बड्या बड्या धंदाच्या तिजोऱ्यांवर छापे घालण्याची उघडलेली नवी मोहीम हे ताजे उदाहरण.

# प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री

शास्त्री कायस्थ आहेत. अमेरिकन 'टाईम' साप्ताहिकाने यासंबंधी असे लिहिले होते : 'उत्तरेत असे बोलले जाते की वाटेत कुणाला एक कायस्थ भेटला व एक साप दिसला तर प्रथम कायस्थाला ठार करा.' हे प्रसिद्ध केल्याबद्दल 'टाईम' साप्ताहिकावर भारतात बरीच टीका झाली.

वास्तविक डाव साधण्याची ही कुटिलमती, हा आतल्या गाठीचा स्वभाव, ही चतुराई, ही धूर्तता राजकारणी व्यक्तीजवळ असलीच पाहिजे. शास्त्रीहि एकदा सहज म्हणाले होते, "मी दिसतो इतका साधा नाही." साधेपणाने आमची आजवर पुष्कळ हानी झाली आहे. राजकारणात कौटिल्य हाच आदर्श लागतो. धर्मराजाचे हे काम नोहे.



*आपल्या वाढदिवशी 'अभिनंदनग्रंथ' अर्पण करण्याची योजना आपल्याला पसंत नसल्याचे पंतप्रधान श्री. लालबहादुर शास्त्री यांनी प्रकट केले आहे. हा ग्रंथ आपण स्वीकारू शकणार नाही असे त्यांनी म्हटले आहे.*

[महाराष्ट्र टाइम्स, २३ ऑगस्ट ६४]

**या निःस्पृहतेबद्दल श्री. शास्त्री यांना 'माणूस'चे हे शब्दचित्ररूप नम्र अभिवादन.**

प्रचलित प्रश्न

समीक्षक

# धान्यटंचाई व भाववाढ

अन्नधान्याची टंचाई व भाववाढ हा आज देशापुढील सर्वात निकडीचा प्रश्न झाला आहे. हा प्रश्न सोडविण्यात सरकारला यश न आल्याने जनतेत तीव्र असंतोष निर्माण झाला असून गेल्या महिन्यात केरळमध्ये झालेला एक दिवसाचा सार्वत्रिक हरताळ व त्यानंतरच्या ' गुजरात बंद ' आणि ' महाराष्ट्र बंद ' निदर्शनांतून तो व्यक्त झाला आणि आता ' भारत बंद ' ची तयारी विरोधी पक्षाचे नेते करीत आहेत. ही निदर्शने योग्य की अयोग्य ? धान्यटंचाई व भाववाढीचा प्रश्न सुटण्यास त्यामुळे कितपत मदत झाली ? ही समस्या कोणत्या उपायांनी सुटेल ? सरकार हे उपाय योजण्याचा कितपत संभव आहे? या प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी या समस्येचे स्वरूप प्रथम समजून घेणे आवश्यक आहे.

### खरी टंचाई आणि कृत्रिम टंचाई

सध्याच्या धान्यटंचाईचा विचार करताना पहिला विचार मनात येतो तो हा, की यात खरी धान्यटंचाई किती आणि व्यापाऱ्यांनी साठेबाजी करून निर्माण केलेली कृत्रिम धान्यटंचाई किती ? गेल्या वर्षी धान्यउत्पादन ७ कोटि ९३ लाख ५० हजार टन झाले व याशिवाय साठ लाख टन धान्याचा साठा सरकारजवळ होता. गरजेचे दृष्टीने धान्य टंचाई ५० लाख टनांपेक्षा कमी होती. पण या खऱ्या टंचाईत भर कृत्रिम टंचाईने घातली. उपलब्ध धान्यापैकी साडेसोळा टक्के धान्य बाजारात कमी आले. याचा अर्थ पुढे आणखी भाव येईल या आशेने या धान्याचे साठे करण्यात आले. या साठेबाजीत व्यापाऱ्यांचा भाग किती आणि शेतकऱ्यांचा किती ? व्यापाऱ्यांवर साठेबाजीचा आरोप करताच ते म्हणतात, आम्ही साठेबाजी केलेली नाही. शेतकऱ्यांनीच धान्य साठवून ठेवले आहे. पण सर्वसामान्य शेतकरी धान्यसाठे फार काळ ठेवू शकेल अशी त्याची परिस्थिती नाही. फार तर बडे जमीनदार व धनिक शेतकरी यांनी थोडे साठे केले असतील; पण मुख्यत: व्यापाऱ्यांनीच मोठ्या प्रमाणात साठेबाजी केली यात शंका नाही.

या साठेबाजीला आळा घालण्यासाठी व व्यापाऱ्यांनी दडविलेले साठे हुडकून काढण्यासाठी सरकारने परिणामकारक उपाय योजले नाहीत ह्यामुळेच सध्याचा पेचप्रसंग निर्माण झाला. भारतसंरक्षण नियमांखाली सरकार कडक उपाय योजील अशा नुसत्या धमक्या प्रथम देण्यात आल्या. व्यापाऱ्यांना साठे जाहीर करण्याची सक्ती करणारे हुकूम काही राज्यसरकारांनी काढले; पण त्यासाठी एवढी मुदत देण्यात आली की आपल्याजवळचे साठे हलविण्यास व्यापाऱ्यांना पुरेसा अवधी मिळाला. नंतर काही राज्यांतून छापे व झडत्यांची मोहीम सुरू झाली. दिल्लीत बऱ्याच ठिकाणी छापे घालण्यात आले. पण त्यात फारसे साठे मिळाले नाहीत. पोलिसांना सहज सापडतील अशा ठिकाणी व्यापाऱ्यांनी साठे ठेवलेच नव्हते. दडवून ठेवलेले धान्यसाठे बाहेर काढण्यासाठी व रास्त भावाने खुल्या बाजारात विकण्यासाठी व्यापाऱ्यांना दोन आठवड्यांची मुदत द्यावी व नंतर कडक उपाय योजावे असे पत्र पंतप्रधान लालबहादुर शास्त्रींनी राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना ८ ऑगस्टला पाठविले व कडक उपाय योजण्याची वेळ येणार नाही अशी आशा व्यक्त केली. पण व्यापाऱ्यांबद्दलचा आतापर्यंतचा अनुभव लक्षात घेता पंतप्रधानांच्या या उदार धोरणाला ते अनकूल प्रतिसाद देतील अशी शक्यता वाटत नाही.

### स्वयंपूर्णता हाच खरा उपाय

साठेबाजीविरुद्ध कडक उपाय योजून कृत्रिम टंचाई नाहीशी करणे हा झाला तात्पुरता उपाय. मुळातच असलेली धान्यटंचाई काही यामुळे दूर होत नाही. परदेशी धान्यआयातीने ही टंचाई भरून काढण्यात येत आहे. १९५२ च्या पुढे आम्ही परदेशातून धान्य आणणार नाही असे पंडित नेहरूंनी पूर्वी घोषित केले होते. पण या घोषणेला बारा वर्षे लोटली तरी परदेशी धान्य आयात चालूच आहे ! एवढेच नव्हे तर ती वाढत्या प्रमाणात आहे. १९६१ साली ३५ लाख टन, १९६२ साली ३६,४०,००० टन व १९६३ साली ४५,६०,००० टन धान्याची आयात करण्यात आली. पण परदेशातून धान्य आणणे हा टंचाई दूर करण्याचा तात्पुरता उपाय आहे. देशातलेच धान्यउत्पादन वाढून अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण करणे हाच टंचाई दूर करण्याचा खरा व खात्रीचा मार्ग आहे.

हे उद्दिष्ट गाठावयास काही वर्षे लागतील. तोपर्यंतच्या काळात अन्नधान्याबाबत कोणते धोरण स्वीकारावयास हवे ? चालू वर्षी धान्यउत्पादन वाढले असे गृहीत धरले तरी ८ कोटी ६० लक्ष टनाच्या आसपास उत्पादन होईल व दीड कोटी टनापर्यंत आयात करावी लागेल असा अंदाज आहे. या परिस्थितीला तोंड देण्यासाठी सबंध देशात नव्हे तरी निदान मोठ्या औद्योगिक शहरातून रेशनिंग सुरु करावे अशी सूचना करण्यात येत आहे. युद्धकाळातील रेशनिंगचा कटु अनुभव लक्षात घेता लोक रेशनिंगला तयार नाहीत. पण भाव भरमसाट वाढून धान्य अजिबात न मिळण्यापेक्षा रेशनिंगने कमी

प्रमाणात का होईना मिळेल. रेशनिंगच्या वाटपपद्धतीतील गोंधळ व अव्यवस्था दूर होऊन चागले धान्यही रेशनिगमध्ये मिळण्याची व्यवस्था झाली तर लोकाची तक्रार राहणार नाही.

या तात्पुरत्या उपाययोजनानी प्रश्न तात्पुरता सुटेल. पण तो कायमचा सुटण्यासाठी अन्नधान्याच्या बाबतीत देश स्वयंपूर्ण करण्याचा कार्यक्रम हाती घेऊन त्याला प्राधान्य दिले पाहिजे. देशातील लागवडी-योग्य बहुतेक जमीन आता लागवडीखाली आलेली असून तिच्यात वाढ करण्यास आता फारसा वाव नाही. एक उपाय योजता येण्यासारखा आहे. पैसे देणाऱ्या पिकांखाली असलेली जमीन कमी करून ती धान्याच्या लागवडीखाली आणणे. या उपायाने धान्यउत्पादनात थोडी वाढ करता येईल.

## खतांचा अत्यंत अपुरा वापर

दुसरा उपाय म्हणजे आहे त्या जमिनीतच जास्तीत जास्त पीक काढणे. यासाठी रासायनिक खताचा वापर अधिक प्रमाणात केला जाणे आवश्यक आहे. देशात सरासरी दर एकर जमिनीस २·४१ पौंड खत दिले जाते. महाराष्ट्रात हे प्रमाण १·८६ पौंड आहे. जपानमध्ये हेच प्रमाण २०० पौंड आहे. सुधारलेल्या देशाच्या मानाने आपण याबाबतीत किती मागे आहोत याची यावरून कल्पना येईल. योजना समितीने वीस लाख टन नायट्रोजन व पाच लाख टनांची इतर खते उत्पादन करण्याचे उद्दिष्ट आखले आहे. ते पुरे झाल्यावर १९७०–७१ मध्ये दर एकरी जेमतेम दहा पौंड खत आपल्या जमिनीस मिळेल. सुधारलेल्या देशाचे तुलनेने खताच्या बाबतीत आपणास केवढा दूरचा पल्ला गाठावयाचा आहे व आपली प्रगती त्यामानाने किती मंद आहे हे यावरून दिसून येईल.

## जमीनसुधारणांची थंड प्रगती

जमीनसुधारणांच्या अंमलबजावणीत मंद प्रगती हे शेतीउत्पादन आणि धान्यउत्पादन न वाढण्याचे दुसरे महत्त्वाचे कारण आहे. अनेक राज्यांनी यासबंधी कायदे केले असले तरी जमिनीची मालकी बदलण्याचे व्यवहार होतात ते थांबविण्यासाठी कडक तरतुदी त्यात नाहीत. कमाल जमीनधारणा कायदा, कूळकायदा याचा मूळ उद्देशच विफल व्हावा अशा रीतीने जमिनीची मालकी बदलण्याचे व्यवहार गेल्या काही वर्षात झाले आहेत. आंध्र, आसाम, केरळ, म्हैसूर, मद्रास व ओरिसा या राज्यात जमिनीच्या कागदपत्रात कुळांसंबंधीच्या माहितीचीच नोद नाही. काही राज्यात ही नोंद असली तरी ती सदोष आहे. या नोंदी दुरुस्त करण्यासाठी येणाऱ्या खर्चाचा निम्मा वाटा आम्ही देऊ अशी तयारी नियोजन मडळाने दर्शविली. तरीही राज्य-सरकाराची या बाबतीतील हालचाल उत्साहजनक नाही.

## सहकारी संस्थांची जबाबदारी

शेती उत्पादन वाढीस सरकारी संस्थांनी मदत केली पाहिजे. या दृष्टीने सहकारी संस्थाची वाढ करण्यात येत आहे. पण काही राज्यांत सहकारी चळवळ अपेक्षेप्रमाणे यशस्वी झालेली नाही अशी कबुली रिझर्व बँकेचे गव्हर्नर पी. सी. भट्टाचार्य यानी नुकतीच एका भाषणात दिली. ते म्हणाले, " शेतीउत्पादन वाढावयाचे तर शेतकऱ्यांच्या कर्जाचे गरजेतही वाढ होत राहणार. रिझर्व बँक आणि रिफायनन्स कॉर्पोरेशन काही प्रमाणात ही कर्जाची गरज भागवितील पण अखेर सहकारी संस्थानीच ही जबाबदारी उचलली पाहिजे. "

सहकारी संस्था ही जबाबदारी पार पाडू शकत नाहीत याचे एक कारण या संस्थात राजकारण शिरले आहे. काही हितसबंधी गटांनी या चळवळीवर आपला पगडा बसविला आहे. बनावट सहकारी संस्था काढण्यात येत आहेत. केद्रीय सहकार मंत्री एस्. के. डे यांनी हैद्राबाद येथे दोन महिन्यापूर्वी झालेल्या सहकारमन्त्र्याचे परिषदेत या अनिष्ट प्रवृत्तीकडे लक्ष वेधून त्याबाबतीत इशारा दिला होता.

शेतीउत्पादनवाढीसाठी शेतकऱ्याला सहकारी संस्थाकडून फार कमी कर्ज मिळते. रिझर्व बँकेने ग्रामीण कर्जपाहणीचा अहवाल १९५१ साली प्रसिद्ध केला. त्यात शेतकऱ्याला घ्याव्या लागणाऱ्या एकूण कर्जात सहकारी सस्थाकडून मिळणाऱ्या कर्जाचा वाटा फक्त ३·१ टक्के होता. त्यानंतर १९५७–५८ साली रिझर्व बँकेने परत पाहणी अहवाल प्रसिद्ध केला. त्यावरून असे दिसते की शेतकऱ्याला लागणाऱ्या कर्जापैकी फक्त एक पंचमाश रक्कम सरकार व सहकारी संस्थांकडून त्यास मिळाली. तिसऱ्या योजनेअखेरही परिस्थितीत फारशी सुधारणा होण्याची शक्यता नाही. या योजनेअखेर शेतकऱ्यास लागणाऱ्या कर्जापैकी फक्त एक तृतीयाश वाटा सरकार व सहकारी संस्था देऊ शकतील.

## कर्जाचा ओघ धनिक शेतकऱ्यांकडे

सहकारी सस्थाकडून शेतकऱ्याला आधीच कर्ज कमी मिळते. पण जे मिळते तेही मुख्यतः धनिक शेतकऱ्याच्या पदरात पडते असे या अहवालावरून दिसून येते. महाराष्ट्रापुरते या अहवालात असे म्हटले आहे, की मोठ्या जमीनदाराची ४६ टक्के गरज, श्रीमत शेतकऱ्यांची ३४ टक्के गरज, मध्यम शेतकऱ्यांची २५ टक्के गरज व गरीब शेतकऱ्याची फक्त २२ टक्के गरज सहकारी संस्थांच्या कर्जातून भागविली जाते.

याचा परिणाम म्हणजे गरीब व मध्यम शेतकऱ्याला कर्जासाठी सावकाराकडे जावे लागते. सावकाराचे हे कर्ज किमान एक हजार कोटि असावे असा अदाज या अहवालात दिला असून या कर्जावर शेतकऱ्याला २५ टक्के व्याज भरावे लागते याचाही उल्लेख अहवालात केला आहे. तेव्हा शेतीउत्पादन वाढावयास हवे असेल तर गरीब व मध्यम शेतकऱ्याला सहकारी सस्थाकडून मोठ्या प्रमाणात कर्ज मिळण्याची व्यवस्था होणे आवश्यक आहे.

## शेतीमालास योग्यभाव

धान्य उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्याला उत्तेजन मिळण्याचे दृष्टीने आणखी एक आवश्यक गोष्ट म्हणजे शेतीमालाला योग्य भाव मिळण्याची हमी सरकारने दिली पाहिजे. धान्यप्रश्नावर विरोधी पक्षातर्फे होणाऱ्या निदर्शनात ही मागणी करण्यात येते. सरकारी मंत्र्यांनाही ती तत्वतः मान्य आहे. पण ती प्रत्यक्ष कृतीत येण्यास विलंब लागत असून त्यामुळे दरवर्षी धान्यपरिस्थिती अधिकाधिक बिकट होत आहे.

धान्यउत्पादनात वाढ व्हावयाची तर वर उल्लेखिलेल्या अनेक बाजूनी या प्रश्नाचा विचार होऊन निश्चित योजना आखल्या गेल्या पाहिजेत व निश्चित मुदतीत त्या पार पाडल्या पाहिजेत. काही वर्षे धान्यउत्पादनवाढ हाच सर्वात निकडीचा प्रश्न मानून तो सोडविण्या-

साठी सरकारने व जनतेने आपल्या सर्व शक्ति केंद्रित केल्या पाहिजेत. विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन, त्यांचेही सहकार्य मिळविण्याचा प्रयत्न सरकारने केला पाहिजे. विरोधी पक्षांनी सार्वत्रिक संपाचा कार्यक्रम आखला की तो पार पडू नये म्हणून तेवढ्यापुरती त्यांना सहकार्याची विनंती करावयाची, एरवी विचारावयाचे नाही, त्यांच्या सूचनांची दखल घ्यावयाची नाही, अशीच सरकारची वृत्ती असेल तर विरोधी पक्षांचे सहकार्य मिळणार नाही. विरोधी पक्षातही काही पक्षांची वृत्ती केवळ विरोधासाठी विरोधाची आहे. काँग्रेसबरोबर सहकार्यास ते कधीही तयार होणार नाहीत. अन्नधान्य प्रचारासारखे राष्ट्रीय प्रश्न पक्षीय पातळीवरून सुटणार नाहीत. त्यासाठी व्यापक राष्ट्रीय एकजुटीची व एकत्रित मोहिमेची आवश्यकता आहे. ही गोष्ट काँग्रेस आणि विरोधी पक्ष यांना पटल्याशिवाय या बाबतीत विशेष प्रगती होणे कठीण आहे.

'गुजरात बंद व महाराष्ट्र बंद' संपाने धान्य प्रश्न सुटण्यास कितपत मदत झाली याचा विचार आता करावयाचा. सरकारच्या चुकीच्या धोरणाबद्दल जनतेत केवढा तीव्र असंतोष आहे हे दाखवून देणे हा या संपाचा उद्देश असल्याचे संपनेत्यांनी सांगितले. जनतेच्या असंतोषाचे निदर्शन या संपांमधून झाले हे खरे. पण सरकारचे धोरण बदलण्यात आणि धान्यपरिस्थिति सुधारण्यात विरोधी पक्षांना यश आलेले नाही हेही तितकेच खरे.

### दोन संपांमधील फरक

'गुजरात बंद' व 'महाराष्ट्र बंद' संपातील फरकही लक्षात घेतला पाहिजे. 'गुजरात बंद' संपाला हिंसक वळण लागले. जाळपोळीचे प्रकार घडले. पोलिसांनी गोळीबार केला. उलट 'महाराष्ट्र बंद' संप काही ठिकाणी एस्. टी. गाड्यांवर झालेली दगडफेक व मिरजेस झालेला सौम्य लाठीहल्ला सोडल्यास शांतपणे पार पडला. ज्यातून शांततामंग होईल अशी प्रक्षोभक परिस्थिती निर्माण होऊ न देण्याची दक्षता दोन्ही बाजूंनी घेतल्यामुळेच हे शक्य झाले. बसवाहतूक व एस्. टी. गाड्या चालू ठेवण्यास जेथे विरोध झाला तेथे पोलिससंरक्षणाखाली त्या चालू ठेवण्याचा आग्रह सरकारने धरला असता तर त्यामुळे संपाला प्रक्षोभक वळण लागले असते. यावर संपनेत्यांपुढे सरकार नमले अशी टीका मुंबई विधिमंडळ काँग्रेस पक्षाच्या सभेत झाली. पण सरकार नमले म्हणण्यापेक्षा सरकारने काहीसे तडजोडीचे धोरण स्वीकारले असे म्हणणे अधिक योग्य होईल. मुंबईत सर्व ठिकाणची बसवाहतूक बंद असता बोरीबंदर ते सचिवालयापर्यंत सरकारी नोकरांना नेण्यासाठी मात्र बस चालू ठेवण्याची सवलत संपनेत्यांनी दिली. सरकारी नोकरांसाठी ही सोय आम्ही करतो, त्याच्या बदल्यात एस्. टी. गाड्या चालू ठेवण्यास विरोध झाला तर पोलिस संरक्षणाखाली त्या चालू करण्याचा आग्रह सरकारने धरू नये असा अलिखित करार तर संपनेते आणि सरकार यांच्यात झाला नव्हता ना, अशी शंका यावरून येते. सरकारी नोकरांसाठीच तेवढी बसवाहतूक चालू ठेवण्याचे कोणतेही समर्थन संपनेत्यांना करता येण्यासारखे नाही. मुंबई बंद पण सिनेमागृहे मात्र हाऊसफुल गर्दीत चालू हे दृश्यही संपाच्या गांभीर्यास एक प्रकारे कमीपणा आणणारे होते. संपाबद्दल लोकांना मनापासून सहानुभूती असती तर त्यांनी सिनेमागृहेही ओस पाडली असती.

### अलग मोर्चे, अलग मिरवणुका


'महाराष्ट्र बंद' संपात स्वतंत्रपक्षाने भाग घेतला नव्हता. धान्यव्यापार सरकारने हाती घेण्याची मागणी स्वतंत्रपक्षाला मान्य नाही. म्हणून संपास त्यांचा विरोध होता. बाकी विरोधी पक्षही केवळ काँग्रेस विरोधाच्या पायावर एकत्र आले होते. त्यांच्यात एकजूट नव्हती, एकत्र कार्यक्रम ते आखू शकले नाहीत. प्रत्येकाने सभा, मिरवणुक व मोर्चांचा आपला कार्यक्रम अलगपणे पार पाडला. जनसंघाचा भर पुरवठामंत्री तल्ल्यारखान यांना बडतर्फ करण्याच्या मागणीवर होता. वास्तविक मंत्री बदलण्यापेक्षा धोरण बदलणे अधिक महत्त्वाचे आहे.

### संयुक्त आघाडीस विरोध

'भारत बंद' संपाची घोषणा ही कम्युनिस्ट नेते डांगे यांनी दिली असून त्या दृष्टीने त्यांची तयारी चालू आहे. 'भारत बंद'ची भाषा इतर विरोधी पक्षांचे नेतेही बोलत असले तरी या प्रश्नावर कम्युनिस्टांशी संयुक्त आघाडी करावी की नाही यावर संयुक्त समाजवादी पक्षाच्या अ‍ॅडहॉक नॅशनल कौन्सिलच्या बैठकीत तीव्र मतभेद असल्याचे दिसून आले. या एकाच प्रश्नावर एकोणतीस तास चर्चा झाली. अखेर ठरावातील संयुक्त आघाडी हा शब्दच गाळण्यात आला. व भाववाढीविरोधी चळवळ कम्युनिस्ट आणि इतर पक्षांशी सहकार्य न करता स्वतंत्रपणाने करावी असा निर्णय घेण्यात आला. 'महाराष्ट्र बंद' संपासाठी १२ ऑगस्ट तारीख संयुक्त समाजवादी पक्षाचे नेत्यांनी प्रथम जाहीर केली व कम्युनिस्टांनी ती मान्य केली. हरताळ सहकार्याने पार पाडल्यामुळेच तो यशस्वी झाला. पण भाववाढविरोधी चळवळ स्वतंत्रपणे करायची, इतर पक्षांशी संयुक्त आघाडी करायची नाही हा संयुक्त समाजवादी पक्षाने नुकताच घेतलेला निर्णय लक्षात घेता, केवळ कम्युनिस्टांच्या आदेशाने झालेला 'भारत बंद' संप कितपत यशस्वी होईल याची शंका वाटते.

विरोधी पक्षांची ही अलग धोरणे व अलग पवित्रे लक्षात घेता भाववाढविरोधी चळवळीतून आपल्या पक्षाचे वजन वाढावे असाच प्रत्येक पक्षाचा मर्यादित उद्देश असल्याचे दिसते. काँग्रेसविरोधाशिवाय त्यांच्यात समान भूमिका नाही. सर्वांना मान्य असा व्यापक संयुक्त कार्यक्रम आखून संयुक्त आघाडी उभारण्याचा प्रयत्न दिसत नाही. तेव्हा या चळवळीतून प्रभावी विरोधी पक्ष उभारला जाण्याची शक्यता बरीच कमी आहे.

• • •





## दोन कविता

१

गहन गूढ रात उभी नील नयन-काठावर
बासनेत भिजत थेंब ओघळतो ओठावर.
गालावर मुसमुसत्या विरघळती क्षितिजरंग,
हृदयाकाशांत रुजे अनुपम अनुरागसंग.
अंचलात हळु हलती दुग्धधवल स्तनरेषा,
थरथरते मनि मनिषा, अर्घ्यावर अभिलाषा.
अभिलाषा अर्घ्यावर, सारा अभिसार सरे,
——अन् हिरव्या वेदनेत स्वप्नाक्षी अजुन झुरे!

२

कधी कुणाच्या कृपेचे फाटता आभाळ,
जळ गाळूनिया डोळे ठेवावे निर्मळ.
आणि छातीशी धरून तयाच्या खेटरा
नित्य नेमे परतावे आपुल्या कोटरां
महन्ताच्या मरणाला जाळावे चंदन,
आपणासी आपुल्याच अस्थींचे सरण !

—चंद्रकांत पाटील

□

## स्वप्न

नभातले तारे
गालात हसले
जेव्हा मी पाहिले
स्वप्न तुझे——

धुंदीत चंद्राची
गति मंदावली
स्वप्नात रंगली
रात्र सारी

क्षितिजास तेज
तारकांनी दिले
स्वप्न संपविले
पहाटेने

जागृत होऊन
नेत्र उघडले
विश्वच भासले
स्वप्नमय

—गोविंद कुलकर्णी

## विसावा

तुझ्या दारी कधी, येता विसाव्यास
देशील का घास
अंतरीचा

तुझ्या अंगणात, शेवटची झेप
नको पुन्हा खेप
अतृप्तीची

तुझ्या अंगणात जळो माझे दुःख
हेचि आता सुख
उरलेले

तुझ्या मानसात, किती आले गेले
राहो त्यांत माझे
भाव ओले

— सुधा जोशी

□

## बाहुले

एक फूल फुले त्याचा दाहीदिशा गंध
एक मन उले त्याची वेदनाहि मंद

एक फूल फुले त्याच्या कल्पवेषी कळ्या
एक मन मुके त्याच्या स्पर्शात इंगळ्या

एक तारा नभी तमतेजाचा श्रावण
एक मन इथे आर्त व्यथेचे गोंदण

एक थेंब तिथे इंद्रधनूचे शिल्पुले
एक मन इथे रितेपणाचे बाहुले !

—राजा महाजन



आनंद रामचंद्र फुले

अभिजात साहित्याचे मोल काळाच्या कसोटीवर व्हायचे ते होतेच; परंतु हयातीतील उदो उदो मात्र नशिबाने घ्यावा लागतो! गोविंदा .... .... तुला हे कळले नाही .... ....!!

# गोष्ट एकाकी गोष्ट

प्रिय पी. आर.

तुझं बऱ्याच वर्षांनंतर इतकं सविस्तरपणे लिहिलेलं पत्र व गोविंदावरच्या तुझ्या इंग्रजी लेखाचं कात्रण मिळालं.

गोविंदाला जाऊन आज एक वर्ष झालं. खरंच सांगतो, पी. आर., सांगताना खरोखरीच शरम वाटते. तुझं पत्र आज आलं म्हणूनच ही गोष्ट जाणवली. एरवी ह्या गोष्टीची जाणीव मला तशी झाली नसती ...

लोकांची स्मरणशक्ती फारच कृतघ्न असते. खरंच तुझं म्हणणं मला पटतं. गोविंदाशी आपल्या आयुष्याची अडीच तपं निगडित होती तरीसुद्धा मला गोविंदाची मृत्यूतिथी तुझं पत्र हाती येण्याआधी सांगता नसती आली. अगदी निश्चितपणे ! अवघ्या वर्षभरात गोविंदाच्या आठवणींची लड तुटून त्या इतस्ततः विखुरल्यात. प्रयत्नांनी गोळा करण्यासारख्या झाल्यात. एरवी गोविंदा होता तोपर्यंत त्याच्या नुसत्या नावासरशी आठवणींची लड मनाच्या गळाला लागायची. गोविंदा गेला न् त्याच्याविषयीच्या आठवणींची लड सुटी झाली. खिळखिळी झाली. विस्कळली. आठवणी विखुरल्या आहेत. प्रयत्नांनीच गोळा कराव्या ह्या स्वरूपाच्या झाल्या आहेत.

मागं मीं लिहिलेल्या गोविंदावरची मृत्युलेखावरची तिथली प्रतिक्रिया तू कळविल्यावर त्या तुझ्या पत्राला उत्तर देताना मी संबंधित लोकांवर कृतघ्नतेचा आरोप केला होता. खरंच, मला काय नैतिक अधिकार आहे ? माझ्या लेखाबद्दल औपचारिकरीत्या त्यांनी मला आभाराचं पत्र तरी निदान पाठवायचं होतं ही माझी अपेक्षा होती. पण केवढा कृतघ्नपणा होता तो ? केवढी प्रतारणा होती स्वतःच्या मनांतल्या गोविंदा विषयींच्या आठवणींशी ? गोविंदाच्या सहवासानं उजळून निघालेल्या तब्बल तीस वर्षांशी केवढी भयंकर प्रतारणा होती ? गोविंदावरचा लेख मीं गोविंदाच्या स्नेहाखातर लिहिला होता की त्यांना उपकृत करण्यासाठीं ? त्या लेखाबद्दल आभाराची अपेक्षा करणं ह्यासारखा दुसरा कृतघ्नपणा नव्हता – गोविंदाची – त्याच्या इतक्या वर्षांच्या मैत्रीची – त्याच्याविषयीच्या सुखद आठवणींची केवढी घोर वंचना होती ती ?

माझ्यासारख्या घनिष्ट मित्राची इतकी नालायकी गोविंदाच्या बाबतीत उचमळून यावी इतका गोविंदा दुर्दैवी होता का ? गोविंदाच्या स्मारकाची योजना अजूनपर्यंत नावारूपास आली नाही. येण्याची तशी लक्षणंदेखील नाही. गोविंदा खरोखरीच दुर्दैवी होता

का? इतक्या सालस सद्‌गृहस्थाची अशी परवड का व्हावी, हा मनाला प्रश्न पडला आहे. ह्याला मी – माझ्यासारखे मित्र जबाबदार आहेत. दुर्दैव हेच की त्यानी माझ्यासारख्या नालायक बेइमान माणसाशी एवढी वर्षं मैत्री केली. स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतली. मनाला प्रश्न पडतो – मी गोविंदासाठी काय केलं? जिद्दीन एक मृत्युलेख लिहिला. बस्स. तेवढंच. गोविंदानं आपल्याशी केलेल्या तीस वर्षांच्या मैत्रीचं मोल एवढंच होत? फक्त एवढच होतं? एका मृत्युलेखानं फिटंफाट होणारं? अन् तोही एका प्रसगानच लिहवून घेतलेला?

पी. आर.; गोविंदा खरंच दुर्दैवी होता! त्यान माझ्यासारख्या नालायक कृतघ्न माणसाशी तीस वर्षं मैत्री ठेवली! त्याचं गणित – त्याचा ताळा – चुकला होता तो. निष्ठेनं पुस्तकं विकत घेतलीं. वर्षानुवर्ष काही मासिकं घेतली. खास अक घेतले. वाटेल तसा पैसा वेचला. एका जिद्दीनं वेचला. कुणाच्या मताची पर्वा केली नाही. पण काय झालं? गोविंदा जिवंत असतानाच त्याच्या भिडस्त स्वभावाची उधई त्याच्या पुस्तकांना लागली. उपटता येईल त्यानं पुस्तकं लाटली. अगदी वाङ्मयातलं 'काला अक्षर भैंस समान' असणाऱ्या गोविंदाच्या मित्रानीही टीकाशास्त्रावरची – इतर काही दुर्मिळ मौलिक – पुस्तकं लंपास केली – स्वतःच्या व स्वतःपुरत्याच असलेल्या पुस्तकांत आपलीशी केली. ह्याचा संग्रह ह्याचा स्वतःचा; स्वतःच्याच उपयोगाचा पण बहुधा दुसऱ्याच्याच पुस्तकानी सजीव झालेला होता. गोविंदा अश्या बऱ्याच निजी व संपूर्णतः 'खासगी'च स्वरूपाच्या असलेल्या पुस्तकाच्या संग्रहाचा अक्षय आश्रयदाता झाला होता – ज्यांना गोविंदाची पुस्तकच तेवढी हवी होती. पण वर्गणीदार-वाचक म्हणून मात्र गोविंदा मानवणारा नव्हता.

वाङ्मयीन कुवत मोठी असूनदेखील गोविंदा दुर्दैवीच होता. गुणवत्ता नाकारता येणारी नव्हती. गोविंदाचा 'पानझड' हा निवध मी माझाच म्हणून मागे आमच्या मावशीना वाचून दाखविला होता. त्याची शाबासकी मिळविली होती. त्या काळी त्या लेखिका म्हणून गाजल्या होत्या तो निबंध त्याच्या लक्षात राहृला. नतर तो प्रकाशित झाला तेव्हा त्यांनी माझी चांगलीच हजेरी घेतली होती. 'काजळ'; 'गुलमोहोर' वगैरे गोविंदाचे काही निबंध मराठी वाङमयात निवध ह्या वाङमयप्रकाराच्या वाटचालीतील मैलाचे दगड ठरावेत ह्या गुणवत्तेचे आहेत. पण पुनः गोविंदाचं दुर्दैव आडवं आलं. प्रातिनिधिक संग्रहात त्याचे 'पानझड' व 'तवक' आणि 'आंदण' हे लघुनिबध समाविष्ट झाले होते. 'काजळ'; 'गुलमोहोर' वगैरेंना मुद्दामच चाट मिळाली होती – त्यानी तसं सुचवून सुद्धा बिचाऱ्याच्या लक्षात संपादकाचा 'गेम' आला नव्हता. सरस्वतीच्या मदिरात असल्या गलिच्छ लांडचालबाड्या चालत नसतात अशी त्याची भावुक कल्पना होती. पुअर फेलो!

खरच गोविंदा दुर्दैवी होता. वामन्याला मुबईला नाटकं पाहण्याची घाई होती. पण विनतीवर सुद्धा गोविंदावरचा लेख लिहिण्याची वामन्याची 'मनःस्थिती' नव्हती. नाटक पाहण्याची मन.स्थिती मात्र होती! –'गोविंदाला खादा देऊन आलो आहे मी. मी त्या मनःस्थितीत नाही' अशी वरनं मखलाशी. म्हणून मी लेख लिहिला होता. तीस वर्षांच्या दोस्तीची कदर झाली होती ती अशी. लेख लिहिला. आभाराची अपेक्षा ठेवून! पी. आर्... हलकट मी देखिल होतो!

म्हणूनच तर त्याची शोकसभा अशी 'गाजली?' चागलं आयोजन करण्यात आलं नाही. कुणी तसं मनावर घेतलं नाही. म्हणून तर वक्त्याखेरीज दोन चार श्रोते लाभले गोविंदाच्या शोकसभेला! साहित्यिक अड्ड्यावर, गुप्त धनावरच्या नागासारखे ठिय्या देऊन बसलेले सोदे वक्ते गोविंदावर बोलले! त्याच्या प्रसगोपात्त भाषणाच्या ध्वनिमुद्रिका महशूर होत्या. नक्राश्रू गळण्यात–तो अभिनय करण्यात ते रंगभूमीवरच्या गणपतराव-केशवरावाचे पूर्वजच शोभू शकत होते. व्यासपीठावरचे ते नटवर्य–नटसम्राट होते. पिटात सुद्धा बसण्याची लायकी नसलेल्याना व्यासपीठावर बहुजनांच्या बहुमतानं बसण्याचा मान मिळाला की त्याचा 'वचपा' ते अशा प्रसंगी भाषण गाजवून करीत असतात. गोविंदावरचा सूड ह्यानी मामुली ओळखीच्या भाडवलावर घेतला –भाषणं गाजवून. सरासर खोटचा विधानाचा दुल्हा जागवून. गोविंदाच्या मृतात्म्यास शाती मिळो हा ठराव करणारे हे महाभाग पाहून गोविंदाच्या आत्म्याला काय वाटलं असेल? गोविंदाच्या जीवनात आपल अनन्यसाधारण महत्त्वाचं स्थान होतं हें सागणाऱ्या सोद्यानीं गोविंदाच्या ह्यातीत त्याच्या भिडस्त स्वभावाचा फायदा घेऊन आपला नसलेला मोठेपणा–गुरुपणा त्याच्यावर लादण्याचा प्रयत्न केला होता. आपल्या प्रभावळीत सामील करण्याचा प्रयत्न केला होता. तो साध्य झाला नाही म्हणून उपेक्षेने मारण्याचा घाट केला. काहीसा यशस्वी. तेच महाभाग सभा गाजवून गेले. गोविंदावर त्यानी पुरता सूड घेतला होता –स्वतःची जवळीक त्याच्यावर लादून! जी मुळात नव्हतीच!

गोविंदा दुर्दैवीच होता. एवढी गुणवत्ता असून सुद्धा व्यवहार न समजल्यामुळ गोविंदा मागं पडला होता. रखडला होता. ह्या जगात अभिजात साहित्याच मोल काळाच्या कसोटीवर व्हायचं ते होतच. पण उदोउदो मात्र नशिबानच घ्यावा लागतो. मग लायकी कितीही असो. ह्या प्रसिद्धीच्या युगात आपला उदोउदो आपणच हस्तेपरहस्ते करवून घ्यावा लागतो. केवळ व्यक्तिगत हेव्यादाव्यापायी गोविंदाला वाङमयाच्या इतिहासकारानं डावलल! असले इतिहासकार काय कपाळ न्याय देणार एखाद्याला? गोविंदाला कोणता मिळाला?

हाच गोविंदा मुंबई–पुण्याला असता तर असा उपेक्षेनं त्याचा बळी घेतला नसता. गेली चार पांच वर्षं वऱ्यापैकी लेखन करणाऱ्या त्या पडित शेटघाच्या मृत्यूनंतर पाच दहा ठिकाणी त्याच्या अन्तेवासीयांनी लिहिलं. छापवून घेतलं. अशा ह्या देशात गोविंदाच्या तीस वर्षांच्या राहण्याची अशी शोकान्तिका झाली नसती.

गोविंदा इथ नव्हता हेच गोविंदाचं दुर्दैव होत. एरवी गोविंदा कुठल्या कुठे असता? कल्पनासुद्धा करता येणार नाही एवढ यश गोविंदाला नक्कीच मिळालं असत!

आपण विदर्भीय लोक मुंबई–पुण्याच्या लोकाचा अकारण वाऊ करतो. कधी त्याचा उपहास करून तर कधी मुद्दामच त्याना कमी लेखून. मुवई–पुण्याचे लोक शिष्ट; अहंमन्य व आपलाच उदो उदो करणारे असतात हा आपला त्याच्यावरचा आरोप आजतागायत आहे तसाच आहे

गेल्या वीस वर्षांपासून मी इथ आहे. त्या

अनुभवांच्या पाठबळावर आज मला असंच वाटतं की खरच गोविंदाचं चीज इथंच झालं असतं !

तूं शेरलेकर; शिरोडकर; ह्यांच्यासारख्या गोमंतकीयांवर उगाच खपा आहेस. त्यांच्या प्रादेशिक प्रेमावर तुझा काहीसा सकारण व वराचसा अकारण राग आहे. आपल्या ज्ञातिबांधवासाठी 'आउट ऑफ द वे' जाऊन ते काहीही करतात हा खरा तुझा आरोप. पण दुसऱ्याच अर्थानं केवढं मोठं प्रशस्तिपत्रक आहे हे !

गोव्याच्या लोकासाठी ते काहीही करतात. आपण आपल्या लोकांसाठी काय केलं ? काय करतो ? आपल्या आधीच्या पिढीच्या लेखकानी आपल्यासाठी काय केलं ? कोणतं सक्रिय प्रोत्साहन दिलं ? उपदेशाची बरसात केली. इकडं मुंबई–पुण्याला येऊन प्रकाशक–संपादकांपासून पंचपक्वान्नाची जेवण उपटली. आपली पुस्तकं काढवून घेतली. आपला उदोउदो करवून घेतला. मीही तेच केलं. *एकाही नव्या लेखकासाठी शब्द टाकला* नाही ! मीही परंपराच चालविली !

इथे तसं नाही. आपल्या लोकाना ते अहमहमिकेनं समोर आणतात. सक्रिय प्रोत्साहन देतात. धडाडीनं त्यांची पुस्तक काढतात. खपवतात. त्यांना चागलं मानधन देतात. डेअरडेव्हिल लोक आहेत हे.

म्हणूनच गोविंदाची खरी कदर इथं झाली असती. गोविंदाचं लिखाण इथं पूर्ण बहरात आलं असतं. पण गोविंदा दुर्दैवी होता. तो तिथं होता. प्रोत्साहनाच्या अभावी खुरटला. नेट धरण्यासारखी काहीच परिस्थिती त्याला अनुकूल नव्हती. म्हणून गोविंदा असाच करपला.

आपल्याजवळ काय आहे ? एक नाव घेण्याजोगं साप्ताहिक नाही ! एक मासिक नाही ! आपल्या साऱ्या प्रकाशकाची धाव पुण्या-मुंबईच्या लेखकांकडे असते. त्याना 'रिस्क' घेणं ठाऊक नाही. धडाडी नाही. म्हणून आपल्या लेखकांना परावलंबी जिणं मिळतं. एखाद्या लेखकाला पुण्या-मुंबईच्या नियतकालिकांत प्रसिद्धी लाभली तरच तो आपल्याला 'जाणवतो', एरवी नाही. ही आपली अगतिकता आहे. शोकान्तिका आहे. म्हणूनच गोविंदासारख्या लेखकाची व लेखकाहून मोठ्या असलेल्या माणसाची अशी उपेक्षा झाली. दैना झाली. आबाळ झाली.

गोविंदा गोव्यात-मुंबई-पुण्याकडे जन्माला आला नाही म्हणूनच दुर्दैवी ठरला होता. तुझ्या वाट्याला हेच आलं ! ज्या भावनेनं पेटून तू 'इकडचे–तिकडचे' हा भेदभाव उगाळून इकडच्या लोकाच्या उपेक्षेला–अन्यायाला तोंड फोडलंस. पुण्या-मुंबईच्या काही लेखकांना खाली खेचलंस त्या भावनेची इकडच्याच लोकानी कोणती कदर केली ? तुझी कोणती कदर केली? उलट ज्यांच्यासाठी तू हे नसतं श्राद्ध विकत घेतलस त्यापैकी अनेकांनी पुण्या-मुंबईच्या प्रकाशक-संपादकलेखकांशी लोचट सधन बाधलं. त्यांची थुंकी झेलण्यापत अगतिकता दाखविली. मोबदल्यांत निदान व्याजस्तुतीचा एक रकाना लाभावा म्हणून ! त्यानी तुला उघड केलं. तुझ्याविषयी गैरसमज ठरवून दिले. स्थानिक साहित्यिक अड्डेबाजीच्या राजकारणातून तुझी पद्धतशीर उचलबांगडी केली ! पी. आर. इतका कृतघ्नपणा इथं तुला मिळाला *नसता. इथही गटबाजी आहे. उपेक्षा आहे.* पण एवढी भयंकर नाही– एखाद्याचा बळी घेण्याइतकी समर्थ उपेक्षा ह्याच्याजवळ नाही. आपल्याजवळ मात्र आहे. ह्यांच्याजवळ इतकी सहृदयता आहे–सहिष्णुता आहे म्हणून मी आज 'जिवत' आहे. मी इथे –ह्या लोकात होतो म्हणून माझा 'गोविंदा' झाला नाही.

४२ साली मी मुंबईला आलो. आज विचार करतो तेव्हा वाटतं मी जर इथे आलो नसतो तर...?

Absolute Merit. निखालस गुणवत्तेवर आपला विशेष रोख आहे, पण ही निखालस गुणवत्तादेखील व्यक्तिसाक्षेपच नसते का ? निदान ह्या एका दृष्टीनं ! अमुक एक कथा–कविता चागली आहे हे नुसतं जाणवून काय उपयोग ? आपल्याविषयी अपसमज करून घेणाऱ्या व्यक्तीच्या नुसत्या जाणवण्याला काय चाटायचंय् ? आपण चांगलं लिहितो. ते सामर्थ्य आपल्या लेखणीत आहे हे आपल्याला एका पिढीनं ज्येष्ठ असलेल्या साहित्यिकांना जाणवलं नव्हतं ? पण त्यांनी मुद्दाम डोळ्यावर पट्टी बाधली होती. उपेक्षा केली होती. नव्या पिढीच्या लेखकांच्या बाबतीत मीही तसाच वागलो.

पण इथं तसं होत नाही. किमान गुणवत्ता असलेल्यांना कमाल प्रसिद्धी मिळते. ह्या प्रोत्साहनाच्या खतपाण्यानं अनेकाची प्रतिमा अपेक्षेबाहेर फोफावत जाते. इथ नुसतीच कोरडी तारीफ होत नाही. तशी कदर होते. मानधन मिळतं. म्हणूनच खूप मोठ्या कुवतीच्या नसलेल्या लेखकांना देखील लेखन मानाचा धदा म्हणून करता येतो. किमान गुणवत्तेचा कमाल उदोउदो आला की कधी कधी कमाल गुणवत्तेची किमान दखल आलीच. मला मुद्दाम तांदळातल्या खड्यासारखे आपल्या प्रत्येक दिवाळी अंकातनं वगळणारे संपादक भेटलेत न् जिद्दीवर एकाच दिवाळी अकांत दोन कथा (एक टोपण नावावर) छापणारे संपादकदेखील भेटलेत. चालत नाण नसताना धडाडीनं पुस्तक काढणारे प्रकाशक भेटलेत, म्हणून मी नावारूपास येऊ शकलो आहे.

ह्या मुंबई-पुण्यात कथालेखकाना काही और भाग्य लाभतं. एखादी चांगली कथा छापून आली की रस्त्यांत मुद्दाम थांबवून तस सांगणारे ओळखी-अनोळखी वाचक लाभ*तात. तुमच्या अमुक कथेची जन्मकथा सागा* म्हणून घरी येणाऱ्या कॉलेजकुमारिका ह्या वातावरणाची साक्ष पटवितात. सभा-संमेलनाला निमंत्रणं मिळतात. परिसवाद-चर्चा ह्यांना नेहमीच उधाण आलेलं असत. लोकलमध्ये मासिकं वाचणारे अनेक भेटतात. हातात हॅन्डबॅगमध्ये मासिकं बाळगणारे भेटतात. एखाद्या सार्वजनिक सभागृही–वाचनालयात– रस्त्यावर लेखक म्हणून ओळखणारे अनेक अनोळखी गृहस्थ तशी जाणीव नजरेनं देतात. इथलं वातावरण अस आहे. चांगल्याची अशी दखल घेतली जाते. अनेक लेखक असतात म्हणून निर्मितीला हुरूप येतो. कसावर मर नकळत दिला जातो.

४२ आधी आपण तिथं काय पाहत होतो ? जे लब्धप्रतिष्ठित होते ते मुंबई–पुण्यात नाक घाशीत होते म्हणूनच की काय गावात मात्र तोऱ्याने वावरत होते– नाकपुड्या फुगवून ! जणू साऱ्यानीच त्यांचा घोर अपराध केला होता. आपल्यासारख्या पोरसवदा तरुणांना ते अंतरावर ठेवीत असत. आपल्या मनातलं त्यांच्या मोठेपणाचं चित्र बेरंग होऊं नये म्हणून उपदेशाच्या मात्रा पाजीत होते. अन् संग्याच्या–कापसाच्या धंद्यात मश्गुल असलेले सामान्य लोक ह्यांची दखल घेत नव्हते. वकील लोक वकिली–समाज–राज-

कारणात मग्न होते. डॉक्टर आपल्या व्यवसायात. ह्याची दखल घेण्याइतपत समाजात ह्याचं कार्य नव्हत. म्हणूनच ह्या लेखकाना कुणीही विचारीत नव्हतं. अन् तरीही ते वृहस्पतीच्या बापाच्या आवेशात स्वत.च्याच तोऱ्यात वावरत होते. स्वत:च्याच कैफात.

तस इथ नाही. साहित्यिकाला इथं मान मिळतो. समाजात मानाचं स्थान मिळतं. चांगल्या लिखाणाची कदर होते. चर्चा होते. श्रेय दिल जातं. म्हणूनच फार मोठी झेप नसलेले पण उंच भरारी मारण्याच्या प्रयत्नात झेपावलेल्या बऱ्यापैकी लेखकाना आधार मिळतो. ते मुईसपाट होत नाही. कुवतीच्या मानानं वरचढ मानधनावर ते जगतात. केवळ वाचकवर्गावर जगतात. मी त्यापैकी एक नाही का ?

गेली इतकी वर्षं मी लेखक म्हणून लेखकाच्या तोऱ्यातच जगलो. सन्मानानं जगलो. एका लेखकाला मिळणाऱ्या साऱ्या सन्मानाचा मानकरी झालो. मी लेखक आहे असं अभिमानानच सागण्याइतपत ह्या जीवनावर माझी निष्ठा–श्रद्धा जडली आहे. मला लाचारी घ्यावी लागली नाही. अगतिकता कवटाळावी लागली नाही. मी लेखक म्हणून मानानं–तोलामापानं जगलो. गोविंदाची अशीच कदर झाली असती. आज त्याला जाऊन वर्ष होण्याआधी त्याचं सर्व अप्रकाशित लिखाण एखाद्या प्रकाशकान प्रकाशित केल असत. दुसऱ्या एखाद्यानं 'समग्र गोविंद दामोदर पळसुले' प्रसिद्ध करून गोविंदाच्या वाङमयीन सेवेचं चीज केलं असतं. इथल्या अनेक नियतकालिकात त्याच्या प्रत्येक स्नेह्यान आपलं कर्तव्य म्हणून मृत्युलेख लिहिले असते. छापवून घेतले असते. आजच्या वर्षतिथीच्या निमित्तानं पुन: लेख लिहून त्याच्या आठवणीना उजळा दिला असता. आत्तापर्यंत केव्हाच *त्याचं तैलचित्र साहित्य–सघात लागलं असतं.* अन् हे सर्व गोविंदा ह्या लायकीचाच होता म्हणून तर झाल असतंच, पण इथल्या लोकानी प्रत्येक गोष्ट कर्तव्यस्वरूप मानून मनावर घेतली म्हणून झाली असती. गोविंदाला त्यानी असं unhonoured unsung...unwept जाऊ दिलं नसत...

यदाच्या दिवाळी अकातला माझा वाङमयीन रतीब अगदी सराईत, गवळयाच्या नेक इमानान मी दिला होता व तुझा अहेर एरवी मी पोच देण्यापलिकडे मनावर घेतला नसता. तुझाच काय पण कुणाचाही–वाचकाचा मित्राचा हा हक्क मी गुर्मीच्या पायमल्लीनं कधीच तुडविला नाही. पण तसं मनावर देखील घेतल नाही...

पण आज मी वेगळयाच मन.स्थितीत आहे. गोविंदाच्या आठवणीनं मी भारावून गेलो आहे. मृत्यू...मृत्यूच्या विचारान मनाला पिसं लागलं आहे...

म्हणूनच आज मला तुझ्या नेहमीच्या साध्या अभिप्रायात सुद्धा काटे लागलेत. तुला त्या व तेवढया गभीर अर्थानं तसं म्हणायचं नव्हतं ह्याची पुरती जाणीव असून देखील...

दिवाळी अंकातच प्रत्येक वर्षाचं उत्तमोत्तम साहित्य येत. तशी प्रथाच म्हणावी लागेल. ह्या दिवाळी अंकाचे वेध संपादकांना शिमग्यालाच लागतात. हो, खरच ! एप्रिल–मे महिन्यापासूनच वार्षिकाची योजना जन्मास आलेली असते. संपादक सहा महिने आधी नामवत लेखकाना भेटून साहित्यासाठी शब्द टाकतात. पेशगी देऊन पक्का करतात. जून–जुलैमध्ये मासिकाच्या संपादकांच्या हालचाली सुरू होतात. साऱ्याचा अपरिहार्य विचार असतो बाजाराचा. नामवंत लेखकाच्या नावानीच बाजार जगवायचा असतो. म्हणून नामवंत लोकांना भेटण्याची घडपड असते. नामवत लेखकाच्या नुसत्या 'पाहीन जमलच तर, नक्की नाही !' ह्या वाक्यावर जाहिरात होते. विनवण्यांची पत्र प्रत्येक डाकेनं येत असतात. आगाऊ घेतलेली रक्कम एव्हाना कामी येऊन गेलेली असते. दिवाळी गेल्यावर सात–आठ महिने प्रकाशकांशिवाय कुणीच सहसा फिरकणार नाही ह्याची निश्चिती असते. वर्षाची बेगमी त्या दीड दोन महिन्यांत करावयाची असते. मग नुसतच लेखन होतं. नेटान केल जातं. त्याची गुणवत्ता–त्याचा *विचार–सपादक व नंतर वाचकांवर* सुपूर्द केला जातो. मागणी झालेलं सारं पुरं करण्याचा–पुरविण्याचा आटापीटा असतो. तुझ्याच शब्दात बोलायच झाल तर सराईत गवळयाच्या इमानानं नेहमीच्या धंद्या तर पुऱ्या करायच्या असतातच पण अधिक मागणी देखील पुरवावी लागते. मग दूध–पाण्याच प्रमाण बदलायचंच. नाही म्हणून चालत नाही ना ! घदेवाईक काय किंवा इतर दुसऱ्या काय, साऱ्याच लेखकांना मागणीबर-हुकुम पुरवठा करायचा असतो. निदान त्यांची तशी घडपड असते.

प्रथितयश लेखकानी आधीच स्वत:-विषयीच्या अपेक्षा विलक्षण उंचावलेल्या असतात त्याच निकषावर वाचक त्या लेखकाच्या लिखाणाची दखल घेतात. तशीच पोच देतात. चाकोरीतले...नेहमीचे...so ! so !... trash...वगैरे. अशा पार्श्वभूमीवर नतरच्या पिढीतला आघाडीवरचा एखादा लेखक वाचक डोक्यावर घेतात. त्याचा उदोउदो होतो. ह्या जगातली त्याची पत वाढते. हळूहळू धाकटया पातीची थोरली पाती होते. त्याला पूर्वीच्या थोरल्या पातीच्याच सुखदु:खाचा वारसा मिळतो...

हा जगन्नाथाचा रथ आहे. जे ओढत असतात ते थकत जातात. त्याची जागा नव्या दमाचे घेतात. थकलेले रथाच्या मागे जातात. जगन्नाथाचा रथ पुढे जातच असतो. थकलेले अधिकाधिक मागे जात असतात–पाहणाऱ्याच्या जाणीवेच्या कक्षेपल्याड. कारण पाहाणाऱ्याची नजर फक्त रथावर केंद्रित झालेली असते. म्हणूनच रथ ओढणाऱ्यांची दखल घेतली जात असते. त्याची जागा दुसऱ्यांनी घेतली की ते मागे जात असतात. पाहणारे आता दुसऱ्याचीच दखल घेत असतात. ज्यानी एके वेळी रथ ओढलेला असतो त्याचं विस्मरण पाहणाऱ्याला होत जातं. लेखकाच्या प्रत्येक पिढीला ह्या अवस्थांतून जावंच लागतं. अपवादभूत एखादा थकता थकत नाही. दमता दमत नाही. मागनं येणाऱ्या काही अनेक पिढयांची तो सोबत करतो. त्याच वेगळेपण जाणवतं. प्रकर्षानं जाणवत. म्हणूनच त्याच विस्मरण पडत नाही. तो सस्मरणीय होतो. त्याचा त्या वेगळेपणासाठी आणि त्याची जागा भरून काढणारा लवकर निघत नाही म्हणूनही ! *मागाहून येणाऱ्या* पिढीच्या नव्या जोमानं त्याची सोबत करणं तेवढ सोपं नसतं म्हणूनच त्याचं मोलही होत !...

* * *

हें काय मला झालंय ? एखाद्या दवाखान्याच्या एखाद्या वॉर्डातल्या खिडकीशी उभा राहून, मी बाहेर दिसणारी ह्या जगातली दृश्ये का पाहतोय ?...ती वर्दळ ..वाहन .... चैतन्यानं चंचल झालेले लोक...रगीबेरंगी प्रसंग...पण ही सारी मी एखाद्या रुग्णाई-

ताच्या परकेपणानं-सुतकी अविचलतेनं का पाहतो ? मी त्या जगात वावरत असताना इतक्या परकेपणानं का पाहतो ?

हे आत्मपरीक्षण होतं की आत्मकथन... ॲनालिसिस् की पोस्टमॉर्टेम...?

खोळ...देवाची शेंदरी खोळ जर पडली तर देवपणाची भावना पाहणाऱ्याच्या मनात जागत नाही. त्याऐवजी एक ओबडधोबड दगड दिसू लागतो.

कपडचांची खळ निघाली की त्याचा कडकपणा जातो. जिद्द...उमेदीची जाणीव... तारुण्य निघून गेलं की ' अंग गतितं पलितं '-सारखी गत होते...खोळ पडलेल्या देवासारखी ...खळ निघून गेलेल्या कपडचासारखी...

प्लास्टर...प्लास्टर काढलं कींच कळते... जुडाई... सिमेंटची...चुन्यांतली...की मातीतली...जुडाई सिमेंटमधली असली तरी पण प्लास्टर काढल्यानं जुडाईला धक्का पोहोचायचा तो पोहचतोच...

खोळ...खळ... ताठा... प्लास्टर......एक कथा...एका चांगल्या कथेची जाणीव...... पुरेसं चिंतन...मग लेखन...निदाव पन्नास—पाऊणशे...!! शिवाय...पी. आर. जवळ देखील स्वतःचं कमिटमेंट नाही ते नाहीच...! तृणाइताची ती अलिप्तताहि आपली नाही... स्वतःच्याच जगाला परकेपणानं पाहणंही आपलं नाही !......

पी. आर.ला लिहिलेल्या पत्राचं एका कथेत रूपांतर ...? पी. आर.च्या पत्राला उत्तर एका कथेच्या माध्यमातून...!

खोळ......खळ...ताठा... प्लास्टर...ह्या पैकी कथा लिहितांना शेवटपर्यंत साथ देईल ते शीर्षक...!

पी. आर. ला तसं कळवायचं?... पुनः कमिटमेंट ? पण कथा लिहून झाल्यावर कळवू ! आधीच काय लिहायचं ? अन नंतर देखील तसं का कळवायचं ? कथा वाचल्यावर पी. आर...समजायचं ते समजेलच. समझनेवालों को इशारा काफी......!

मग पी. आर.च्या पत्राचं उत्तर...नेहमीसारखं..." तुझं पत्र व लेख मिळाला...... गोविंदाच्या आठवणींनी मन भारावून गेलं..." वगैरे वगैरे.

पण कुठं तरी गल्लत होत आहे...विचारांची घालमेल होत आहे...पी. आर. नाही गोविंदा...नाही...मी...मी...मी...मी !!

• • •

शोध आणि बोध

## कळीचा नारद

नारद ही आपल्या पुराणातील एक अजब व्यक्ती आहे. नारद हा ' महर्षी ' या विरुदाने ओळखला जातो. तो भगवान् विष्णूचा अनन्य भक्त आहे. देवांचा हितकर्ता आहे, तरीही मानवदानवांचा तो सखा आहे. तो ब्रह्मचारी आहे तरीही परमप्रीतीचा भाष्यकार आहे. तो अमर आहे, परंतु मर्त्यांविषयी त्याला आत्मीयता वाटते आहे. त्याच्या पायाची चक्रे सदैव फिरताहेत, परंतु त्याच्या मस्तकावरील शिखा मात्र अचल आहे. त्याचा त्रैलोक्यात अप्रतिहत संचार चालू आहे, परंतु त्याची दृष्टी मात्र सत्यलोकावर खिळलेली आहे. या त्रिगुणात्मक सृष्टीच्या अंतर्बाह्य स्वरूपाविषयी त्याचे अखंड चिंतन चालू आहे, परंतु तो आपल्या




हातांतील ब्रह्मवीणेवर सत्त्वभावाचे चिरंतन संगीत निर्माण करीत आहे.

सर्वसाधारण पुराणश्रोते त्याला 'कळीचा नारद' म्हणून ओळखतात, परंतु खरोखर तो ' कलेचा नारद ' आहे. नार म्हणजे पाणी-जीवन. नारद म्हणजे जीवन देणारा, कलेला जो अखंड जीवन देत असतो तो नारद. तो कलावंतांचा आदर्श आहे. कलावंत हा जसा सर्वांशी आत्मीय भावाने समरसतो, दानवांतील देव शोधतो, देवांतील दानव दाखवितो आणि मानवाला मानव्याचे भान करून देतो, तसाच नारद आहे. कलावंतांची कल्पना ज्याप्रमाणे या विश्वात–ज्ञात आणि अज्ञात विश्वात-अप्रतिहत संचार करू शकते, तसाच नारद हा सर्वसंचारी आहे. कलावंताप्रमाणेच तो सर्वांचा सखा असूनही अलिप्त आहे. मुक्त संगीत निर्माण करणारी त्याची ब्रह्मवीणा हे श्रेष्ठतम कलेचे प्रतीक आहे.

रा. चिं. ढेरे

• • •



**या अफाट सृष्टीवर त्यानं आपलं कृपाछत्र धरलं आहे त्या देवावर एक टीचभर मानव छत्री धरू पाहतो ! त्यापेक्षा त्यानं माणसावरच मायाममतेचं अन् माणुसकीचं छत्र धरलं तर !**

# छत्री

सौ. शकुंतला फडणीस

"असून अडचण अन् नसून खोळंबा" या प्रकारच्या यच्चयावत वस्तूंमध्ये छत्रीचा पहिला क्रमांक लागेल. पावसाळ्यात तर हटकून ! "असू दे बरोबर" म्हणून आपण आपलं छत्री घेऊन जावं तर पावसाचा पत्ताच नसतो. बरं, छत्री नेऊ नये तर एकेकदा कोपऱ्यावरच्या टपालपेटीत पत्र टाकून येईपर्यंत भिजून जायची वेळ येते. पाऊस जरा जोरात आला तर छत्री असूनसुद्धा भिजावंच लागतं. पाऊस नसतो तेव्हा तिची जरूरच पडत नाही ! म्हणजे सबंध पावसाळ्यात छत्रीचा उपयोग होतो तरी केव्हा ? तर अगदी गुलाबपाणी शिंपडल्यासारखा नाजुक पाऊस पडतो त्या वेळी छत्रीचा थोडासा उपयोग होतो.

पण असं असूनही पावसाळा आला की छत्र्या खरेदी करण्यासाठी दुकानात झुंबड गर्दी उडते. कुणाला पुरुषी तर कुणाला बायकी छत्री हवी असते. कुणाला साधी काळी तर कुणाला ऐटबाज रंगीत. कुणाला चिटाची, कुणाला घडीची कुणाला झालरीची–अनेक तऱ्हा ! पावसाला सुरवात झाली की छत्र्यांना आमंत्रण ठरलेलं !

पावसाळा म्हणजे छत्र्या हे समीकरण निसर्गानंदेखील मंजूर केलं आहे. एक दोन पाऊस झाले की कोनाकोपऱ्यात छत्र्या उगवू लागतात. कुत्र्याची छत्री म्हटलं की काही जण "ईऽऽ" करून किंचाळतात. त्यात येवढं किंचाळण्यासारखं काय आहे कोण जाणे ! मला स्वतःला तर पावसाळ्यात उगवणाऱ्या या पिटुकल्या छत्र्या फार आवडतात !! त्यांचे रंग, त्यांवरचे चित्रविचित्र ठिपके, त्या ठिपक्यांतून डोकावणाऱ्या मजेशीर आकृति अन् मखमलीसारखी त्यांची तकाकी ! सारं किती मोहक दिसतं. पुनः त्यांत वैचित्र्य किती ! शास्त्रज्ञ सांगतात, रोज एक याप्रमाणे सगळ्या तऱ्हेच्या छत्र्या जमवायच्या म्हटलं तर तब्बल बारा वर्षं लागतील ! फ्रेंच लोक रसिक खरे. ते या छत्र्यांना नुसतं सुंदर म्हणून थांबत नाहीत तर त्यांचा–फंगसचा–सरळ स्वैंपाकांत उपयोग करतात. फंगसचे पदार्थ ते मोठ्या चवीनं खातात.

या नैसर्गिक छत्रीशीं मोहकतेत बरोबरी करणारी आणखी एक छत्री आहे. ती म्हणजे सर्कशींत तारेवरचा नाच करणारी मुलगी धरते ती छत्री. तसली छत्री आपल्याजवळ असावी असं मला अजूनही केव्हां तरी वाटतं. रंगीत रेशमी कापडाची, गुलाबी झिरमिळ्या लावलेली अन् चकचकीत दांड्याची ती देखणी छत्री घेऊन शाळेला जावं असं मला नेहमी वाटायचं. पण तें कुठलं जमायला ? त्या वेळी दुकानात एकजात फक्त काळ्या छत्र्या असायच्या तसली छत्री तर मला मुळीच आवडायची नाही. मग छत्रीची नावड आणि भिजत जायची आवड यांतून छत्री न घेताच शाळेला जायचा हट्ट निर्माण व्हायचा अन् त्यापायी नेहमी मला आईकडून बोलणी खावी लागायची.

बाकी छत्री वागवायचा सगळ्याच मुलांना कंटाळा दिसतो. आमचा राजूच पहा ना ! त्याच्या आईवडिलांनी त्याच्यासाठी


मोठ्या हौशीनं रंगीबेरंगी छत्री आणली आहे. अकरा वाजले की राजूचा सगळा जामानिमा करून, दप्तर डबा भरून अन् छत्री घेऊन आजी त्याला बालकमंदिरात पोचवायला निघतात. चार पावलं चाललं की राजू बूट मोजे काढून फेकून देतो; अन् नाचत बागडत उड्या मारत पळत सुटतो. आणि आजी? ती म्हातारी त्याचं दप्तर, डबा, पाण्याची बाटली, बूट, मोजे, छत्री– सगळं सांभाळत राजूला हाका मारते–

" राजूऽ! ए राजूऽ! छत्री घे रे! पाऊस येतोय्!" पण राजूला त्या पावसाची पर्वा नसते की छत्रीची फिकीर नसते. त्याला मुळी ती छत्रीच आवडत नाही. त्या चार वर्षाच्या पोराला म्हणे "विमानवाल्याची" छत्री हवी आहे अन् ती "विमानवाल्या"ची छत्री घेऊन तो जेट किंवा मिग विमानांतून उडी टाकणार आहे! बरोबर आहे. नव्या पिढीबरोबर नव्या आकांक्षा आल्या. पण छत्रीचा कंटाळा मात्र कायमच राहिला!

बाकी विमानवाल्याच्या छत्रीचा, म्हणजे पॅराशूटचा अनुभव मोठा रोमांचकारी असेल! प्रत्यक्ष विमानातून सफर करण्यापेक्षाही छत्री उघडून हवेतून तरंगत येण्याची कल्पना मोठी अद्‌भुतरम्य वाटते. वैमानिकाची छत्री अस्मानातून तरंगत येते, तर जत्रेतली छत्री जमिनीत पाय रोवून एके जागी उभी असते. दोन्हींत अक्षरशः जमीन-अस्मानाचा फरक!

ही जमीन आणि हे अस्मान ज्यानं निर्माण केलं त्या देवाची आपण मूर्ती बसवतों, आणि या देवमूर्तीवर मोठ्या भाविकपणे चांदीची छत्री धरतो. काय गंमत आहे! या अफाट सृष्टीवर ज्यानं आपलं कृपाछत्र धरलं आहे त्या देवावर एक टीचभर मानव छत्री धरू पाहतो! त्यापेक्षा त्यानं माणसावरच माया-ममतेचं अन् माणुसकीचं छत्र धरलं तर?

• • •





# गायनाचार्य टिपूमियाँ

हा टिपूमियाँ म्हणजे सुप्रसिद्ध गवई मरहूम अब्दुलकरीमखाँ यांचा कुत्रा. या टिपूमियाँला निसर्गतःच स्वराची मोहिनी होती. अब्दुलकरीमखाँ जेव्हा आपल्या शिष्यवर्गाला गाणे शिकवीत तेव्हा हा बाहेर बांधून ठेवलेला टिपूमियाँ वेडेवाकडे स्वर काढी. खाँसाहेबांना वाटे की तो रडत असावा. म्हणून ते त्याला मारून मुटकून गप्प करीत असत. पण थोडा वेळ गेला की परत तो पूर्वीसारखेच वेडेवाकडे स्वर काढीत बसे. असे काही दिवस गेल्यानंतर खाँसाहेबांनी विचार करून त्याला शिकवणीचे वेळी मोकळा सोडण्याचे ठरविले. टिपूमियाँ मग शिकवणीचे वेळी इतर विद्यार्थ्यांप्रमाणे शिकवणीस येऊन बसू लागला.

एक दिवस त्याच्या पाठीवरून हात फिरवीत खाँसाहेबांनी त्याला विचारले की, "क्यों टिपूमियाँ, तुम्हें भी गाना सीखना है?" हा प्रश्न विचारताच त्या टिपूमियाँनें शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या 'उं' या स्वरात 'अ' असा आपला स्वर मिळविला. टिपूमियाँची ही गानलुब्धता आणि स्वरज्ञान पाहून खाँसाबांनी त्यांना गाण्याची तालीम देण्यास सुरवात केली. पुढे हा टिपूमियाँ मोठा गायक झाला व त्याने भारतात अमर कीर्ती मिळविली!

सन १९२२ साली मुंबईस विठ्ठलभाई पटेल रोडवरील अमरोली हाऊस (सध्याचे गिरगांव पोस्ट) येथे या टिपूमियाँचे जाहीर जलसे झाले. अशाच एका जलशाला एका रशियन सर्कसचे मालक व व्यवस्थापक आणि देवल सर्कसचे मालक उपस्थित होते. टिपूमियाँच्या गानकौशल्यावर खूष होऊन त्यानी २५००० रुपयांना टिपूमियाँला खाँसाहेबाजवळ मागणी घातली. जागतिक दौरा आटोपल्यावर टिपूमियाँला आम्ही परत आपले स्वाधीन करू असेही अभिवचन दिले. परंतु खाँसाहेबांनी आपल्या या शिष्योत्तमाला त्यांना देण्याचे नाकारले.

• • •

# पांगळा



### प्रल्हाद पांढारकर

“ पुढेही असाच उशीर होणार असेल तर इथे कारकुनी करून आमच्यावर उपकार कशाला करता जोशी ? सोडून द्या नोकरी. नोकरी सोडल्यानं तुम्ही तरी उपाशी मरणार नाही. पांगळ्यांना कुणीही भीक घालतं ! ”
साहेबानं तात्याच्या काळजावर घाव केला.

ऑफिसची इमारत नजरेस पडली तशी तात्या जोशींच्या काळजाची धडधड जास्तच वाढली. उरलेलं अंतर ते झपाटयानं कापण्याचा प्रयत्न करू लागले. आणि त्यात उजव्या पायाच्या पांगळेपणानं साऱ्या शरीराला बसणाऱ्या विचित्र हेलकाव्यानं तात्या चालताना आणखीच केविलवाणे दिसू लागले.

तात्या जोशी आता चाळिशीच्या घरात आले होते. त्यांचा उजवा पाय जन्मतःच बारीक होता. चालताना उजवा हात उजव्या पायाच्या गुडघ्यावर दाबून त्यांना चालावं लागे. त्यावेळी त्यांना होणाऱ्या यातना त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेल्या पाहिल्या की कुणाही माणसाला त्यांची कीव येई. चालताना पांगळेपणानं त्यांच्या साऱ्या शरीराला विचित्र हेलकावे बसत. त्यामुळं त्यांचं चालणं बऱ्याचदा टवाळखोरांच्या हसण्याचा विषयही होई.

तात्या एका खाजगी ऑफिसात कारकून होते. ह्या कारकुनीवर मिळणाऱ्या कमाईत त्यांना स्वतःचा संसार चालवावा लागे. तप्त भूमीवर पाण्याचा थेंब पडल्यावर तो जसा क्षणार्धात दिसेनासा होतो तशी तात्यांची मिळकतही त्यांच्या संसाराच्या मरुभूमीत केव्हाच गडप होई.

ऑफिसच्या पायऱ्या चढून तात्यांनी आत पाऊल टाकलं. त्यांचं लक्ष नेहमीप्रमाणे भिंतीवरच्या घड्याळाकडे गेलं नि ते आणखीच हबकून गेले. घड्याळात साडे-अकरा वाजून गेले होते. म्हणजे आजही त्यांना अर्ध्या

तासापेक्षा जास्त उशीर झाला होता. आठवड्यापूर्वीही ते असेच ऑफिसात उशीरा आले होते. आणि त्याबद्दल साहेबांनी तात्यांस कडक शब्दात 'वॉर्निंग'ही दिली होती.

कपाळावरचा घाम निपटीत तात्या आपल्या टेबलाकडे जाऊ लागले. जाता जाता त्यांनी आजूबाजूला चोरटी नजर टाकली. सारे आपापल्या कामात चूर होते. निदान तसं दाखवीत होते. साऱ्यांची तोंडं बंद होती. सारं स्तब्ध होतं. नाही म्हणायला छताला लावून असलेल्या पंख्याची 'गुं ऽ गुं ऽ' आणि मिस् गोगटेच्या टाईपरायटरचा खडखडाट कानी पडत होता.

तात्या आपल्या खुर्चीत बसले आणि टेबलावरची फाईल ओढून तिच्यात त्यांनी तोंड खुपसलं. पण कामात काही केल्या लक्ष लागेना. त्यांचं सारं लक्ष साहेबांच्या केबिनच्या दाराकडे लागलं होतं.

कॉलबेलच्या आवाजानं तात्या कावरे-बावरे झाले. त्यांच्या छातीत धडधडू लागलं. नाही नाही ते प्रसंग डोळ्यासमोर दिसू लागले.

कॉलबेलचा आवाज ऐकताच व्हराड्यातल्या बाकड्यावर आरामात विडीचे झुरके मारीत बसलेल्या चपराशाची धांदल उडाली. तोंडातलं विडीचं थोटूक त्यानं झटकन् फेकलं नि तो साहेबांच्या केबिनकडे धावला. तात्यांचं ह्या साऱ्या गोष्टीकडे लक्ष होतं.

चपरासी परत केबिनचं दार लोटून बाहेर आला तो सरळ तात्या जोशीकडे. तात्यांचा उरला सुरला धीरही सुटला.

" साहेबानी आपल्याला आत बोलावलंय." चपरासी त्याच्याजवळ येऊन बोलला.

तात्या धडपडत उभे राहिले. नाइलाजानं केबिनकडे चालू लागले.

नुकतेच बदलून आलेले हे साहेब फार भयंकर कडक होते. कुणाच्या भावनाची किंवा परिस्थितीची आपल्याला मुळीच कदर नाही अशा थाटात ते बोलायचे. कुणालाही ताडकन काहीही बोलून बसायचे. पंधरा-वीस दिवसांतच त्यांनी ऑफिसात भीतीचं वातावरण निर्माण केलं होतं. चपराशापासून हेड-क्लार्कपर्यंत सारे त्याना घाबरून, वचकून असत. त्याच्या केबिनमधल्या टायपिस्ट मिस् गोगटेचीसुद्धा त्यातून सुटका नव्हती.

तात्यांनी केबिनचं दार लोटलं आणि आत पाऊल टाकलं.

"काय मिस्टर जोशी! उशीरा येण्याबद्दल आठवड्यापूर्वीच तुम्हाला 'वॉर्निंग' दिली होती की नाही मी? उशीरा येण्याबद्दलचं कारण तुमच्याजवळ असेलच. पण जरा नवं कारण सांगा. म्हणजे त्यांतही 'व्हरायटी' हवीच." साहेब कुत्सितपणे हसून म्हणाले. त्याचं हसणं फार जहरी होतं. यापेक्षा साहेबांनी दोन-चार शिव्या दिल्या असल्या तरी चाललं असतं असं तात्याना वाटलं.

साहेबापुढं काय नि कसं बोलावं हाच तात्यांना प्रश्न पडला. तात्यांची पत्नी दोन दिवसांपासून आजारी होती त्यामुळं स्वयंपाक, शाळेला जाणाऱ्या मुलांचं जेवणखाण, सारं तात्यानाच करावं लागे. सारं निपटता निपटता त्यांची अतिशय धांदल उडे. पण तरीही ऑफिसच्या वेळेच्या आत ते सारं आटोपून, दोन घास गिळून ऑफिसच्या रस्त्याला लागत. पण आज त्यांना उशीर झालाच. अर्ध्या तासाचा उशीर!

" बोला ना! " साहेब पुन: म्हणाले.

तात्यांनी उशीर होण्याचं कारण सागून टाकलं. साहेबांना ते खरं वाटलं किंवा नाही हे तात्यांना साहेबांच्या चेहऱ्यावरून समजलं नाही. पण साहेबाच्या स्वभावानं उचल खाल्ली.

" मग पुढंही असाच उशीर होणार असेल तर इथं कारकुनी करून आमच्यावर उपकार कशाला करता जोशी! सोडून द्या ही नोकरी. नोकरी सोडल्यानं तुम्ही तरी उपाशी मरणार नाही. पागळ्याना कुणीही भीक घालतं! " साहेबानी तात्यांच्या काळजावर घाव केला.

" साहेब! सांभाळून बोला. " तात्या खवळून म्हणाले. आपल्या पांगळेपणाचा उल्लेख साहेबांनी अशा तऱ्हेनं करावा हे तात्यांना सहन झालं नाही. ते संतापानं वेडे झाले. साहेबाच नरड दाबून त्याचा प्राण घ्यावा असं तात्याना वाटलं. क्रोधानं ते थरथरू लागले. साहेबाच्या छातीवर आणि नोकरीवरही लाथ मारावी नि निघून जावं असं तात्यांना वाटलं.

" साहेब! आपण असं बोलायला नको होतं." मनावर तावा ठेवून तात्या बोलले.

" जा! आपल्या कामाला लागा! तुमचा उपदेश मला ऐकून घ्यायचा नाही. "

तात्या क्षणभर तसेच उभे राहिले नि मग मागं वळले. केबिनचं दार लोटून ते बाहेर आले. आपल्या टेबलाकडे चालू लागले.

बराच वेळ तात्या हताशपणे खुर्चीत बसून राहिले इतराच्या नजरा चुकवीत ऑफिस सुटेपर्यंतचा वेळ कसातरी काढू लागले.

—आणि पुढल्याच महिन्यात तो अपघात घडला. त्यावेळी तात्या आठवड्याची रजा घेऊन बाहेरगावी गेले होते. गावी परत येताच तात्यांना त्या अपघाताबद्दल समजलं तेव्हा त्यांच्या होरपळलेल्या मनाला गारवा मिळाला. बरं वाटलं त्यांना.

मोटार-अपघातात जोशीच्या साहेबाचा एक पाय पार निकामी झाला होता.

तात्यांच्या मन:चक्षूंना साहेबांची पलिस्तरांत पाय असलेली आकृती दिसली आणि त्यांच्या चेहऱ्यावर आसुरी हास्य उमटलं.

त्याच दिवशी सायकाळी तात्या साहेबाना भेटण्यासाठी त्यांच्या घरी गेले.

पायऱ्या चढून तात्या आत गेले त्यावेळी साहेब खाटेवर पडून होते. त्याचा उजवा पाय पलिस्तरात बांधलेला होता.

तात्या साहेबाना नमस्कार करीत जवळच्या खुर्चीत बसले.

अकल्पितपणे तात्यांना समोर पाहताच साहेब हबकून निघाले. तात्यांच्या पागळेपणाचा स्वत: केलेला उल्लेख त्यांना आठवला नि त्याचा चेहरा अगदी केविलवाणा झाला. जोशीना त्यावेळी आपण उगाच बोललो असं त्यांना वाटलं. अपघातामुळं झालेल्या शारीरिक आणि मानसिक त्रासामुळं साहेब अगदी खचल्यासारखे दिसत होते. चेहरा सुकून गेला होता. आठवड्यातच त्यांची गालफडं बसल्यासारखी दिसू लागली होती.

" साहेब! आपल्यावर ओढवलेला प्रसंग कळला तेव्हा फार वाईट वाटल मला. " तात्या साहेबाच्या पायाकडे पाहत बोलले. " पण त्यावेळी मी बाहेरगावी असल्यामुळं मला ही गोष्ट फार उशीरा कळली म्हणूनच आपली भेटही मला लवकर घेता आली नाही.

साहेब स्तब्ध होते.

" आपलं दु:ख मला समजू शकतं साहेब. पण धडधाकट माणसांना मात्र पागळ्यांच दु:ख नाही कळत. आपण दोघंही पागळेच. पण दैवानं पागळपणाचं दु:ख जन्मत:च माझ्या नशीबी मारल्यानं आता ते दु:ख काहीसं बोथट झालं आहे. तुमची गोष्ट मात्र वेगळी आहे. कालपर्यंत तुम्ही धडधाकट होता.

तुमच्यासारख्या धडधाकट माणसाला क्षणाच्या अपघातानं पांगळेपण आलं हे खरोखर दुर्दैव. तुमच्या मनाला किती यातना होत असतील !"

साहेब गप्प होते. त्यांचं लक्ष तात्यांच्या बोलण्याकडे होतं की नाही हे सांगणं कठीण होतं. साहेबांची पत्नी मात्र दारात उभी राहून सारं ऐकीत होती. खिन्नपणे.

"पण इतर माणसांना मात्र पांगळा माणूस म्हणजे थट्टेचाच विषय वाटतो." तात्या पुन्हा बोलू लागले. "त्यांना माणसाच्या भावनांची कदर नसतेच मुळी. आपल्या ऑफिसातले हेडक्लार्क ताह्मणेच घ्या. ते मघाशीच मला म्हणत होते—" आणि बोलता बोलता तात्या एकदम अडखळले. काहीसे अस्वस्थ झालेले दिसले. तसे साहेब चमकले.

"काय ? काय म्हणाले ताह्मणे ?' साहेबांनी घाईत विचारलं.

"अं ! जाऊ द्या. त्यांचं बोलणं मनाला लावून घेण्यात काय फायदा आहे !"

"पण सांगा जोशी ! ताह्मणे काय बोलले ?"

"ते म्हणाले...म्हणाले की आपल्या साहेबांचा आता तैमूरलंग झाला आहे म्हणून."

"काय ! ताह्मण्यांनीं असं म्हटलं ?" साहेबांनी क्रोधानं थरथरत विचारलं. त्यांचा चेहरा लालबुंद झाला. ओठ आणि नाकाच्या पाकळ्या थरथरू लागल्या. पण दुसऱ्याच क्षणी त्यांचे डोळे पाण्यानं डबडबले.

"काय बोलावं नि काय बोलू नये हे तरी समजतं का तुम्हांला जोशी ?" साहेबांची पत्नी पुढं येऊन बोलली, "दुसऱ्यांच्या भावना तरी कळतात का तुम्हांला ?"

"माफ करा हं ! बोलण्याच्या ओघात भलतीकडेच वाहत गेलों मी." तात्यांनी अपराधी चेहऱ्यानं क्षमा मागितली.

त्यानंतर पाच-दहा मिनिटांतच तात्यांनी साहेबांचा निरोप घेतला. ते घराबाहेर पडले. पांगळ्या पायावर हात ठेवून साऱ्या शरीराला विचित्र हेलकावे देत चालू लागले. तात्या ह्या-वेळी समाधानाच्या शिखरावर होते.

कावळ्यानं निष्प्राण चिमणीचं एक एक पीस उपटून काढावं तसं तात्यांनी साहेबांच्या स्वाभिमानाची, गर्वाची आणि भावनांचीही नाजूक रेशमी पिसं उपसून काढली होती.

● ● ●


# उत्कृष्ट मसाला बनवणारे दोनच!



"हे दोन कोण बुआ ?" अशा संभ्रमांत पडण्याचें कारण नाहीं. दोनांपैकीं पहिले तुम्ही स्वत: ! तुम्हीं स्वत: घरीं बनवलेला मसाला उत्कृष्ट असतो याबद्दल तुम्हांला अथवा आम्हांलाहि शंका नाहीं. बाजारांतून सर्व जिन्नस पारखून आणून मेहनतीने बनवलेला मसाला चांगला होणारच ! पण तुमच्यानंतर मात्र आमचा क्रमांक ! तुम्हांला कांहीं कारणाने घरीं मसाला बनवतां आला नाहीं तर बेडेकर मसाला त्याची उणीव भासूं देणार नाहीं. अनेक वर्षांचा खरेदीचा आणि मसाले करण्याचा अनुभव यामुळें आपण आमच्या सर्वच उत्पादनाबद्दल खात्री बाळगूं शकतां.




**व्ही. पी. बेडेकर ॲन्ड सन्स प्रा. लि. गुगभाट, मुंबई ४**
**शाखा–ठाकूरद्वार, दादर, फोर्ट, परेल, पेरूगेट पुणें.**

THE RISE AND FALL OF THE THIRD REICH
या WILLIAM L. SHIRER
यांच्या पुस्तकावर आधारित लेखमाला

# नाझी

*नाझी पक्ष अधिकारपदावर आला ही क्रांतीची पहिली फेरी झाली. या फेरीत जर्मनीतील डाव्या पक्षांचा निकाल लागला. आता उजव्यांचा नायनाट करण्यासाठी क्रांतीचे दुसरे पर्व सुरू झाले पाहिजे असे मानणारा एक मोठा गट नाझी पक्षातच प्रथमपासून होता. या विचारसरणीचे खंदे पुरस्कर्ते होते–अर्न्स्ट रोएम व डॉ. गोबेल्स.*

*‘ माणूस ’ ऑगस्ट १९६४*

: १ :

जून १९६३ मध्ये S. A. स्वयंसेवकांपुढे बोलताना रोएमने आपल्या विचारांना तोंड फोडले. तो म्हणाला—

" The S. A. and the S. S. who bear the great responsibility of having set the German revolution rolling, will not allow it to be betrayed at the halfway mark. It is indeed high time that the national revolution should end and become a national socialist one. We shall continue our fight––with them or without them––and if necessary against them ".

[ या जर्मन क्रांतीला गती देण्याची जबाबदारी S. A. व S. S. संघटनांनी पार पाडलेली आहे व आता अर्ध्यावरच या क्रांतीचा कुणी विश्वासघात करील तर ते चालू देता येणार नाही. आता या राष्ट्रीय क्रांतीचे परिवर्तन राष्ट्रीय समाजवादी क्रांतीत त्वरित झाले पाहिजे. जमले तर त्यांच्या (हे मत मान्य नसलेल्यांच्या) सहकार्याने, न जमले तर त्यांच्याशिवाय व जरूर पडली तर त्यांचा विरोध पत्करूनही, हा लढा पुढे नेण्याचा आमचा निर्धार आहे. ]

अर्थात हिटलरला ही घाई मान्य नव्हती. अजून सरकार पुरते स्थिरावले नव्हते. देशाच्या गंगाजळीत खडखडाट होता. अशा वेळी देशात सुंदोपसुंदी माजवणे म्हणजे आतापर्यंतच्या यशावर पाणी ओतण्यासारखेच होणार हे तो जाणून होता.

म्हणून १ जुलै १९३३ ला हिटलरने इशारा दिला—‘ दुसऱ्या क्रांतीची भाषा जर कोणी करील तर मी त्याचा निष्ठुरपणे बंदोबस्त करीन.’

" I will suppress every attempt to disturb the existing order as ruthlessly as I will deal with the so called second revolulion. "

हिटलरचा दुसऱ्या क्रांतीला असलेला हा विरोध अत्यंत डोळस होता ही गोष्ट त्याने ६ जुलैला राज्य–गव्हर्नरांच्या सभेत केलेल्या भाषणावरून स्पष्ट होते. त्याने सांगितले––

" क्रांती ही देशाची कायम अवस्था राहू शकत नाही. झालेल्या क्रांतीने जी शक्ती व चैतन्य निर्माण झाले आहे ते सर्व आता विधायक कामात मार्गी लावले पाहिजे, म्हणजे हवी असलेली उत्क्रांती शांततेने होईल. प्रत्येक व्यापारी वा भांडवलदार हा आज नाझी नसेल; परंतु तो जर चांगला व्यापारी असेल तर देशाला त्याची गरज आहे. उलट त्याची जागा घेणारा माणूस नाझी असला तरी त्याला धंदा जमेलच असेही नाही "—" In business, ability must be the only standard"—‘ धंद्यात व्यक्तीची लायकी हा एकच निकष लावला पाहिजे,’ हे हिटलरचे ठाम मत होते.

दुसऱ्या क्रांतीला हिटलरने विरोध जाहीर केला व पाठोपाठ २३ सप्टेंबरला न्युरेन्बर्ग येथील भाषणात S. A. संघटना ही राजकीय

# भस्मासुराचा उदयास्त



रा. म. शास्त्री

संघटनाच राहील, सैन्याची जागा व अधिकार या संघटनेला कधीच मिळणार नाहीत ही गोष्ट त्याने स्पष्ट केली.

या धोरणामागेही विचारांची सुस्पष्टता होती. अधिकारावर येताच सेनादल प्रमुख जनरल हॅमरस्टीन ((Hammerstein) व सेनासारंग अॅडमिरल रीडर (Raeder) यांना हिटलरने विश्वासात घेऊन बजावले होते—

" राज्यसत्ता आता लवकरच स्थिरावेल. देशात आता यादवीचा धोका नाही. तुम्ही दोघांनी यापुढे आपले सर्व लक्ष जर्मनीचे पुनर्शस्त्रीकरण करण्याकडे केंद्रित करा." हिटलरच्या सरकारातील संरक्षणमंत्री जनरल ब्लोम्बर्ग याने आपल्या आठवणीत नमूद केले आहे–

" Fuehrer opened a field of activities holding great possibilities for the future ".

[ हिटलरने सैन्यापुढे फार मोठे कार्यक्षेत्र उपलब्ध करून दिले. या क्षेत्रात भविष्यात फार मोठाल्या जबाबदाऱ्या येणार होत्या. ]

हिटलरच्या सशस्त्रीकरणाच्या धोरणामुळे सैन्यात एकच चैतन्य पसरले असताना सैन्याच्या पाठीत खंजीर खुपसण्याची रोएमची कल्पना त्याला कशी मान्य होणार ?

रोएम हा काही झाले तरी एक कर्तबगार माणूस होता ही गोष्ट हिटलर जाणून होता. म्हणूनच नव्या वर्षाच्या नेमणुकीत १–१–१९३४ ला त्याने रोएमची नेमणूक पक्षाचा दुय्यम नेता म्हणून रुडॉल्फ हेसच्या बरोबरीने केली. तसेच सरकारात त्याला मंत्री नेमले. या दिवशी रोएमला लिहिलेल्या पत्रात हिटलर लिहितो—

"आपल्या क्रांतीला आता वर्ष होईल. या वर्धापनदिनी मला तुझे आभार मानणे भाग आहे. प्रिय रोएम—तू नॅशनल सोशॅलिस्ट चळवळीसाठी अनंत खस्ता खाल्या आहेस व चळवळीची व पर्यायाने जर्मन जनतेची फार मोठी सेवा तू केली आहेस. मी हे माझे मोठे सुदैव मानतो की तुझ्यासारखी माणसे यांना मी माझे मित्र मानू शकतो."

प्रेमादराची अपेक्षा ठेवणारा

तुझा

अॅडॉल्फ हिटलर

हे पत्र २ जानेवारी १९३४ ला वृत्तपत्रातून प्रसिद्ध झाले. काही काळ तरी हिटलर आणि रोएममध्ये उठलेले मतभेदाचे वादळ शमले. नव्या वर्षाची सुरुवात मोठी आशादायक झाली.

### परराष्ट्रांना पहिला हिसका

घरच्या आघाडीवर हिटलरची डागडुजी चालू असताना त्याचे लक्ष परराष्ट्रराजकारणात मोठे सावध होते. जर्मनीच्या अंगात फारसे बळ नाही, शिवाय जगाच्या पटावर तो एकाकी आहे या दोन गोष्टी गृहीत धरूनच हिटलरने आपले डावपेच सुरू केले होते. पहिली गोष्ट करणे आवश्यक होते ती म्हणजे व्हर्सायचा तह हळूहळू ठोकरणे. यासाठी प्रथम दोस्ताच्या गोटात परस्पर सशयाची खिडारे पाडणे आवश्यक होते.

१६ मे १९३३ ला प्रेसिडेंट रूझवेल्ट यानी चव्वेचाळीस राष्ट्रप्रमुखाना पत्रे लिहून नि.शस्त्रीकरण व शातता याचे गोडवे गायले होते. १७ मे ला राईशस्टॅगपुढील भाषणात हिटलरने या पत्राचे स्वागत केले. तो म्हणाला—

"काल रात्रीच मला अध्यक्ष रूझवेल्ट यांच्या पत्राची बातमी कळली. रूझवेल्ट याच्या या पत्रामुळे ते आमच्या सरकारच्या आदरास पात्र झाले आहेत. जर जगातील इतर राष्ट्रे आपआपल्याजवळील शस्त्रास्त्रे फेकून देण्यास तयार असतील तर जर्मनी देखील अशा शस्त्रास्त्राचा हव्यास धरणार नाही. शांततेसाठी इतर राष्ट्राच्या पावलावर पाऊल टाकण्यास जर्मनी तयार आहे—"

या भाषणाचे सर्वत्र स्वागत झाले. परंतु या एका भाषणाने हिटलरने जो इशारा दिला त्याकडे कुणाचे लक्ष गेले नाही.

हिटलरने शस्त्रसन्यासाकरता घातलेला 'जर' महत्त्वाचा होता. त्याला पक्के ठाऊक होते, की रूझवेल्टच्या पत्राला कुणीही विचारणार नाही. पोलड–फ्रान्स–रशिया ही राष्ट्रे शस्त्रबल वाढवीतच राहाणार. त्याने उलट एक गोष्ट जाहीर करून टाकली,

"जर इतर शेजारी राष्ट्रे शस्त्रसज्ज राहतील तर जर्मनीही शस्त्रसज्जच राहील!"

व्हर्सायच्या तहातील महत्त्वाचे कलम हिटलरने असे कलम करून टाकले! राजकारणात किमान एवढी मुत्सद्देगिरी तरी आवश्यक नाही का?

'डेली हेरल्ड' 'स्पेक्टॅटर' या इंग्रजी पत्रांनी व अमेरिकन वृत्तपत्रानी हिटलरच्या भाषणाचे स्वागत केले.

अपेक्षेप्रमाणे सर्व दोस्त जाळ्यात अडकताच हिटलरने हिसका दाखवला. हळूहळू रूझवेल्टच्या पत्राची प्रतिक्रिया सुरू झाली. जर्मनीचे वळ आहे, तेवढेच वळ ठेवण्याकरता फ्रान्स–पोलड यानी ८–१० वर्षांचा कालावधी मागितला.

१४ ऑक्टोबरला हिटलरने जिनीव्हा येथील शस्त्रसंन्यास परिषदेतून (Disarmament Conference) व लीग ऑफ नेशन्समधून जर्मनी बाहेर पडल्याची घोषणा करून सर्वांना हादरवून सोडले.

कारण उघड होते. शस्त्रसंन्यास परिषदेतील घटक राष्ट्रे शस्त्रबल कमी करण्याकरता ८–१० वर्षे लावणार; या वेळात जर्मनीने नि.शस्त्र का राहावे? याचा अर्थ जर्मनी आता शस्त्रसज्ज होणार असा होता. गडबडलेले दोस्त एकमेकाना दोष देऊ लागले. जर्मनीच्या या कृत्याविरुद्ध हात उचलण्याचे काम कुणीच केले नाही आणि हिटलरने आतरराष्ट्रीय राजकारणात पहिली बाजी मारली.

लीग ऑफ नेशन्समधून बाहेर पडण्याचा आपला निर्णय हा सर्व देशाचा निर्णय आहे, हे दाखवण्यासाठी हिटलरने या प्रश्नावर सार्वमत घेण्याच्या दृष्टीने राईशस्टॅग बरखास्त करून ११ नोव्हेंबर १९३३ ला निवडणुका जाहीर केल्या.

चार नोव्हेंबरला ब्रेसलाव्ह (Breslov) येथे मेळाव्यापुढे बोलताना हिटलरने आवाहन केले,

"Let history record that on one Eleventh Nov. the German people formally lost their honor; fifteen years later came a twelfth of Nov. and the German people restored their honor."

[इतिहासाला हे नमूद करू द्या, की एका अकरा नोव्हेंबरला जर्मन जनतेची अब्रू गेली. पधरा वर्षांनी एक बारा नोव्हेंबर असा उजाडला, की त्या दिवशी जर्मन जनतेने गेलेली अब्रू पुन प्रस्थापित केली.]

११ नोव्हेंबरला राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात वृद्ध हिंडेनबुर्गने जनतेला विनंती केली—

"उद्या जगाला हे दाखवून द्या, की आम्ही आता पुन: उठलो आहोत. देवदयेने, आम्ही निर्माण केलेले ऐक्य कायम टिकवण्याचा आमचा निर्धार आहे."

या वेळी ह्यूजेनबर्ग धरून अर्धा डझन इतर उमेदवार होते व बाकी सर्व नाझी पक्षाचेच होते. ९२% मते नाझी पक्षाला या प्रश्नावर मिळाली. निकाल जाहीर होताच सगळा देश एका नव्या स्वाभिमानाने उजळून निघाला.

### पोलंड! भेदनीतीचा प्रयोग

लीग ऑफ नेशन्समधून बाहेर पडण्याच्या निर्णयाला देशाचा एकमुखी पाठिंबा मिळताच हिटलरने दुसरे पाऊल उचलले. १४ नोव्हेंबरला त्याने पोलिश वकील जोसेफ लिपस्की (Josef Lipski) याला भेटीसाठी पाचारण केले. वाटाघाटी संपल्यावर जे सयुक्त पत्रक काढण्यात आले, त्यामुळे केवळ जगालाच नव्हे तर जर्मन जनतेलाही धक्का बसला. या पत्रकान्वये—

'जर्मन सरकार व पोलंड सरकार याचे याबाबतीत मतैक्य झाले, की दोघांच्या सरहद्दीचा वादग्रस्त प्रश्न दोन्ही सरकारे वाटाघाटीनी सोडवतील व याकरता बलाचा वापर निषिद्ध मानला जाईल.'

दोस्तांनी पूर्व प्रशियाचा लचका तोडून तो पोलंडला देऊन मध्ये पोलिश कॉरिडॉर निर्माण केले होते. डॅन्झिग बदर, पोसेन प्रात व सायलेशिया हा भाग पोलडला जोडला होता. अशा या पोलडबरोबर शांततामय वाटाघाटी! जनतेला काही समजेना.

परंतु या तिढ्या पवित्र्यात हिटलरला जी गोष्ट साधावयाची होती ती कुणाच्या लक्षात आली नाही. पोलंडचा निकाल लावावयाचा तर त्याला आधी फ्रान्सपासून फोडणे आवश्यक होते. याचबरोबर जर्मनी लीग ऑफ नेशन्समधून बाहेर पडण्यामुळे जो संशय सर्वत्र निर्माण झाला होता, त्याला एकदम आळा बसावा हाही हिटलरचा उद्देश होता. पोलंडशी, फक्त पोलंडशी वाटाघाट करून पोलंड प्रश्न सोडवावयास तयार झाला व उद्या पोलंडशी आपले जमले नाही तर पोलंडच्या मदतीला येण्याची जबाबदारी इतरावर पडणार नाही. या परिस्थितीचा फायदा जर्मनीला मिळेल. हिटलरचे हे सर्व कयास तंतोतंत खरे ठरले.

शिरर यासबंधात म्हणतो, की जनतेला तावडतोब आकलन न होणाऱ्या काही अप्रिय गोष्टी अतिम यशासाठीच काही काळ राजकारणात कराव्या लागतात व त्याचे आकलन त्याचा योग्य तो उपयोग करून घेतल्यावरच जनतेला होऊ शकते. अशा अप्रिय गोष्टी लोकशाही रचनेत करता येत नाहीत. राजकारणातल्या डावपेचातील पेंचच उघडे पडतात. सर्वाधिकारी राज्ययत्रात अशा अप्रिय गोष्टी काही काल जनतेची पर्वा न करता करण्याचे स्वातंत्र्य रहाते हा मोठाच फायदा होतो.

[ One of the advantages of dictatorship over Democracy was that, unpopular policies which promised significant results ultimately could be persued temporarily without internal rampus. ]

२६ जानेवारी १९३४ ला पोलंड व जर्मनी यांनी दहा वर्षांचा अनाक्रमणाचा करार जाहीर केला. या पोलंडच्या कृत्याने फ्रान्स रुष्ट झाला व अखेर हा करार संपण्यापूर्वीच पोलंडचा जर्मनीने निकाल लावला !

३० जानेवारी १९३४ ला अधिकाराच्या पहिल्या वाढदिवशी आपल्या एक वर्षाच्या कारकीर्दीकडे हिटलरने अभिमानाने नजर टाकली —

(१) वायमार प्रजासत्ताक उलथले होते.
(२) नाझी पक्षाचा नेता म्हणून हिटलर जर्मनीचा सर्वाधिकारी झाला होता.
(३) राज्य सरकारे मध्यवर्ती सरकारची केवळ शासकीय विभाग झाली होती.
(४) कामगारांमधून कम्युनिस्टाचे उच्चाटन झाले होते.
(५) सर्व सार्वजनिक सस्थांतून ' ज्यू ' ची हकालपट्टी झाली होती.
(६) लीग ऑफ नेशन्समधून फुटल्यामुळे जर्मनीच्या भोवतीचा दोस्ताचा फास सैल झाला होता.
(७) पोलंडचा मासा गळाला अडकला होता.

केवळ बारा महिन्यांत एवढ्या सर्व गोष्टी जगाच्या इतिहासात क्वचितच कुणी साध्य केल्या असतील.

## अंतर्गत सत्तास्पर्धा !

हिटलरने आपल्या पहिल्या वर्षाच्या कारकीर्दीत पुष्कळशा गोष्टी साध्य केल्या असल्या तरी दुसऱ्या वर्षाची सुरुवात काही स्वस्थतेत झाली नाही. रोएम्‌ला मंत्री नेमले, उपनेता नेमले तरी त्याचे समाधान झाले नव्हते.

फेब्रुवारी १९३४ मध्ये रोएम्‌ने मंत्रिमंडळाला एक लांबलचक निवेदन सादर केले. या निवेदनात S A. संघटना ही नवीन जर्मन देशाच्या सैनिकाचा गाभा मानण्यात यावा अशी सूचना त्याने मांडली. *या नवीन सैन्याचे आधिपत्य एका संरक्षण मत्र्याकडे असावे* अशीही त्याची सूचना होती. त्याचा अदाज होता, की पर्यायाने या सैन्याच्या आधिपत्त्याचा मान आपल्याकडेच येणार.

या सूचनेला हिटलरने पाठिंबा दिला नाहीच, उलट त्यावेळचे इग्लंडचे परराष्ट्रमंत्री अँथनी ईडन हे जर्मनीला शस्त्रसन्यास परिषदेतील पेचप्रसंग सोडवण्यासाठी आले असता हिटलरने S. A. संघटनेत दोन-तृतीयाश कपात करण्याचेच मान्य केले. ही गोष्ट रोएमला कळताच रोएम व संरक्षणमत्री ब्लोमबर्ग याच्यात उघड खटके उडू लागले.

हिटलरच्या डोळ्यापुढे यावेळी रोएमपेक्षा फार पुढची दृष्टी होती. एप्रिलमध्ये हिटलरला निश्चित कळाले होते, की हिंडेनबर्ग आता फक्त काही दिवसांचाच सोबती आहे. तेव्हा हिंडेनबर्गनंतर अध्यक्षपद रद्द करून कदाचित् सैन्य पुन्हा होहेनझोलर्न राजपद प्रस्थापित करण्याची शक्यता होती. ही गोष्ट हिटलरला नको होती. काहीतरी लगेच तातडीने करणेच आवश्यक होते.

हिटलरने या दृष्टीने पहिले पाऊल उचलले. १६ मे १९३४ ला हिटलरने उच्च सैनिकी व आरमारी अधिकाऱ्याशी बोलणी केली, व एक करार केला. या करारान्वये सैन्याला उत्पन्न झालेला S. A. संघटनेचा धोका हिटलरने नाहीसा करावा असे ठरले व या बदल्यात हिंडेनबुर्गच्या पश्चात हिटलरलाच अध्यक्ष करण्याची सूचना सैन्याने स्वीकारली.

शिररने सैन्यदलाच्या या निर्णयासंबंधी म्हटले आहे, की सैन्याने आपल्याच गळयात या कराराने धोंड बांधून घेतली.

( *For the army this political decision was to prove of* historic significance. It was digging its own grave. As for Hitler the deal would make him the Supreme Dictator. ]

नाझीपक्षांतील सत्तास्पर्धेला आता खरे तोंड लागले. रोएम व गोबेल्स हे एका बाजूला व गोअरिंग, हिमलरसह हिटलर दुसऱ्या बाजूला अशी ही रस्सीखेच सुरू झाली. १ एप्रिलला गोअरिंगने हिमलरला S. S. संघटनेचा प्रमुख नेमून अनिर्बंध सत्ता हिमलरकडे दिली. यापूर्वी गोअरिंग हा स्वतः हिंडेनबुर्गच्या नेमणुकीनुसार सर्वश्रेष्ठ सैन्याधिकारी झाला होता.

जनरल व्हॉन स्लायशर हा काही दिवस इटालीत काढून पुन्हा परतला होता. पॅपेनला हुसकून पुनः व्हाइस चॅन्सेलर होऊन पॅपेनचा हिशोब चुकता करण्यासाठी हा आतूर होता. आता त्याने रोएमशी संधान बाधले. स्ट्रासरही त्यांना सामील झाला. ब्रुएनिंग-रोएम-स्लायशर-स्ट्रासर ही चौकडी हिटलरविरोधी कारस्थाने करू लागले आहेत अशी निश्चित बातमी गोअरिंग व हिमलर याना लागली. अर्थात यांचा हेतू हिटलरला खाली खेचण्याचा नसून त्याला गोअरिंग हिमलरपासून फोडण्याचा होता.



पहिली भेट... !

मे १९३४ अखेर ब्रुएनिंग व स्लायशर यांना त्यांचा खून होणार अशी धमकीची पत्रे आली. ब्रुएनिंग हा वेषांतर करून जर्मनीबाहेर पळाला व स्लायशर बव्हेरियात निघूत गेला. यापैकी जूनअखेर स्लायशर परत बर्लिनमध्ये आला.

मे महिना उजाडला. अखेरचा प्रयत्न म्हणून हिटलरने रोएमला बोलावून त्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. रोएमने त्याला सर्व प्रकरण मिटल्याचे आश्वासन दिले.

रोएमने बर्लिन सोडण्यापूर्वी हिटलरला म्युनिकजवळील वाइसी (Wiessee) या गावी S. A. पुढाऱ्यांशी बोलणी करण्यासाठी बोलावणे केले. हिटलरने हे निमंत्रण स्वीकारले. परंतु फार कल्पनातीत भयानक प्रकारे !

मे महिना असाच संपला. रोएमच्या हालचाली हिटलरच्या नंतरच्या सांगण्याप्रमाणे या सुमारास अधिकाधिक गूढ होऊ लागल्या. खरे खोटे अर्थात् देव जाणे ! कारण रोएमचा काटा काढायचे ठरले असेल तर त्याला बदनाम करणेच आवश्यक होते. (Give the Dog a bad name and shoot.)

जून १४ ला हिटलरने विमानाने व्हेनिसला मुसोलिनीला भेटण्यासाठी प्रयाण केले. ही भेट आधीच ठरली होती. या भेटीत मुसोलिनीने आपल्या सर्व वैभवाचे प्रदर्शन केले. त्यामानाने हिटलर साध्याच वेषात या समारंभातून वावरला. त्याने फॅसिस्ट संचलने पाहिली व काहीशा अस्वस्थ चित्तानेच ती भेट उरकली. त्याचे सारे लक्ष आपल्या देशातील घडामोडींकडे लागले होते.

१७ जूनला जर्मनीला परतताना हिटलरने आपल्या विश्वासू सहकाऱ्यांना गेरा (Gera) येथे इटली-दौऱ्याचा वृत्तांत सांगण्यासाठी बोलावले. या दिवशी रविवार होता.

हिटलर इटालीला गेला असता जर्मनीत पॅपेनने एक उपद्व्याप केला. त्याने हिंडेनबुर्गची गाठ घेतली. हिटलरच्या अनुपस्थितीत तोच चॅन्सेलर नव्हता का? वृद्ध हिंडेनबुर्गने त्याला सांगितले—

"Things are going badly, Papen. See what you can do to put them right."

[लक्षणे ठीक दिसत नाहीत. तेव्हा पॅपेन, तुला काय करता येईल ते करून गोष्टी पुन: मार्गी लागतील असे कर.]

**पॅपेनची गळचेपी**

पॅपेन हा आधीच बिनबुडाचा होता. हिंडेनबुर्गच्या या सल्ल्याने तो अगदीच कामातून गेला. त्याला वाटले, आता या देशाचे सारे भलेबुरे केवळ आपल्यावरच अवलंबून आहे; पुरेसा फौजफाटा मागे नसताना हा कीलोत्पाटी उद्योग खरे पाहता त्याने करू नये, परंतु अशी माणसे प्रत्येक नेतृत्व कळपात असतातच. याच सुमारास, दि. १७ जूनलाच (Marburg) विद्यापीठात पॅपेनला भाषणासाठी बोलावणे आले. अेडगर जंग (Edgar Jung) व हर्बर्ट बोसे (Bose) या आपल्या दोन चिटणीसांकडून पॅपेनने भाषण लिहवून घेतले. जंग हा चांगल्यापैकी वकील व लेखक होता. त्याने पॅपेनला उत्तम भाषण लिहून दिले. पॅपेनने हे भाषण स्वतःचे म्हणून वाचून दाखवले. यातील सुंदर वाक्य पहा—

'Openmanly discussions would be of more service to the German people.

Great men are not created by propoganda.

No organization, no propaganda, however excellent, can alone maintain confidence in the long run. Only by talking things over to the people, their confidence can be maintained.'

[उघड रांगडी चर्चा हीच जर्मन जनतेला अधिक हितावह ठरणार आहे.

केवळ प्रचाराने थोर पुरुष निर्माण होत नाहीत.

एखादी संघटना किंवा केवढाही अत्युत्तम प्रचार हाच केवळ लोकांचा विश्वास संपादन करू शकणार नाही. याला एकच मार्ग आहे; आणि तो म्हणजे लोकांना विश्वासात घेऊन त्यांच्यापुढे सर्व गोष्टी मांडणे. यामुळेच त्यांचा विश्वास टिकू शकेल.]

पॅपेनच्या या भाषणाचा वृत्तांत दि. १८ ला पॅपेनच्याच वृत्तपत्रातून हिटलरला कळताच तो विलक्षण संतापला. गोबेल्सने तात्बडतोब पॅपेनचे हे भाषण इतरत्र येणार नाही अशी व्यवस्था केली. पॅपेनला ही गोष्ट कळताच त्याने २० जूनला हिटलरकडे तक्रार केली की, एक य:कश्चित मंत्री हा व्हाईसचॅन्सेलरचे भाषण कसा गुदमरवू शकतो? रागारागाने पॅपेनने आपला राजीनामा हिटलरच्या हाती ठेवला. सुंठीवाचून खोकला गेला !

दि. २१ जूनला हिटलर संरक्षणमंत्री ब्लोमबर्गसह हिंडेनबुर्गला भेटावयास गेला.

आजारी हिंडेनबुर्गने काही मिनिटातच मुलाखत संपवली. त्याने परत हिटलरला एवढेच सांगितले, की "देशात पुन: S. A. संघटनेने बंडाळी केली तर मी राज्यकारभार सैन्याचे हाती देईन."

हिटलर उमजला की फासे पुनः उलटसुलट दान घेऊ लागले आहेत. आता सैन्याचा विश्वास टिकवायचा तर एकच मार्ग होता.

S. A. संघटनेचा व रोअेमचा खातमा करायचा ! !

## विरोधकांचे शिरकाण

ज्याच्या पाठिंब्याने व कर्तृत्वाने व ज्या स्वयंसेवकांच्या जोरावर हिटलर चॅन्सेलर झाला त्याच रोएम व S. A. स्वयंसेवकांचा बीमोड करावयाचा !

हिटलरचे मन कच खाऊ लागले. त्याचे खरोखरच रोएमच्या कर्तृत्वावर प्रेम होते. यावेळी गोअरिंग व हिटलर यांनी नेट धरला, की रोएमला संपवल्याखेरीज आपला मार्ग निर्वेध नाही. अशांतता संपणार नाही.

अखेर चॅन्सेलर या नात्याने हिटलरने हिमलरला आज्ञा दिली, की त्याने रोएम व त्याचे पाठीराखे यांचा कायमचा बंदोबस्त करावा.

२८ जूनला एका लग्नाचे निमित्त काढून हिटलरने बर्लिन सोडले.

२९ जूनला जनरल ब्लोमबर्ग याने खास पत्रक काढून सैन्य हिटलरच्या मागे उभे आहे असा जाहीर निर्वाळा दिला !

सैन्याचा दणका येताच गोब्रेल्सने धावत जाऊन हिटलरचे पाय धरले व त्याने आपण रोएमचा पदर सोडल्याची कबुली दिली.

ठरल्याप्रमाणे हिटलरची वाट पहात रोएम व त्याचे निकटवर्ती वाइसी (Wiessee) या गावच्या एका हॉटेलात गोळा झाले होते. २९ जूनला रात्री रोएम व त्याचे उजवे डावे हात गाढ झोपी गेले होते.

पहाट झाली. चार वाजता हिटलर हा आपल्या निवडक सहकाऱ्यांनिशी विमानाने म्युनिकला उतरला, व उजाडतांच वायसी या गावी मोटारने पोचला. ज्या हॉटेलात रोअेम व त्याचा प्रमुख साथीदार हेन्झ (Heines) हे दोघे झोपले होते, त्या ठिकाणी हिटलर आणि त्याच्या साथीदाराच्या मोटारी येऊन थडकल्या.

दारावर धडका मारून हेन्झ व त्याचा आणखी एक दोस्त ह्यांना खेचून बाहेर काढण्यात आले व हिटलरच्या आज्ञेनुसार त्यांना हॉटेलच्या बाहेरच गोळ्या घालण्यात आल्या. रोअेमला हिटलरने बराच छेडला व पकडून म्युनिक येथील स्टॅडहेल्म (Stadelhelm) तुरुंगात त्याला आणले.

'बिअर हॉल' प्रकरणात हिटलरबरोबरच रोअेमला प्रथम तुरुंगात टाकण्यात आले होते. १८ वर्षांनी आज हिटलरनेच रोअेमला कैद केले होते.

रोएम जिवंत राहावा अशी हिटलरची इच्छा नव्हती. परंतु त्याला प्रत्यक्ष मारण्यासही त्याचा हात उचलत नव्हता. त्याने अखेर आज्ञा दिली, की तुरुंगाच्या कोठडीत एक भरलेले पिस्तूल ठेवण्यात यावे !

पिस्तूल ठेवले गेले. यानंतरची हकिकत १९५७ मध्ये म्युनिक येथील न्यायालयात एका S. S. अधिकाऱ्यानेच सांगितली, कारण तो त्यावेळी प्रत्यक्ष तिथे हजर होता.

'आत्महत्या करण्याचे रोएमने नाकारले. त्याने सांगितले, की जर मला मारायचेच असेल तर स्वतः हिटलरने मला गोळी घालावी. ("If I am to be killed, let Adolf do it himself.")

अखर हिटलरचे दोन S. S. अधिकारी पुढे झाले. त्यांनी पिस्तुले रोखली. रोअेम काही बोलणार तोच त्याला गप्प राहण्यास सांगून त्यांनी गोळ्या झाडल्या. रोएम रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. रोएमचा शेवट हा असा झाला."

१. रोएम : २. हिमलर




काट्यांमागील काटा !

*

ज्या क्षणी रोएमवर गोळ्या सुटल्या त्याच सुमारास बर्लिनमध्ये स्लायशरचा निकाल लावण्यात आला. स्लायशर झोपला होता. हिमलरच्या S. S. सैनिकांनी त्याला उठवले. तो दरवाजात येऊन त्याने दरवाजा उघडला मात्र !—रिव्हॉल्व्हरमधून गोळ्या सुटल्या व स्लायशरच्या बायकोच्या देखत त्याला यमसदनास धाडण्यात आले होते. त्याची बायको पुढे धावली—ती उरलेल्या गोळ्यांची धनी झाली.

गोअरिंगच्या आज्ञेप्रमाणे ग्रेगॉर स्ट्रायसरला दुपारी अटक करण्यात आली.

हे सर्व होत असतानाच पॅपेनचा फोन तोडण्यात आला व त्याच्या घराभोवती S. S. सैनिकांनी गराडा घातला होता. त्याच्या ऑफिसात शिरून एडगर जंग (ज्याने पॅपेनला भाषण लिहून दिले) याला पकडण्यात आले. तुरुंगात कोंडून S. S. सैनिकांनी त्याला गोळ्या घातल्या.

३० जून १९३४ च्या एका दिवसात म्हणण्यापेक्षा सकाळच्या काही तासातच S. S. सैनिकांनी हिटलर व गोअरिंग यांनी पुरवलेल्या यादीप्रमाणे ४०१ लोकांचे बळी घेतले. ही संख्या १००० असावी असाही अंदाज आहे.

३० जूनला सकाळी सुरू झालेले हे हत्याकांड दुपारी संपले.

१ जुलै १९३४ ला हिंडेनबुर्गचे हिटलरला आभारप्रदर्शक पत्र आले. या पत्रात ठाम निर्णय घेऊन त्वरित उपाय योजल्याबद्दल त्याने

हिटलरची पाठ थोपटली होती. देशद्रोह्यांना कडक शासन केल्याबद्दल गोअरिंगचाही त्याने गौरव केला.

१३ जुलैला राओशस्टॅगपुढे हिटलरने आपल्या या हत्याकांडाचे समर्थन करताना अनेक कारणे सागितली. या कारणांत रोएमने परदेशीय वकिलातीशी सधान बाधले होते या आरोपापासून तों रोएम व हेन्झ हे समलिंगी आकर्षण असणारे (Homosexuals) अनैतिक वागणुकीचे दास होते येथपर्यंत कारणे सागितली. यांपैकी एका गोष्टीकरताही त्यांना गोळ्याच घालायला हव्या होत्या असे हिटलरने सागितले. ( परंतु ही गोष्ट यापूर्वीच हिटलरच्या कानावर घातली असता—' मला अनुयायांच्या चारित्र्याशी कर्तव्य नाही '— असा जवाब हिटलरनेच दिला होता. ) अखेर हिटलरने इशारा दिला—

" Everyone must know for all future time, that if he raises his hand to strike the State, certain death is his lot. "

(प्रत्येकाने यापुढे समजून राहावे, की जर देशाविरुद्ध त्याने काही हात उचलला तर देहान्त शासनच त्याच्या कपाळी येईल.)

### हिटलर सर्वाधिकारी होतो

सैन्याशी झालेल्या करारातील S. A. संघटना मोडून काढण्याची अट हिटलरने भयानकरीत्या पुरी केली होती. लवकरच सेनाधिकाऱ्याना आपला शब्द पाळण्याची वेळ येऊन ठेपली.

२ ऑगस्ट १९३४ ला सकाळी ९ वाजता वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्ध हिंडेनबुर्ग निधन पावला. हिंडेनबुर्गच्या निर्वाणानंतर फक्त ३ तासात असे जाहीर करण्यात आले, की यापुढे अध्यक्षपद व चॅन्सेलर-पद ही एक करण्यात येत आहेत व यापुढे ॲडॉल्फ हिटलर हाच राष्ट्राचा सर्वाधिकारी व सैन्याचा सरसेनापती या दोन्ही जबाबदाऱ्या स्वीकारीत आहे. अध्यक्ष हे नामकरणच रद्द करण्यात येऊन हिटलर हा ' फ्यूरर ' व ' चॅन्सेलर ' अशी दोन बिरुदे यापुढे वापरील असेही या घोषणेत सांगण्यात आले.

सैन्यावरची आपली पकड घट्ट करण्यासाठी फ्यूरर हिटलरने तावड-तोब दोन गोष्टी केल्या. १९ ऑगस्टला त्याने या नव्या घोषणेला लोकांचा एकमुखी पाठिंबा आहे हे दाखविण्यासाठी सार्वमत जाहीर केले.

हिंडेनबुर्गचा मुलगा ऑटो व्हॉन (Otto Von) हिंडेनबुर्ग याने १५ ऑगस्टला रेडिओवरून लोकांना आवाहन केले–

" My father had himself seen in Adolf Hitler his own direct successor and I am acting according to my father's wishes when I call on all German men and women to vote for the handing over of my father's office to the Fuehrer and Reich Chancellor. "

(माझ्या वडिलानी आपला वारस म्हणून ॲडॉल्फ हिटलरचीच निवड केली होती आणि मी वडिलाचीच इच्छा आपणास सागत आहे, की सर्व जर्मन स्त्री-पुरुषानी माझ्या वडिलाचे सर्व अधिकार यापुढे फ्यूरर व चॅन्सेलर हिटलर याना सुपूर्त करण्याच्या निर्णयाला पाठिंबा द्यावा.)

जर्मनीच्या पराभवानंतर पॅपेनन पुढे साक्षीत असे सागितले की हिंडेनबुर्गची इच्छा जर्मनीत राजघराणे गादीवर आणावे अशी होती. व हिंडेनबुर्गचे हे मृत्युपत्र हिटलरने केव्हाच हडप केले होते. पॅपेनचे म्हणणे खरे मानले तरी एक ऑगस्टला हिंडेनबुर्गने हिटलरला जे प्रशस्तिपत्रक दिले त्याचे काय ? कुठल्याही बाजूने विचार केला तरी तत्कालीन परिस्थितीत नेतृत्वाची जबाबदारी हिटलरकडेच आली असती. हिटलरचे कौशल्य एवढेच की त्याने सैन्यावरही तत्क्षणीच कबजा केला.

१९–८–१९३४ ला ९५ टक्के मतदान होऊन हिटलरकडे सर्वाधिकार द्यावा असा निर्णय राष्ट्राने दिला. फक्त पाच टक्के मतदान विरोधी झाले.

हिटलरने लगेच सर्व सैन्यदलाकडून नवी निष्ठेची शपथ घेववली. या शपथेत मूळ जर्मन राष्ट्र या जागी फ्युरर व चॅन्सेलर हे शब्द आले. म्हणजे आता प्रत्येक सैनिकाची निष्ठा ही व्यक्तिशः हिटलर-कडे आली.

४ सप्टेंबर १९३४ ला न्यूरेन्बर्ग येथे नाझीपक्षाचा जो मेळावा झाला त्याला शिरर स्वतः पत्रकार म्हणून हजर होता. यावेळी शिररला हिटलर असा दिसला–

" I watched him stride like a conquering emperor, while the band blared forth and thirty thousand hands were raised in the Nazi salute. A few moments later, he sat proudly on the centre of the vast stage with folded arms and shining eyes, as Adolf Wagner read the Fuehrer's proclamation. "

(एखाद्या प्रतापी नृपाप्रमाणे तो रुबाबदार पावले टाकीत होता. बँडचे संगीत वाजत असतानाच तीस हजार हातानी त्याला नाझी पद्धतीने सलामी दिली. काही क्षणांनंतर तो प्रचंड व्यासपीठाच्या मध्यभागी येऊन बसला. त्याने हातांची घडी केली होती व त्याचे डोळे चमकत होते. मग ॲडॉल्फ वॅगनरने फ्यूररचा फतवा वाचण्यास सुरुवात केली.)

## : २ :

## नाझी जर्मनीतील जीवन

३० जून १९३४ ला हिटलरने नाझीपक्षाच्या शुद्धीकरणाकरता जो रक्तपात केला त्याची झळ सामान्य माणसाला फारशी लागली नाही. यावेळी जर्मनीला भेट देणाऱ्या असंख्य परकीय प्रवाशाना असे कधीच भासले नाही की, जर्मनीत दंडुकेशाहीचे जोरावर राज्य चालू आहे. रशियाप्रमाणे हिटलरने आपल्या राज्याभोवती लोखंडी पडदे (Iron Curtains) सोडले नाहीत. राजद्रोह्यांना शासन करण्याकरता उघडलेले खास तुरुंग (Concentration Camps) व लष्करीदृष्टचा गुप्त असलेले भाग एवढे सोडून प्रवाशाना जर्मनीत कुठेही जाण्यास मज्जाव नव्हता.

जर्मनीवर १९१८ मध्ये ज्याने विजय मिळविला तो इंग्लंडचा पंत-प्रधान लॉइड जॉर्ज, १९३५ मधे जेव्हा जर्मनीला भेट देण्यास गेला, तेव्हा हिटलरच्या कर्तृत्वाने इतका भारला गेला, की ' हिटलर ह



विद्यार्थ्यांनो ! जर्मनविरोधी भावनांचा धिःकार करा !

→ जे जे नाझी जर्मनीविरुद्ध लिहिले गेले होते, व जर्मनीत पोचले होते ते ते विद्यार्थ्यांनी भस्मसात् केले.




नाझीं स्वयंसेवकांनी ज्यूंच्या दुकानांवर निरोधने सुरू केली.

एक थोर पुरुष आहे ' असे त्याने लगोलग जाहीरपणे सांगितले. १९३५ च्या ऑगस्टमध्ये बर्लिनला ऑलिंपिक सामने झाले. त्यावेळी जगाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या सर्व खेळाडूंचे जर्मनीने अभूतपूर्व स्वागत केले व परत जाताना प्रत्येकाने भरभराटीस येणाऱ्या, बेकारी औषधालाही नसलेल्या जर्मनीचे चित्र आपल्याबरोबर नेले.

वरवर पाहाणाऱ्याला जर्मनजीवनात घडणारे बदल लक्षात आले नाहीत, तरी हळूहळू जर्मनीच्या जीवनात विलक्षण क्रांती घडू लागली होती. १९३५ साली, न्यूरेम्बर्ग कायद्याने ज्यूंचे जर्मनीचे नागरिकत्व काढून घेण्यात आले. ज्यू व आर्यवंशातील जर्मन यांच्यात विवाह-संबंध बेकायदेशीर ठरविण्यात आला. कुठल्याही ज्यू माणसाला ३५ वर्षांखालील जर्मन तरुणीला, नोकरीस ठेवण्यास बंदी करण्यात आली.

सरकारी नोकऱ्यांतून, वृत्तपत्र कचेऱ्यांतून, शिक्षणक्षेत्रांतून, सिनेमा, संगीत, नाटक आदि कलाक्षेत्रांतून, ज्यूंची हकालपट्टी होऊ लागली होती.

पुष्कळ दुकानांवर पाट्या लागल्या ' ज्यूंसाठी हे दुकान नाही ! '

१० मे १९३३ पासूनच नाझी विद्यार्थ्यांनी जर्मनविरोधी पुस्तकांच्या होळ्या पेटविण्यास सुरवात केली होती. जे जे नाझी जर्मनीविरुद्ध लिहिले गेले होते, व जर्मनीत पोचले होते ते ते विद्यार्थ्यांनी भस्मसात केले. थॉमस्‌न्, जॅकोब वेसरमान, स्ट्रीफन झ्वाइग्, अल्बर्ट आईन्सटाइन इत्यादी ज्यू लेखकांबरोबर जॅक् लंडन, अप्टन सिंक्लेर, मार्गारेट सँगर, एच. जी. वेल्स, हॅवलॉक एलिस, फ्रॉईड, झोला आदि परदेशीय लेखकांच्या पुस्तकांना अग्निसमर्पण करण्यात आले. पुष्कळवेळा गोबेल्सच्या अध्यक्षतेखाली ही जाळपोळ केली जाई.

जर्मनीत प्रसिद्ध होणाऱ्या प्रत्येक पुस्तकाचे हस्तलिखित, प्रचार-मंत्री गोबेल्स याच्या यंत्रणेने मान्यता दिल्याखेरीज आता प्रकाशक हाती धरत नसत.

वृत्तपत्राच्या संपादकांना गोबेल्सने आदेश दिला होता की ज्यायोगे लोकांमध्ये गैरसमज पसरतील, जर्मन राष्ट्राची शक्ती ज्यामुळे क्षीण होईल किंवा जर्मनसंरक्षण व्यवस्थेवर व संस्कृतीवर ज्याने आघात होईल, जर्मनीच्या स्वाभिमानाला ज्यामुळे तडा जाईल असे काहीही वृत्तपत्रातून प्रसिद्ध होता कामा नये.

१७०४ पासून चालू असणारे, लंडनच्या ' टाइम्स ' इतके किंवा ' न्यूयार्क टाइम्स ' इतके ज्याचे महत्त्व होते त्या ' VOSSICHE ZEITNNG ' या वृत्तपत्राची मालकी उलेस्टाइन (Ullstein) या ज्यू कुटुंबाकडे होती. सतत २३० वर्षे चालू असलेले हे बलाढ्य वृत्तपत्र १ एप्रिल १९३४ पासून बंद झाले. दुसरे मोठे ज्यू मालकीचे वृत्तपत्र ' THE BERLINERTAGA BLATT ' कसेतरी १९३७ पर्यंत चालू राहिले, अखेर तेही बंद झाले.

नाझीपक्ष अधिकारावर येण्यापूर्वी जर्मनीत ३६०७ वृत्तपत्रे होती. त्यांची संख्या पहिल्या वर्षातच २६७१ इतकी झाली. अर्थात बंद झालेली सर्व वृत्तपत्रे ही, एकतर ' ज्यू 'च्या मालकीची होती किंवा नाझीविरोधी होती.

इतर काही देशांप्रमाणे रेडिओ हा सरकारी मालकीचाच असल्या-मुळे, गोबेल्सने रेडिओवर आपला कबजा लगेच केला होता.

### शिक्षणाची पुनर्घटना

३० एप्रिल १९३४ पासून हिटलरने आपल्या मंत्रिमंडळांत शास्त्र, शिक्षण आणि संस्कृती याचे निराळे खाते उघडून त्याची जबाबदारी डॉ. बर्नहार्ड रस्ट (Bernhard Rust) याच्याकडे सोपविली.



**सुदृढ मुलांच्या सुदृढ माता होण्यासाठी**

डॉ. रस्ट ह्याचा या खात्याचा मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाला.

डॉ. रस्ट याला तो शिक्षक असताना नाझी पक्षाचा प्रचार केला या मुद्यावरून, यापूर्वी शाळेतून बडतर्फ करण्यात आले होते. हा काहीसा एककल्ली व निष्ठुर माणूस होता. हिटलरची शिक्षणाबाबत क्रांतीची योजना काय होती याचा लहानसा पुरावाच पाहू.

आपल्या ' माईन काम्फ ', या पुस्तकात हिटलरने लिहिले होते–

" The whole education by a national state must aim primarily not at the stuffing with mere knowledge but at building bodies which are physically healthy to the core. "

[ राष्ट्रीय म्हणविणाऱ्या सरकारने, शाळांतून फक्त विद्यार्थ्यांच्या डोक्यात ज्ञान कोंबण्याचे ध्येय न ठेवता, त्यांची शरिरे आमूलाग्र सुदृढ कशी होतील याकडे लक्ष दिले पाहिजे. ]

जर्मनीचा सर्वाधिकारी झाल्यानंतर ६ नोव्हेंबर १९३३ मध्ये एकदा बोलताना हिटलर म्हणाला होता,

" When an opponent declares, ' I will not come over your side, ' I calmly say, your child belongs to us already ...... what are you ? you will pass on ! "

[ जेव्हा आमचा एखादा विरोधक मला सांगतो की, ' मी तुमच्या बाजूला येणार नाही, ' तेव्हा मी त्याला शांतपणे म्हणतो, ' तुझी मुले आता आमचीच आहेत. तुला कोण विचारतो ? तू आता संपतच आला आहेस. ' ]

ज्यावेळी सर्व राष्ट्र हे बुजबुजाटाने खालावलेले असते, तेव्हा राष्ट्रीय पुढारी फक्त त्याची पुढची पिढीच मनात असेल तर वाचवू शकतात. जळलेल्या मोहोराचा नाद सोडावा लागतो. या दृष्टीने हिटलरने जे केले, ते त्याच्या हेतूच्या दृष्टीने योग्य तेच केले.

किंडरगार्टनपासून तो विश्वविद्यालयांपर्यंत सर्व शिक्षकवर्गाला ' नॅशनल सोशॅलिस्ट टीचर्स लीग ' चे सभासद करण्यात आले. सर्व पाठ्य पुस्तकांची रचना नाझीवादाला पोषक अशी करण्यात आली. ज्यू शिक्षकांना रजा देण्यात आली.

अर्थात याचा परिणाम असा झाला की, शिक्षणाला ठोकळेबाज स्वरूप आले. पाठ्य पुस्तकांतून इतिहासाचा अपलाप करण्यात आला.

**हिटलर युवक**

परंतु शाळेच्या माध्यमावर हिटलरचा फारसा विश्वास नव्हता. विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणासाठी ' हिटलर युवक ' ( Hitler youth) ही संघटना निर्माण करण्यात आली. जून १९३३ पासून या संघटनेचे काम बालडर शिराश (Baldur Schirach) याचेकडे देण्यात आले. हा तरुण दिसायला उमदा, आकर्षक व अत्यंत उत्साही होता. १९२५ सालापासून तो नाझीपक्षाचे काम करीत होता.

ज्यांना सैन्य व कामगार संघटना यात काम करावयाचे असे, अशा मुलांना वयाच्या चौदाव्या वर्षी या संघटनेत दाखल करण्यात येई. ६ ते १० वर्षांच्या कालावधीत या मुलांना नाझीवादाचा बाळबोध परिचय करून देण्यात येत असे. १४ व्या वर्षी ही मुले युवक संघटनेचे सभासद होत. १४ ते १८ ही चार वर्षे यांना सर्व प्रकारच्या मैदानी खेळांचे व कवाईतीचे शिक्षण देण्यात येत असे. ही चार वर्षे एखाद्या लष्करी कॅम्पमध्ये काढावी तशी जात असत. डोंगरदऱ्यांतून, जंगलातून यांना शिक्षणासाठी नेण्यात येत असे.

मुलींकरता अशाच तऱ्हेची संघटना हिटलरने उभी केली होती. पांढरा ब्लाउज, निळा स्कर्ट, सॉक्स, व काहीसे पुरुषी वाटणारे बूट घातलेल्या (Jungma edel) जुंगमा एडेल संघटनेच्या सदस्यांना जवळ जवळ मुलांप्रमाणेच मुख्यतः शरीरसुधारणेसाठी शिक्षण देण्यात येई. ' सुदृढ मुलांच्या सुदृढ माता होणे हे मुलींचे ध्येय आहे, ' या सूत्रात त्यांचे शिक्षण गोवलेले असे. B. D. M. (Bund Weutscher Maedel–League of German Maidens) या मोठ्या संघटनेत वयाच्या १४ व्या वर्षी मुलींना दाखल करून घेण्यात येई. अठरा वर्षे पुरी झाली की, मुलींना एक वर्षभर शेतावर कामे करावयास लागत. यात शेतातील कामे व गृहकृत्ये या दोहोंचा समावेश असे.

१९३८ अखेर हिटलर-युवक सदस्याची संख्या ७७,२८,२५९ एवढी होती. १९३९ सालापर्यंत याबाबत सर्वावर सक्ती नसे...परंतु देशात फक्त नाझीपक्षच अस्तित्वात असल्यामुळे, या संघटनेत दाखल झाल्याखेरीज मुलांना अन्य पर्यायच नसे.

या सरकारी यंत्रणेतील संघटनेत अर्थातच अनेक दोष शिरले होते. मुलांच्या कोवळ्या मनावर अशा रीतीने नाझीवादाचा प्रभाव पाडावा की नाही, हा ' नैतिक ' प्रश्न जर्मनेतर टीकाकारांनी उपस्थित केलेला आहेच. परंतु शिरर यावेळी प्रत्यक्ष जर्मनीत वावरत होता व या शिक्षणाचा परिणाम काय झाला हे सांगताना तो लिहितो–

"The boys and girls seemed immensely happy, filled with a zest for the life of a Hitler youth. And there was no doubt that the practice of bringing the children of all classes and walks of life together, those who had come from poverty or riches, from a peasant's home or aristocrat's was good and healthy in itself. They lived outdoors and learned the value of manual labour.

The young in the Third Reich were growing up to have strong and healthy bodies, faith in the future of their country and in themselves and a sense of fellowship and comradeship that shattered all class and economic and social barriers.

I thought of this in the May days of 1940 when along the road between Aachen and Brussels one saw the contrast between the German soldier, bronzed and clear-cut from a youth spent in sunshine on an adequate diat and the first British war prisoners, with their hollow chests, round shoulders, pasty complexion and bad teeth; tragic examples of the youth that England had neglected so irresponsibly in the years between the wars."

[ ही सर्व मुले-मुली अत्यंत सुखी दिसत. हिटलर युवक सघटनेतील जीवनाबद्दल त्याना अत्यंत जिव्हाळा वाटे. समाजाच्या सर्व थरातून आणि क्षेत्रातून आलेली ही मुले, काही अत्यत गरीब घरातील व काही श्रीमंत खानदानी कुटुबातील, काही शेतकऱ्याची तर काही जमीनदारांची– याना एकत्र आणण्याची ही कल्पना चागली व हितावह होती. घराबाहेर ही सर्व एकत्र राहात आणि शारीरिक श्रमाचे महत्त्व जाणून घेत.

तिसऱ्या राईशमधील ही नवी पिढी सुदृढ शरीरयष्टीची व निकोप प्रकृतीची व्हावी या दृष्टीने वाढविली जात होती. आपल्या देशाच्या उत्कर्षावरील विश्वास, भरपूर आत्मविश्वास, सर्वामध्ये निर्माण होणारी एकत्वाची व बधुत्वाची भावना आणि यामुळे कोसळून पडणारी आर्थिक आणि सामाजिक विषमतेच्या भेदाभेदाची कुंपणे या सर्व गोष्टीमुळे हे साध्य होत होते.

पुढे १९४० च्या मे महिन्यात मला याची आठवण तीव्रतेने झाली. आचेन आणि ब्रुसेल्स याना जोडणाऱ्या रस्त्यावरून जेव्हा पहिल्या ब्रिटिश युद्धकैद्याना घेऊन बाजूचे जर्मन सैनिक चालत, तेव्हा दोन्ही सैनिकांतील फरक ध्यानात येई. प्रत्येक जर्मन सैनिक हा एखाद्या ब्रांझच्या पुतळ्याप्रमाणे सतेज तुकतुकीत दिसे. भरपूर आहारावर उन्हातान्हात काढलेल्या तरुणपणातील दिवसांची ही पुण्याई होती. या उलट ब्रिटिश सैनिक हे पोकळ छातीचे, पडलेल्या खाद्यांचे, फिकटलेले आणि घाणेरड्या दंतपक्तीचे असे दिसत. दोन युद्धामध्ये गेलेल्या काळात इग्लडने आपल्या तरुण पिढीकडे जे अक्षम्य दुर्लक्ष केले याचा हा परिणाम होता. ]

## अन्नधान्य स्वयंपूर्णता

१९३३ साली हिटलरने राज्यसूत्रे हाती घेतली तेव्हा जर्मन शेतकऱ्याची अवस्था ही अत्यत दयनीय होती. कर्जात बुडालेला शेतकरी शेताच्या उत्पन्नातील १४ टक्के भाग नुसता व्याजाखाली वाटीत असे. या शिवाय त्याच्यावर कराचा आणि शेतसाऱ्याचा बोजा पडे तो वेगळाच.

म्हणून १९३३ साली हिटलरने जाहीर केले,

"My Party Comrades, make yourselves clear about one thing: The ruin of the German peasant will be the ruin of the German people".

शेतकरी धुळीला मिळाला तर सर्व जर्मन जनता धुळीला मिळेल, याची खूणगाठ हिटलरने सर्व पक्षाच्या कार्यकर्त्यांना सागितली व पाठोपाठ शेतकऱ्यांचा प्रश्न हिटलरने हाती घेतला.

वॉल्थर दारे (Walther Darre) हा या कामासाठी निवडलेला नाझीपक्ष सदस्य अत्यत कर्तबगार निघाला. त्याने शेतकीविषयक पुस्तके लिहिली होती व आपल्या कामाची त्याला सर्वांगीण माहिती होती. हिटलर मत्रिमडळात तो अन्न व शेतकीमत्री झाला. मत्रिपदावर येताच त्याने पहिला कायदा करून घेतला—

२९ सप्टेंबर १९३३ रोजी अस्तित्वात असलेल्या या कायद्यान्वये जी शेतजमीन ३०८ एकरापेक्षा कमी आहे आणि ज्याच्यावर एकतरी कुटुबाचा उदरनिर्वाह होत आहे अशी सर्व जमीन त्या त्या कुटुबाच्या मालकीची ठरविण्यात आली. ही जमीन विकणे, तुकडे पाडणे, किंवा गहाण टाकणे याला कायद्याने बदी करण्यात आली. शेतकरी घरातील कर्ता पुरुष मरताच, त्या काळची सर्व जमीन ही घरातील सर्वात थोरल्या व सर्वांत लहान मुलाला कायद्याने मिळत असे व त्याचबरोबर आपल्या सर्व बहीणभावडाचे शिक्षण-पोषण ती भावंडे वयात येईपर्यंत करण्याची जबाबदारी कायद्याने त्या मुलावर येऊन पडत असे.

शेतजमीनीची विक्री बेकायदेशीर ठरताच शेतकरी हा आपल्या शेतावरच बाधला गेला. कुटुंबातील एकाच व्यक्तीकडे जमीन वशपरपरेने जाऊ लागल्यामुळे जमिनीचे हिस्से थाबले.

१३ सप्टेंबर १९३३ ला दारे याने 'Reich Food Estate'– 'राईश अन्नसाठा' ही नवी यत्रणा उभी केली. या यत्रणेने शेतकऱ्याना अन्नधान्याच्या पुरेशा फायदेशीर, व निश्चित किंमती बाधून दिल्या व जर्मनीचे सर्व धान्यवाटप, विक्री–खरेदी ही या यंत्रणेखाली आणली गेल्यामुळ जर्मनी हां हां म्हणता अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला.

नाझी पक्षाच्या पहिल्या दोन वर्षांच्या कारकीर्दीतच अन्नधान्याच्या किंमती २०% नी वाढल्या व शेतकरी सुखावला. भाजीपाला, दूधदुभते, शेळचा-गाई याच्या किंमती तर याहूनही अधिक टक्क्यानी वाढल्या. अर्थात जर्मनी अन्नधान्याच्या बाबतीत परिपूर्ण झाला. याचा अर्थ जवळ जवळ ८५% अन्नधान्य जर्मनीतच निर्माण होऊ लागले व आयात फक्त १०–१५ टक्क्यावर आली.

## कारखानदारीला उत्तेजन

हिटलरला सुरवातीलाच जे आश्चर्यजनक यश लाभले, ते मात्र जर्मनीची आर्थिक परिस्थिती सुधारण्यात. केवळ जर्मन अर्थशास्त्रज्ञच

नव्हे तर पाश्चिमात्य अर्थशास्त्रज्ञानाही, या सुधारलेल्या परिस्थितीचे वर्णन 'केवळ आश्चर्य' (Miracle) या एका शब्दाखेरीज करता आले नाही.

डॉ. शाक्त या अर्थशास्त्रज्ञाच्या हवाली अर्थखाते केल्यानतर हिट-लरने त्यात मग ढवळाढवळ (सुरवातीला) केली नाही.

पहिल्या एका वर्षांत शाक्तने बेकारी नाहीशी व्हावी या दृष्टीने सरकारी क्षेत्रात व व्यक्तिश: कारखानदाराना अजस्र कारखाने उभे करण्यात उत्तेजन दिले. कारखानदाराना या बाबतीत देण्यात आलेल्या सवलती अशा होत्या—

जे कारखानदार रोजगारी वाढवतील व बेकारी नष्ट करण्यात विवक्षित हातभार लावतील त्याना करमाफी देण्यात येऊ लागली. याप्रमाणे कारखान्याना आर्थिक सहाय्य मुक्त हस्ताने सरकार देऊ लागले.

परतु मुख्यत: जर्मनीने हा हां म्हणता आर्थिकक्षेत्रात प्रगती केली ती शस्त्रोत्पादनाच्या धोरणामुळे! या सर्व योजनेला 'युद्धकालीन अर्थकारण' (War economy) अशी संज्ञाच दिलेली होती. यासाठी लागणारा पैसा उघड रीतीने वापरणे अर्थातच अशक्य होते. कारण व्हर्साइल्सच्या तहान्वये जर्मनीला शस्त्रास्त्रांवर खर्च करण्यास बंदी होती. यामुळे अर्थातच 'कागदी पैसे' मुबलक निर्माण करणे व जे कारखाने शस्त्रास्त्राचे म्हणून निघतील ते सर्व, काही अन्य उत्पादना-करता आहेत असे वरवर दाखवणे या दोन गोष्टी करणे आवश्यक होते. शाक्तने या दोन्ही गोष्टी मोठ्या हिकमतीने अंमलात आणल्या. त्याने मेफो (Mefo) नावाची बिले (एकप्रकारच्या नोटाच) काढल्या. ही बिले जर्मनीतील सर्व बँका चलन म्हणून स्वीकारीत व शेवटी त्याची जबाबदारी रॉईशबँकेवर येई. रॉईशबँक ही सरकारी असल्यामुळे तिचे ताळेबंद हवेतसे जुळविले जात. बँकेच्या रोजमेळात तर ही बिले दाखविलीच जात नसत. या सर्व 'मेफो' बिलांनी निर्माण केलेला कागदी पैसा हा शस्त्रास्त्रनिर्मितीकरता वापरण्यात येत असे.

या काळात व न्हाइनलँड विभागात कुणी गेला तर या सर्व विभागात उडालेला गजबजाट पाहून तो थक्कच होई. क्रप (Krupp) याचा बंदुकीचा प्रचड कारखाना व फारबेन (Farben) यांचा रसायन कारखाना, ही दोन मोठीच प्रस्थे या भागात पसरली होती. नव्या युद्धाला लागणाऱ्या दोन प्रमुख गोष्टी म्हणजे 'गॅसोलिन' व 'रबर'. या दोन्ही गोष्टी जर्मनीला आयात कराव्या लागत असत. युद्धकाळात या गोष्टी आयात करता येणार नाहीत व या दोन्ही वस्तू भरपूर प्रमाणात जर्मनीत तयार व्हाव्यात या दृष्टीने सशोधन चालू होते.

फारबेन याने कृत्रिम गॅसोलिन (Synthetic Gasolin) तयार करण्यात यश मिळविले. कोळशापासून हे गॅसोलिन तयार होऊ लागले व १९३७ पर्यंत ३००,००० टन एवढे गॅसोलिन प्रतिवर्षी फार्बेन कंपनी तयार करू लागली. कोळशापासून कृत्रिम रबर-बूना (Buna) तयार करण्याचे तत्रही फार्बेन कंपनीने शोधून काढले. प्रचड प्रमाणावर बूना रबर या कंपनीने उपलब्ध करून दिले.

क्रपच्या कारखान्यांत पाण्याचे पाईप म्हणून ज्या प्रचड प्रमाणावर नळ्या तयार होत त्या सर्व बंदुकीच्या नळ्या होत्या. दोस्ताच्या डोळ्यात धूळ फेकून क्रपने सैन्याला लागणारे सर्व साहित्य आपल्या कारखान्यात बनविण्यास सुरुवात केली. युद्ध सुरू झाल्यावर क्रपने सागितले—१९३९ ते ४१ मध्ये ज्या टॅक्समुळे जर्मन सैन्याने भराभर विजय मिळविले त्याचे डिझाइन आम्ही १९२६ साली तयार केलेले होते, व १९३९-४० साली वापरण्यात आलेल्या बंदुका १९३३ पासून आमच्या कारखान्यांत सैनिकाची वाट पहात होत्या.

कारखानदार हे शतकऱ्याप्रमाणेच नव्या नाझी राज्ययंत्रावर खूष होते. ६% डिव्हिडड देऊन जो प्रचड नफा उरे तो पुन्हा सरकारी कर्जरोख्यातच गुतविण्याचे बधन कारखानदारावर होते. असे असूनही कामगार कटकटीचा ससेमिरा नसल्यामुळे कारखानदाराची काहीएक तक्रार नव्हती.

## कामगारही खूष

कारखानदाराची तक्रार नव्हती म्हणजे कामगाराची आर्थिक तक्रार असली पाहिजे! परंतु कामगाराचीही आर्थिक तक्रार नव्हती. बेकारी नष्ट झाल्यामुळे कामगारवर्गावर नेहमी कोसळणारी बेकारीची कुऱ्हाड आता अदृश्य झाली होती. परतु आता ते एका परीने राजकर्त्यांचे गुलामच झाले होते. शेतकरी हा जसा नाझी सरकारने शेतावर बाधून टाकला त्याचप्रमाणे प्रत्येक कामगारासाठी एक कामकाज नोदणीचे पुस्तक ठेवण्यात आले. या पुस्तकात त्या कामगाराला येणाऱ्या कामाच्या तपशीलाबरोबरच त्याच्या नोकरीचा तपशील असे. यामुळे कुणी कामगार एखादी नोकरी सोडून दुसरीकडे गेल्यास त्याचा पत्ता सरकारला लागत असे व असे करणे देशाच्या हिताचे नसल्यास योग्य ती उपाययोजना होत असे. यामुळे पर्यायाने, राज्यकर्ते सागतील त्या ठिकाणी रोजगारी करणेच कामगाराला भाग पडे.

मात्र एकदा हे दास्यत्व केले, की मग प्रत्येक कामगाराला हक्काची रजा, रम्य ठिकाणी जहाजावरून सरकारी खर्चाने प्रवास, उपहार-गृहाची चोख व्यवस्था, दूरच्या ठिकाणी सवलतीने प्रवास आदि असख्य सोयी सरकारने उपलब्ध केल्या होत्या.

कामगारांना सिनेमा—नाटके याचेही दर सवलतीचे असत. एक काम कुठे करावे व काय करावे याचे स्वातत्र्य सोडले, तर सर्व सुख-सोयी कामगाराना उपलब्ध होत्या.

अशा रीतीने नाझी जर्मनीतील जीवनाची रचना अमलात येऊन तीन वर्षे उलटतात न उलटतात तोच हिटलरने अनेक गोष्टी साध्य करून दाखविल्या.

या तीन वर्षांत त्याने सर्व विरोधकाचा निकाल लावला. सर्व देश हा एकछत्री अंमलाखाली आणला. देशाचे प्रमुख शहरातून आणि समाजाच्या विविध थरातून 'नाझीवाद' पुरता रिचविला. बेकारी नष्ट होऊन उद्योग आणि व्यापार यांची चाके प्रचंड गतीने फिरताना दिसू लागली. कुठल्याही अन्य राजवटीने तीन वर्षांत एवढे मोठे यश मिळविले नसेल!


**मुजऱ्याचे मानकरी**

**ले : ब. मो. पुरंदरे**

**तिसरी आवृत्ती प्रसिद्धीच्या वाटेवर**

**किंमत दोन रुपये**

: ३ :

तोंडाने शांततेचा उद्घोष करावा, आणि अत्यंत गुप्तपणाने लढाईची तयारी चालू ठेवावी हे सर्वच आक्रमकांना करावे लागते. हिटलरने सुरवातीची काही वर्षे हेच केले. परंतु इतर आक्रमकापेक्षा हिटलरचे काम अधिक कठीण होते. व्हर्साइल्सच्या तहाने जर्मनी बांधला गेलेला होता. जर्मनीने शस्त्रास्त्राचे कारखाने काढू नयेत, सैन्य वाढवू नये, विमानदळ ठेवू नये, अशा जाचक बंधनाचा वेढा देशाभोवती असताना, हिटलरने दोस्तांच्या डोळयात जी धूळ फेकली, त्याचा इतिहास आता सुरू होत आहे.

## ऑस्ट्रियातील माघार

२५ जुलै १९३४ ची दुपार होती. बायरूथ येथील वॅगनरच्या वार्षिक उत्सवाला हिटलर हजर होता, व एका संगीतिकेचा प्रयोग पाहण्यात तो गर्क झाला होता. हिटलर बसला होता त्या बॉक्सच्या मागील बाजूस, एका खोलीत त्याचे दोन रक्षक...व्हिएन्नावरून येणाऱ्या फोनची प्रतीक्षा करीत होते.

व्हिएन्ना म्हणजे ऑस्ट्रियाची राजधानी आपल्या ' माईन काम्फ '-मध्ये हिटलरने स्पष्टच सांगितले होते.–"The reunion of Austria and Germany is a task to be furthered with every means–"

"ऑस्ट्रिया व जर्मनीचे एकीकरण जमेल त्या सर्व मार्गांनी साधणे आवश्यक आहे," असे त्याने सांगितलेले असल्यामुळे त्याच दिवशी दुपारी ऑस्ट्रियाचा चॅन्सेलर डोलफस् (Dollfuss) याचा व्हिएन्नात खून झाल्याचे वृत्त आल्यापासून, पुढे काय घडते हे समजण्याकरिता हिटलर उत्सुक होता.

त्याच दिवशी दुपारी नाझी संघटनेच्या १५४ सभासदानी ऑस्ट्रियन सैनिकाचे पोषाख करून ऑस्ट्रियन चॅन्सेलरीत प्रवेश केला व चॅन्सेलर डोलफस्च्या नरडयावर, दोन फूट अंतरावरून गोळया घालून त्याचा खून पाडला. यापूर्वी जर्मनीचा आपणास पाठिंबा आहे या विचाराने ऑस्ट्रियात नाझी संघटनेने घातपाती कृत्याची चळवळ उभी केली होती. त्यानी पूल उडविणे, डोलफस्च्या सहकाऱ्यावर बॉम्बफेक करणे अशी लहानसहान धाडसी कृत्ये नुकतीच पार पाडली होती.

डोलफस् सायंकाळी ६ वाजता मरण पावला. परंतु हे बंड अनपेक्षितपणे कोसळले. डॉ. कूर्त शुशेनिग् (Dr. Kurt Schuschnigg) याच्या नेतृत्वाखाली, सरकारी फौजानी सर्व कटवाले पकडले व जर्मनीत पळून जाण्याचा त्यांचा बेत फसला. यातील तेरा कटवाल्याना डॉ. शुशेनिग्ने पुढे फासावर चढविले.

ऑस्ट्रियात गडबड सुरू झाल्याचे ध्यानात येताच इटालीचा सर्वाधिकारी बेनिटो मुसोलिनी याने, इटली–ऑस्ट्रियाच्या सरहद्दीवर ब्रेनेर खिंडीपाशी, चार डिव्हिजन सैन्य खडे केले.

हिटलर बायरूथ संगीतोत्सवात असतानाच ऑस्ट्रियाचे बंड फसल्याचे मध्यरात्री फोनवरून कळले व हिटलरने आपली पावले बदलली.

लोकार्नो कराराप्रमाणे युरोपातील देशांच्या सरहद्दीचे रक्षण करण्याची जबाबदारी फ्रान्स, इटली, रशिया आदि राष्ट्रांवर होती, व या करारानुसारच मुसोलिनीने ऑस्ट्रियात हिटलरचा हस्तक्षेप होऊ नये, यासाठी ब्रेनेर खिंडीच्या तोंडापाशी सैन्य जमविले होते.

हिटलरने वारे कसे वाहते आहे हे अजमावून जाहीर केले..."डोलफस्चा खून ही एक दुर्दैवी घटना आहे ! ऑस्ट्रियाच्या अंतर्गत प्रश्नापैकी हा प्रश्न असल्यामुळे जर्मनीशी याचा संबंध नाही." पाठोपाठ हिटलरने ऑस्ट्रियातील जर्मन मंत्री हॉलीच् (Halicht) याला परत बोलावून त्याचे जागी पॅपेन याची रवानगी केली.

## लष्कराची गुप्त तयारी

१९३४ हे साल फक्त जर्मनीची लष्करी शक्ती वाढविण्यात खर्च करण्याचे हिटलरने ठरविले. १ एप्रिल १९३४ ला चीफ ऑफ जनरल स्टाफ् जनरल बेक् याला हिटलरने बजावले..." आज सैन्यदल फक्त १,००,००० आहे. ऑक्टोबर उजाडण्यापूर्वी सैन्याची संख्या ३००,००० व्हावयास पाहिजे १९३५ मधे मी उघडरीतीने व्हर्साइल्स तहाची वासलात लावणार आहेच, परंतु तोपर्यंत सैन्याच्या कुठल्याही कागदपत्रांत '–जनरल स्टाफ ' हा शब्द येता कामा नये"

' जनरल स्टाफ ' या यंत्रणेलाच तहान्वये बंदी केलेली होती.

या आदेशानुसार सैन्यदलातील अधिकाऱ्याची वार्षिक यादी प्रसिद्ध करण्याची प्रथाच बंद करण्यात आली.

राईश डिफेन्स कॉन्सिलचा अध्यक्ष जनरल कायटेल (Keitel) याने आपल्या सहकाऱ्याना बजावले—" No document must be lost. Matters communicated orally cannot be proven; they can be denied."–

[एकही कागद हरवता कामा नये. जे तोंडी सांगण्यात येईल ते कुणाला सिद्ध करता येत नाही...व ते नंतर नाकारता येते.]

अॅडमिरल रीडरने आपल्या सहकाऱ्याना गुप्त फतवा काढला,

" Fuehrer's instructions : No mention must be made of a displacement of 26,000 tons, but only of improved 10,000 tons ships. The Fuehrer demands complete secrecy on the construction of U–boats."

[फ्यूररच्या सूचना आहेत–'२६,००० टनाच्या बोटी बांधल्या जात आहेत असा उल्लेख कुठेही होता कामा नये. सर्व उल्लेख १०,००० टनाच्या बोटीच दुरुस्त होत आहेत असा असावा. ' यू ' बोटी तयार होत आहेत या गोष्टीबाबत तर पूर्ण गुप्तता ठेवली जावी.]

रीडरने जर्मन प्रजासत्ताकाच्या काळातच फिनलंड, हॉलंड व स्पेन या देशांत, जर्मनीसाठी पाणबुड्या बोटी बांधण्यास सुरवात केली होती. यातल्या बारा पाणबुड्या त्याने कील बंदरात आणून ठेवल्या होत्या. याशिवाय कधीही जोडता येतील असे पाणबुड्या बोटीचे सुटे सुटे भाग त्याने विपुल प्रमाणात तयार करून ठेवले होते.

हर्मन गोअरिंगने कारखानदाराना लष्करी विमानाची मॉडेल्स् तयार करण्याचा आदेश दिला. League of Air Sports (हवाई खेळाची समिती) या खेळकर नावाखाली, हजारो जर्मन तरुणाना विमाने चालविण्याचे शिक्षण देण्याचा त्याने सपाटा लावला.

१९३५ साल उजाडले व त्याने ' सार ' (Saar) हा प्रांत राईशमधे आणला. १३ जानेवारीला तेथे झालेल्या सार्वमतात ४,७७,००० विरुद्ध ४८,००० असा निकाल लागून ' सार ' प्रांत जमिनीला जोड-

ण्यास दोस्तांनी मान्यता दिली. सार प्रांतांत कोळश्याच्या प्रचंड खाणी होत्या आणि या कोळशामधून हिटलरने गॅसोलीन व बूना रबर तयार करण्याची यत्रणा जय्यत ठेवलेली होतीच.

सार प्रात पदरात पडताच हिटलरने एक शाततेची तान मारली. ब्रिटन व फ्रान्स या देशाना वाटले, की पश्चिम राष्ट्रानी लोकार्नो करार करून फ्रान्स, ऑस्ट्रिया, बेल्जम, डेन्मार्क आदि पश्चिम युरोपियन राष्ट्रांना जशी शाश्वती दिली, तशीच पूर्व लोकार्नो करार करून झेकोस्लोव्हाकिया, पोलंड, रुमानिया आदि राष्ट्राच्या सरहद्दीना संरक्षण निर्माण करावे. हे सर्व करण्यास, म्हणजे हिटलरचे पाय या नव्या तहात गुतवण्यास ही सधी ठीक दिसते. इंग्लड व फ्रान्सने याबाबत हिटलरला खलिता धाडला. फेब्रुवारी १९३५ !

हिटलरच्या हे लक्षात आले की, असा एखादा नवा तह करणे म्हणजे जर्मनीची पराभवानंतर जी क्षेत्ररचना आहे तीच कायम राहावी यासाठी सही देण्यासारखे आहे. हे त्याला परवडणारे नव्हते. जर्मनीचे नशिबात दुर्दैवाने आलेले क्षेत्रफळ फक्त सभाळण्याकरता आपला जन्म आहे, असे तो मानीत नव्हता. त्याने १४ फेब्रुवारीला उत्तर पाठविले ते फक्त ब्रिटिश सरकारला ! त्याने ब्रिटिश सरकारला कळविले, की मोठी बोलणी करण्यापूर्वी ब्रिटन व जर्मनीने या प्रश्नाची प्राथमिक चर्चा करावी. सर जॉन सायमन (सायमन कमिशनप्रसिद्ध) हे त्या वेळी ब्रिटनचे परराष्ट्र खात्याचे चिटणीस होते. त्यानी ६ मार्च १९३५, ही बोलणी करण्याची तारीख कळविली. स्थळ बर्लिन ठरले.

अर्थात हिटलरला ही बोलणी देखील मनातून नकोच होती. न्यूराथ या जर्मन वकिलाने सायमनसाहेबाला ४ मार्चला तो विमानाचे तिकिट काढणार होता, तोच कळविले—"फ्यूरर सर्दी-पडशाने आजारी आहेत व बोलणी पुढे ढकलावी लागत आहेत."

हिटलरला खरोखरच सर्दी झाली असेल किंवा नसेल. परंतु दोस्तांना थोडी हुडहुडी भरेल, असे काही करण्याची सधी चालून आली होती. ती त्याने अचूक हेरली. फ्रेंच सरकारने मार्चच्या पहिल्याच आठवड्यात असे जाहीर केले होते, की पहिल्या महायुद्धात फ्रेंच तरुण फार मारले गेल्याने १८ वर्षांवरील सर्व फ्रेच तरुणांना दोन वर्षे सक्तीचे लष्करी शिक्षण देण्याचे विधेयक फ्रेंच पार्लमेंटपुढे येत आहे. हिटलरने ओळखले, की फ्रान्स व इंग्लंड या दोघाना गोंधळात टाकायला ही चागली संधी आहे.

गोअरिंगमार्फत हिटलरने पहिला तडाखा दिला. लडनच्या 'डेली मेल' पत्राचा वार्ताहर वॉर्ड प्रीश (Ward Prich) ह्याला गोअरिंगने खास मुलाखतीसाठी बोलाविले. या मुलाखतीत गोअरिंगने जी गोष्ट सर्वांना कळून चुकली होती ती अधिकृतरीत्या कबूल केली...जर्मनी• जवळ लष्करी विमानदळ आहे.

मुलाखत लडनमध्ये प्रसिद्ध झाली. ११ मार्चला हिटलर वाट पहात होता, की याचा काय परिणाम होतो. कॉमन्स सभेत याबाबत विरोधकांनी प्रश्न विचारले,— "सायमनसाहेब तरीही जर्मनीला जाणार आहेत काय ?" सायमनसाहेबानी सागितले—"वाटाघाटी आवश्यक आहेत. मी व अँथनी ईडन जाणार आहोत".

जर्मनीत नाझी नेत्यानी निःश्वास सोडला. आता विमानदलाची वाढ तर उघड रीतीने करायला प्रत्यवायच नाही ! ज्याला पाठोपाठ धक्के देणे असे म्हणतात ते 'ब्लिट्झ्क्रीग्' तंत्र हिटलरने शाततेच्या काळातही वापरले.

गोअरिंगच्या 'डेली मेल'ला दिलेल्या मुलाखतीनंतर फक्त पाचच दिवसानी दि. १६ मार्च १९३५ ला शनिवारी हिटलरने एक वटहुकूम काढला व शाततेच्या काळात लष्करी शिक्षण सक्तीचे करून, शिवाय सैन्यदल ३६ डिव्हिजन्स राहील असे जाहीर केले. ३६ डिव्हिजन्स म्हणजे जवळ जवळ पन्नास लक्ष !

**पडदा उघडला**

आता या घोषणेनतर फ्रान्स व इंग्लंड स्वस्थ राहिले तर व्हर्सीइल्च्या तहाची महत्त्वाची कलमे निकालात निघाल्यासारखेच झाले. अपेक्षेप्रमाणे दोन्ही राष्ट्रांनी निषेधखलिते पाठविले व दोघेही स्वस्थ बसले.

१७ मार्च १९३५ हा दिवस जर्मनीच्या इतिहासात हिटलरने चिरस्मरणीय करून टाकला. जर्मनीचा अपमान त्याने धुऊन काढला. शिरर लिहितो—

"No matter how much a German might dislike Hitler and his gangster rule, he had to admit that the Fuehrer had accomplished what no republican Government, had ever dared to attempt."


[सामान्य जर्मन माणसाला हिटलर व त्याचे झुड साथीदार यांची राजवट आवडली नाही, तरी त्याला एक गोष्ट मान्यच करावी लागली की, जे करण्याचा प्रयत्न करण्याचे धैर्यही प्रजासत्ताक राजवटीने दाखविले नव्हते ते फ्युररने प्रत्यक्षात उतरवले.]

हा दिवस रविवार होता. याच दिवशी युद्धात मरण पावलेल्या वीराचे स्मरण करण्याचाही पायंडा होता. त्याला अनुसरून बर्लिनच्या स्टेट ऑपेरा हाऊससमोर होणाऱ्या समारंभाला शिरर मुद्दाम हजर राहिला होता. शिरर वर्णन करतो :

"खालचा सर्व मजला करड्या रगाच्या वेषधारी सैनिकांनी फुलून गेला होता. एखाद्या महासागराप्रमाणे सैनिक पसरले होते. त्यातच आकाशी रंगाचे गणवेष घातलेले 'लुफ्तवाफ्' (Luftwaffe) चे विमान दल सामील होते. यापूर्वी लुफ्तवाफ्चा हा गणवेश कुणीच पाहिलेला नव्हता. हिटलरच्या शेजारी फील्ड मार्शल मॅकेनसन्—हा कैसरने उभ्या केलेल्या सैन्यातील शेवटचा अवशेष, हुस्सार-गणवेषात उभा होता. व्यासपीठावर प्रकाशाचे झोत सोडले होते व तरुण लष्करी अधिकारी संगमरवरी दगडाप्रमाणे हातात युद्धपताका घेऊन निश्चल उभे होते. त्याच्यामागे एक प्रचंड पडदा सोडण्यात आला होता व त्यावर शौर्याचे प्रतीक असणाऱ्या 'आयर्न क्रॉस'ची भली मोठी प्रतिकृती काढण्यात आलेली होती."

आदल्या दिवशी फ्यूररचे भाषण रेडिओवर प्रक्षेपित होईपर्यंत कुणालाही याची कल्पना नव्हती, की हिटलरने पन्नास लाख सैन्यदल उभे करण्याची उघड घोषणा करण्याचे ठरविले होते. त्याची कल्पना होती, फारतर वीस लाख म्हणजे दुप्पट सैन्य उभे करण्याचे धाडस केव्हातरी ४-८ वर्षांनी हिटलर करील. परंतु फ्यूररने सैन्यासह सर्वांना जो धक्का दिला, त्यामुळे सर्वजण हर्षोत्फुल्ल मनाने या १७ तारखेला वीराच्या मानवंदनेला आलेले होते.

ब्रिटिश, फ्रेंच व इटालियन सरकारचे प्रतिनिधी स्ट्रेसा येथे एकत्र जमले. त्यानी जर्मनीच्या या घोषणेचा जळजळीत परतु फक्त निषेध केला ! लीग ऑफ नेशन्सने जिनीव्हा येयून तेच केले.



**हिटलरचे ब्लिट्झक्रीग तंत्र**

**१७ मार्चची मानवंदना**

फ्रान्सने घाईघाईने रशियाबरोबर परस्पर मदतीचा करार केला, व रशियाने झेकोस्लोव्हाकियाबरोबर एक परस्पर सहकार्याचा करार केला.

हिटलरने हे सारे गमतीने पाहिले. एवढा धक्का दिल्यावर थोडी-फार गडबड उडणारच हे तो जाणून होता. परंतु त्याने जो फासा फेकला तो दान घेऊनच आला होता.

### इंग्लंडशी हातमिळवणी

२१ मे १९३५ ला हिटलरने राईशपुढे शांततेला आवाहन करणारे एक भाषण केले. हे भाषण ऐकण्यास शिरर स्वत: उपस्थित होता. हे भाषण अत्यंत मुत्सद्देगिरीचे व दूर दृष्टीचे होते असे शिरर लिहितो. या भाषणात हिटलरने सांगितले——

" The bloodshed on the European continent in the course of last three hundred years bears no proportion to the national result of the events. France has remained France, Germany, Germany; Poland Poland and Italy Italy. "

The principle effect of war is to destroy the flower of the nation.

Nazi Germany wants peace. Germany needs peace and desires peace ! "

[ गेल्या तीनशे वर्षांत युरोपखंडात जे रक्त सांडले गेले, त्याचा विचार करता पदरात काय पडले !... तर जवळ जवळ काही नाही ! अखेर फ्रान्स फ्रान्सच राहिला, जर्मनी जर्मनीच राहिला पोलंड पोलंड आणि इटली इटलीच राहिला !

युद्धाचा मुख्य परिणाम हाच होतो की, राष्ट्राचा सारा मोहोर जळून जातो !

नाझी जर्मनीला शांतता हवी आहे ... जर्मनीला शांततेची आवश्यकता आहे ... आणि शांततेची इच्छा आहे ... ]

लंडनच्या 'टाइम्स'ने या भाषणाचे स्वागत करताना लिहिले—— " या भाषणात हिटलरने जे मुद्दे मांडले ते सर्व तर्कशुद्ध आहेत. याच्या आधारावर स्वतंत्र सशस्त्र जर्मनी उभा राहू शकेल व अशा जर्मनीशी चिरकाल शांतता टिकविणे सर्वांना शक्य होईल. "

आपल्या भाषणात हिटलरने खास ब्रिटनबद्दल सदिच्छा व्यक्त केली होती. 'माईन काम्फ' या ग्रंथातही हिटलरने प्रत्येक वेळी इंग्लंडशी वैमनस्य धरण्यात कैसरने मोठी चूक केली असेच मत प्रदर्शित केले आहे. या दृष्टीने विचार करता हिटलरने डोळ्यासमोर इंग्लंडशी शक्यतो युद्ध टाळण्याचे धोरण ठरविले असावे. आपल्या भाषणामधूनच हिटलरने सांगितले :

" इतिहासात फक्त एकदाच जर्मनीचा व इंग्लंडचा संघर्ष उडाला. या एकमेव घटनेची पुनरावृत्ती होऊ नये अशी जर्मनीची इच्छा आहे. आम्हांला इंग्लंडशी आरमारी स्पर्धा करण्याची इच्छा नाही. आवश्यकता नाही. वाटल्यास इंग्लंडने आम्हांला त्यांच्या आरमारदलाच्या फक्त ३५ टक्के आरमार बांधण्यास परवानगी द्यावी. त्याने आमचे समाधान होईल. "

हिटलरने ब्रिटनपुढे हे ज नमते घेतले त्याला ब्रिटनमधील सरकार लगेच बळी पडले. जर्मनीला आरमारविषयक सवलती देण्यासबंधी बोलणी करण्याकरता इग्लडने जर्मनीला निमत्रण धाडले. जून १९३५ मधे पॅपेन ही बोलणी करण्याकरता लडनला गेला...

आता या प्रकारात खरी मेख अशी होती, की ब्रिटनच्या एकतृतीयाश टनाचे आरमार उभे करायला जर्मनीला दहा वर्षे लागणार होती. तेव्हा यापेक्षा जास्त परवानगी इंग्लंडने दिली असती तरी जर्मनी ते करू शकत नव्हता. अर्थात या व्यवहारात काहीही नुकसान न पत्करता जर्मनीने ब्रिटनची सदिच्छा मात्र गाठीस मारली आणि मुख्य म्हणजे लोकार्नो कराराचे अन्य दोन भागीदार–फ्रान्स व इटली याच्या मनात विकल्प निर्माण केला. ब्रिटनने आपल्याला न विचारता जर्मनीशी वाटाघाटी कराव्या याचा या दोन राष्ट्रांना राग आला.

जर्मनीला १/३ आरमार बाधण्याची सवलत ब्रिटनने दिली व पॅपेन परवानगी घेऊन जर्मनीला परतला. या कराराची कलमे गुप्त ठेवावी असे ठरले. ब्रिटनच्या १/३ म्हणजे २१ क्रूझर्स व ६४ विनाशिका जर्मनीने उभाराव्या याला ब्रिटनने समती दिली. या करारात पाणवुड्या यू-बोटीचा उल्लेख नव्हता व जर्मनीने ब्रिटनच्या ६० टक्के एवढ्या यू-बोटी बाधण्यास हरकत नाही असे बोलणे मात्र झाले होते. या आत्मघाती निर्णयाचा तडाखा ब्रिटनलाच बसला. पुढे दुसऱ्या महायुद्धात याच आरमाराने इग्लंडची नाकेबंदी करून इंग्लडवर दुर्धर प्रसंग आणला.

## मुसोलिनी ॲबिसिनियाकडे

इंग्लंडची जर्मनीशी चाललेली चुंबाचुंबी पाहून मुसोलिनीने मनाशी ठरविले की, कसला लोकार्नो करार नी कसले काय ! जो तो स्वार्थी आहे. जर्मनीचीच खुशामत करायची स्पर्धा असेल तर ती इटली अधिक चागली करील. एकंदरीत सध्या जगात 'बळी तो कान पिळी' हाच कायदा चालणार आहे. मग इटालियन साम्राज्याचे स्वप्न पुरे करण्याची अन्य सुसधी कोणती ?

ता. ३–१०–१९३५. इटलीने आफ्रिकेतील जुन्यापुराण्या संस्कृतीच्या ॲबिसिनीया या राष्ट्रावर हल्ला चढविला. इटलीच्या फौजा सर्व बाजूनी. ॲबिसिनीयाची राजधानी 'आदिसअबाबा' च्या दिशेने आत घुसल्या !

ब्रिटन व फ्रान्स यानी इटलीच्या या अत्याचाराचा पुन्हा एकदा जळजळीत परतु फक्त शब्दात निषेध केला ! या दिवशी शिरर हा अनेक नाझी अधिकाऱ्याशी मुद्दाम या इटलीच्या कृत्याबद्दल बोलला. त्या सर्वांची प्रतिक्रिया काय होती हे त्याने आपल्या दैनदिनीत नमूद केले आहे–

" सर्वसाधारणपणे जर्मन अधिकारी या सर्व घडणाऱ्या प्रकारावर खूष आहेत. जर ॲबिसिनीयात इटलीचा पाय गुरफटला व युद्ध रेंगाळत राहिले तर युरोपात इटलीचे वजन कमी होऊन, जर्मनीला ऑस्ट्रियाचा कबजा करणे सहज शक्य होईल. समजा, ॲबिसिनीयाच इटलीच्या घशात गेला तर ब्रिटन व फ्रान्स याची परस्पर जिरून, इटली-जर्मनी याच्या स्नेहभावाची मूहूर्तमेढ रोवता येईल. काहीही होवो फायदा हिटलरचाच होणार आहे. Either way, Hitler wins !"

अपक्षेप्रमाणे १९३५–३६ च्या हिवाळयात इटालीने ॲबिसिनीया पादाक्रांत करण्यात बरेच यश मिळविले. इंग्लंड व फ्रान्स याच्या बांझोट्या निषेधाना मुसोलिनीने कचऱ्याच्या टोपलीत फेकले व 'लीग ऑफ नेशन्स' हे नुसते एक बुजगबाहुले आहे याची खात्री सर्वांना पटत गेली.

फ्रान्स व रशिया याचा मैत्रीकरार अजून फ्रेंच पार्लमेंटमध्ये पास झालेला नव्हता. या कराराचे निमित्त करून ऱ्हाइनलॅंड हा व्हर्साइल्स तहाने निर्लष्करी प्रदेश म्हणून जाहीर केलेला भूभाग व्यापून टाकावा असे हिटलरने मनाशी ठरविले. या दृष्टीने ६।७ महिन्यांपूर्वीच म्हणजे २ मे १९३५ ला जनरल ब्लोमुबर्गने सैन्याला ऱ्हाईनलॅंडमधे घुसण्याच्या तयारीत राहण्याच्या गुप्त सूचना दिल्या होत्या. ऱ्हाईनलॅंडचा कबजा याचा उल्लेख सर्व लष्करी कागदपत्रात –Schulung 'शूलंग योजना' असा केलेला असे. हा एक या आक्रमणासाठी वापरण्याचा गुप्त शब्द होता.

हिटलर वाट पाहात होता की, फ्रान्स सरकार फ्रान्स-मॉस्को मैत्रीचा करार कधी मान्य करते. अखेर १९३६ साल उजाडले. ११ फेब्रुवारी १९३६ ला ३५३ अनुकूल विरुद्ध १६४ अशा मतानी फ्रेंच-रशियन मैत्री करार फ्रान्सच्या पार्लमेन्टने स्वीकारला.

## ऱ्हाईनलॅंडमध्ये जर्मन फौजा

२ मार्च १९३६ ला पहाटेच्या काळोखात जर्मन सैन्याच्या तुकड्या ऱ्हाईन नदीच्या पुलावरून ऱ्हाईनलॅंडमधे शिरल्या. शूलंग सुरू झाले ! १० वाजता जर्मन परराष्ट्रमंत्री न्यूराथ (Neurath) याने फ्रान्स, ब्रिटन व इटली यांच्या जर्मनीतील परराष्ट्र वकिलाना एकत्र बोलाविले, आणि जाहीर केले– " फ्रान्स व रशिया यांचा मैत्रीतह झाल्यामुळे ऱ्हाइनलॅंड निर्लष्करी ठेवणे जर्मनीस धोक्याचे वाटले. एव्हाना ऱ्हाईनलॅंडवर आमच्या सैनिकानी कबजा केलेला असेल. आता युरोपात शाततेचा मार्ग निर्वेध झाला आहे–! "

दोन तासानी म्हणजे दुपारी १२ च्या सुमारास हिटलरचे राईशपुढे याबाबत निवेदन झाले. राईशसभासद व श्रोत्यांच्या गॅलऱ्या हर्षाने फुलून गेल्या होत्या. हिटलर उभा राहिला व धीरगभीर आवाजात त्याने भाषणास सुरवात केली–

" Men of the German Reichstag, in this historic hour, when German troops are at this miunte marching into this future peacetime garrisons, we all unite in two sacred vows."

[जर्मन राइशच्या सभासदानो, ही वेळ ऐतिहासिक महत्त्वाची आहे. याच क्षणाला जर्मन फौजा, पुढील शांततेच्या काळात जो शातता-सरक्षणाचा बुरुज ठरणार आहे अशा प्रदेशात पुढे सरकत आहेत. अशा वेळी आपल्याला सघटित होऊन दोन प्रतिज्ञा घेतल्या पाहिजेत... ]

हिटलरचे हे वाक्य पुरे होण्यापूर्वी सभासदानी टाळ्याचा कडकडाट करून हलकल्लोळ केला. काही सभासद स्प्रिंगच्या बाहुलीप्रमाणे जागेवरच नाचू लागले. काही हिटलरचा व जर्मनीचा जयजयकार करू लागले, व हिटलरला बोलणे थाबवून उभे रहावे लागले. थोडासा आनंदप्रदर्शक गलका कमी होताच हिटलर पुढे म्हणाला—

" First we swear to yeild to no force whatsoever

in restoration of the honour of our people; secondly we pledge that we shall strive for an understanding between the European people. We have no territorial demands to make in Europe."

[पहिली प्रतिज्ञा अशी, की आमच्या जनतेचा स्वाभिमान परत मिळविण्याच्या कामात आम्ही कुणाच्याही दडपणापुढे नमणार नाही व दुसरी ही की युरोपियन देशांत समझौता रहावा याकरिता आम्ही प्रयत्नशील राहू. आम्हांला युरोपात अन्य कुणाचीही भूमी नको आहे.]

फ्रेंचांचा जर्मनीतील वकील फ्रँकोइस पॉन्सेट (Froncoist Ponciet) याने फ्रेंच सरकारला सहा महिन्यांपूर्वीच कळविले होते, की हिटलरचा ऱ्हाइनलँड व्यापण्याचा विचार असून तो फक्त संधीची वाट पहात आहे. हे आधी कळूनही जेव्हा ७-३-१९३६ ला प्रत्यक्ष जर्मन फौजा ऱ्हाइनलँडमध्ये घुसल्या तेव्हा फ्रेंच लष्करी अधिकारी माशा मारीत बसले. जनरल गॅमेलिन या फ्रेंच सेनापतीने तेरा डिव्हिजन्स सैन्य एकत्र केले व पॅरिसहून काहीच आदेश न आल्यामुळे मॅजिनो लाइन... या फ्रेंच्यांच्याच तटबंदीशी त्याने ते आणून ठेवले. या वेळी जनरल गॅमेलिन पुढे येता तर काय झाले असते याची कबुली नाझी सेनापती जनरल जोडे (Jodl) याने पुढे न्यूरेम्बर्ग खटल्यात दिली. जोड म्हणाला-- "Considering the situation we were in, the French army would have blown us to pieces."

[आमची त्या वेळची परिस्थिती विचारात घेता, जर फ्रेंच सैन्य पुढे आले असते, तर आमच्या सैन्याची दाणादाण उडाली असती.]

स्वतः हिटलर पुढे एकदा बोलताना हेच म्हणाला-- "A retreat on our part would have spelled collapse."

[माघार घ्यावी लागली असती तर आम्ही तेव्हाच गडगडलो असतो.]

ऱ्हाईनलँडमध्ये सैन्य घुसविल्यानंतरचे ४८ तास हिटलरने कसे काढले हे त्याचे त्यालाच माहीत! जर्मन सेनाधिकारी ब्लोमबर्ग याचा विरोध असताना हा धोका त्याने पत्करला होता. हिटलर त्यानंतर म्हणाला,

-'हे अठ्ठेचाळीस तास म्हणजे माझ्या आयुष्यातील अत्यंत आणीबाणीचा काळ होता. जर फ्रेंच ऱ्हाईनलँडमध्ये प्रतिकारार्थ घुसले असते तर दोन पायांत शेपूट घालून पळण्याखेरीज आम्हांला दुसरा मार्ग नव्हता.'

["We would have had to withdraw with our tails between our legs."]

ऱ्हाईनलँड जर्मनीला जोडला गेला तो एकटया हिटलरच्या बेगुमान आत्मविश्वासावर. २७ मार्च १९४२ ला लष्करी अधिकाऱ्यापुढे बोलताना हिटलर पुढे सहा वर्षांनी याच घटनेविषयी म्हणाला--

"Anyone you care to mention would have lost his nerve. I was obliged to lie, and what saved us was my unshakable obstinacy and my amazing aplomb."

[माझ्या जागी दुसरा कुणीही असता तर तो हातपाय गाळता. मी (आत घुसलेल्या सैन्याचे आकडे फुगवून सांगितले) थाप मारली आणि त्या परिस्थितीतून आपण वाचलो. याला मुख्य कारण म्हणजे माझा

ऱ्हाईनलँडच्या निर्लष्करी टापूत जर्मन फौजा



दुराग्रह आणि आश्चर्यजनक आत्मविश्वास!]

हिटलरला ऱ्हाईनलँड पचला याचे मुख्य कारण फ्रेंचांना ब्रिटिशांनी साथ दिली नाही. फ्रेंच परराष्ट्रमंत्री फ्लँडिन (Flandin) हा ११ मार्चला लंडनला गेला व त्याने ब्रिटिश सरकारची विनवणी केली, 'आम्ही ऱ्हाईनलँडमध्ये घुसतो...आम्हांला पाठिंबा द्या!' परंतु ब्रिटिश सरकार उदासीन राहिले. याचे मुख्य कारण असे होते की, हिटलरने आपल्या भाषणातून इंग्लंडविषयी नेहमीच चांगले उद्गार काढून साखरपेरणी केलेली होती. शिवाय ऱ्हाईनलँड हा मूळ जर्मनीचाच भाग असताना फ्रेंचांना दिलासा म्हणून फ्रेंच-जर्मन सरहद्दीवरील हा भूभाग व्हर्साइल्स तहान्वये निर्लष्कर ठेवण्यात आला होता. त्यामुळे ब्रिटिशांना हा अन्याय खात होता. लॉर्ड लोथियन यांनी लॉर्डांच्या सभेत सांगितले,

"The Germans after all are going into their own back garden."

[आपल्या स्वतःच्याच परसदारच्या बागेत जावे तसे जर्मन ऱ्हाईनलँडमधे शिरले आहेत!]

डिसेंबर १९३५ मध्ये परराष्ट्रखात्याच्या चिटणीसपदावर आलेल्या अँथनी ईडन याने जरा अधिक कडक भाषा वापरली. कॉमन्स सभेत त्याने सांगितले-

"जर्मनीचे हे कृत्य म्हणजे तहाच्या अटीचे पवित्र्य पायदळी तुडविणारे आहे. सुदैवाची गोष्ट एवढीच की, जर्मनीचे हे कृत्य युद्धखोरी वाटावी एवढे गंभीर नाही.-"

## पुन्हा शांततेची जपमाळ

ब्रिटन–फ्रान्सच्या पायात फेकलेल्या पहिल्या फासात दोघे अडमडत असतानाच, हिटलरने दोघाना आणखी एक टांग मारली. त्याचा अर्थ त्यांच्या ध्यानात यायला बराच कालावधी लागला. राईशस्टॅगपुढील भाषणानतर जर्मन सरकारने फ्रान्स, ब्रिटन व इटली या राष्ट्राच्या वकिलाना एकच खलिता सादर केला. या खलित्यात जर्मन सरकारने शांततेसाठी पुढील उपाय सुचविले होते.

१ फ्रान्स व बेल्जम याचेबरोबर २५ वर्षांचा अनाक्रमणाचा करार जर्मनी करील व त्यावर इंग्लड–इटलीने तहाचे सरक्षक म्हणून सह्या कराव्यात.

२ फ्रान्स व जर्मन सरहद्दीवरील दोन्ही बाजूचा मुलुख हा निर्लष्करी करावा. असे करण्यास फ्रान्सने मान्यता दिली तर ऱ्हाईनलँडमधून जर्मन फौजा पुन्हा मागे जातील.

या दुसऱ्या सूचनेतला मथितार्थ किती भयंकर होता पहा. पहिली गोष्ट ऱ्हाइनलँडमध्ये आपण आहे या परिस्थितीत कडेकोट बंदोबस्त करू याचा इशारा होता. जर फ्रान्सने सूचना मान्य केली तर सरहद्दीवर बांधलेली अजस्र तटबदी (मॅजिनो लाईन) ही फ्रेंचाना उठविली पाहिजे. फ्रेंच हे करणे अशक्य होते, हे हिटलर जाणून होता. तेव्हा मॅजिनो लाईन उभी आहे या कारणाने, जर्मनीला आपल्या सरहद्दीवर अशीच एखादी तटबंदी उभी करणे भाग पडणार, याची जाणीव या सूचनेत होती. या सूचना वाचून कुणालाही प्रश्न पडला असता की, १९१४च्या युद्धात पराजय जर्मनीचा झाला होता की फ्रान्सचा !

या सूचना पाठोपाठ जर्मन वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केल्या. ब्रिटन व फ्रान्स दोघे या नव्या नेढ्यात अलगत अडकले. लंडनच्या ‘टाइम्स’ वत्तपत्राने या सूचनावर अग्रलेख लिहिला.

“A chance to rebuild”

[जर्मनांशी सबंध सुधारण्याची सुसंधी]

[अपूर्ण]


WITH

Best Compliments

FROM

M/s SANDOW TRADERS

Examiner Press Building

117, Medows Street, Fort,

BOMBAY No. 1

# सवलतीच्या दोन आकर्षक योजना



## राजा शिवछत्रपती

भाग एक ते दहा

लेखक : ब. मो. पुरंदरे

तिसऱ्या सचित्र आणि डी लक्स

आवृत्तीच्या छपाईस प्रारंभ.

प्रसिद्धी : डिसेंबर १९६४

दीड हजार पृष्ठांच्या ज्या साधार पण ललितरम्य शिवचरित्राने मराठी वाचकाला आजवर एक अपूर्व मोहिनी घातली,

जो ग्रंथ प्रत्येक मराठी भाषिकाच्या घरी असावा यासाठी आचार्य अत्रे, पु. ल. देशपांडे यांच्यासारखी अव्वल आणि मातब्बर मंडळी लेखद्वारा, पत्रद्वारा, संभाषणातून वा भाषणातून आपला अमोल शब्द वेचीत आहेत,

तो हा ग्रंथ सर्वसामान्य परिस्थितीतील मराठी माणसाला विकत घेऊन संग्रही ठेवता यावा म्हणून –**राजहंस प्रकाशन संस्था**

सवलतीच्या पुढील दोन योजना जाहीर करीत आहे.

**१ : राजहंस प्रकाशन संस्थेकडे पांच वर्षांसाठी शंभर रुपयांची ठेव ठेवणारास हे संपूर्ण शिवचरित्र व्याजाच्या मोबदल्यांत विनामूल्य घरपोच दिले जाईल. पांच वर्षानंतर ठेव परत करण्यात येईल. यासंबंधी अधिक तपशील हवा असल्यास पत्रकाची मागणी संस्थेकडे करावी.**

**२ : या तृतीय आवृत्तीच्या संपूर्ण शिवचरित्र संचाची किंमत प्रसिद्धीनंतर रुपये पसतीस राहील. १ ऑक्टोबर १९६४ पर्यंत रुपये पंचवीस फक्त पाठवून प्रसिद्धिपूर्व ग्राहक होता येईल.**

**[ संच पोस्टाने हवा असेल तर रजि. पोस्टखर्चासाठी अडीच रुपये अधिक पाठविणे. ]**

ठेवीची वा प्रसिद्धिपूर्व ग्राहकाची रक्कम ' राजहंस प्रकाशन ' या नावे ड्राफ्टने वा म. ऑ. ने पाठवावी. सोबत नाव, गाव, पत्ता संपूर्ण असावा.

चेक असल्यास शक्यतो पुणे-मुंबई येथील बँकेवरचा पाठवावा. इतर ठिकाणच्या बँकेवरचा चेक असल्यास वटणावळ ७५ न. पै. अधिक पाठवावेत.

चित्रकार दीनानाथ दलालांची शंभरहून अधिक रेखाचित्रे व आकर्षक मुखपृष्ठे, ऐतिहासिक स्थळांची व व्यक्तींची छायाचित्रे, पांढरा शुभ्र कागद, मोहरेदार छपाई, टिकाऊ बांधणी–या व इतर वैशिष्ट्यांनी युक्त असल्याने, एका सुबक पेटीतून वाचकांच्या भेटीस येणारा हा संच म्हणजे प्रत्येक कुटुंबाचे, प्रत्येक ग्रंथालयाचे एक भूषणच ठरणार आहे.

## राजहंस प्रकाशन, ४१९ नारायण, पुणे २

# जेव्हा ‘ बाबीयार ’ प्रसिद्ध होते.....



हिटलरकालीन जर्मनी ज्यू-द्वेषाने पेटला होता हे कृत्य तर सर्वमान्यच आहे. पण साम्यवादी रशियातहि ज्यू द्वेषाचे वातावरण स्तालिनकालापासून अस्तित्वात होते हे सत्यही आता हळूहळू प्रकाशात येऊ लागलेले आहे. किंबहुना नव्या राजवटीत कुश्चेव्हने स्तालिनशाही जरी मोडून काढली असली तरी ज्यू-जमातीविषयीच्या जुन्या पूर्वग्रहांपासून कुश्चेव्हहि मुक्त झालेले दिसत नाहीत. रशियात साम्यवाद आला तरी लाचलुचपत, काळाबाजार इत्यादि समाजद्रोही कृत्यांना अद्याप तेथे हवा तसा पायबंद बसलेला नाही व अशा समाजद्रोही कृत्यांत बराचसा वाटा ज्यू-जमातीचा असल्याने रशियात ज्यू-द्वेष आहे, असे कुश्चेव्ह राजवटीच्या समर्थकांचे म्हणणे आहे. पण सर्वसामान्य जनतेला राज्यकर्त्यांचा हा दृष्टिकोन मान्य नसावा असे एवटुशेंकोच्या ‘ बाबीयार ’ या कवितेच्या उदाहरणावरून सहज ध्यानात येते.

एवटुशेंको हा रशियात कुश्चेव्हकालात घेऊन आलेल्या नव्या वाङमयीन उत्थानाचे प्रतिनिधित्व करणारा एक तरुण कवी आहे. याच्या काव्यवाचनाचे कार्यक्रम रशियात अत्यंत लोकप्रिय असून स्टेडियम्स, पॉलिटेक्निक्समध्ये लाखोंच्या संख्येने रशियन जनता या कार्यक्रमाला गर्दी करीत असते. स्तालीन-विरोधाच्या याच्या कविता प्रकाशित होण्यास अडथळा होऊ लागला तेव्हा स्वत: कुश्चेव्हने जातीने हस्तक्षेप करून त्याची ‘ स्तालिनचे वारसदार ’ ही कविता ‘ प्रवदा ’ मध्ये प्रसिद्ध करून आणली. पण ‘ बाबीयार ’ या कवितेबाबत मात्र कुश्चेव्हची प्रतिक्रिया नेमकी उलटी झाली. कारण या कवितेत ज्यू-बद्दल कवीने नि:संदिग्ध शब्दांत सहानुभूती व्यक्त केलेली आहे.

रशियात कीव्हपासून जवळच ‘ बाबीयार ’ म्हणून एक ठिकाण आहे. या ठिकाणी हजारो ज्यूंचे शिरकाण झाले होते; काहींच्या मते हे कृत्य जर्मनांचे तर काहीजण स्तालिनलाच याबाबत दोषी धरतात. या ठिकाणाला एवटुशेंकोने भेट दिली तेव्हा त्याचे अंत:करण भरून आले. आपण ज्यू-जमातीएवढे वृद्ध आहोत, आपणच कुसावर चढलो होतो, आपणच अॅना फ्रँक होतो– असे नानाविध आत्मसाक्षात्कार त्याला होऊ लागतात. आणि तेथे बळी गेलो ते आपणच अशी त्याची भावना होऊन जाते. आणि शेवटी तो जाहिर करतो,–

No Jewish blood runs among my blood
But I am as bitterly & hardly hated
By every antisemite
As if I were a Jew by this
I am a Russian.

या ‘ बाबीयार ’ कवितेच्या प्रसिद्धीच्या वेळी एवटुशेंकोला जो एक चमत्कारिक अनुभव आला त्याचे त्याने आपल्या नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आत्मचरित्रात मोठे सरस वर्णन केलेले आहे. या भागाचे हे रूपांतर श्री. रतनलाल भंडारी ‘ माणूस ’च्या वाचकांसाठी येथे सादर करीत आहेत. सं



लक्षावधी मंत्रमुग्ध श्रोत्यांसमोर... ...एवटुशिंको

"बरेच दिवस ज्यू-विरोधी प्रवृत्तीवर कविता लिहिण्याचे मनात घोळत होते. प्रत्यक्ष कीव्हला जाऊन 'बाबी यार' डोळ्याने पाहीपर्यंत माझ्या भावनेला आकार सापडत नव्हता. मॉस्कोला परत येताना दोन तासांच्या अवधीत मी ही कविता लिहिली. त्या दिवशी 'पॉलिटेकनिक' मध्ये माझे क्यूबावर व्याख्यान होते. क्षणभर व्याख्यान बाजूला ठेवून सर्वप्रथम मी 'बाबी यार' वाचून दाखविली. मी नेहमी काव्य-वाचन मनापासून करतो पण आज माझ्या मनात इतका कोलाहल माजला होता की, मी काव्याची प्रत माझ्या नजरेसमोर ठेवली होती. शेवटची ओळ वाचून मी कागद खाली ठेवला तेव्हा सर्वत्र स्मशान-शांतता पसरल्यासारखी वाटत होती. खाली मान घालून मी माझ्या हातातल्या प्रतीचा चुरगळा करीत होतो. त्या कागदाकडे पहाण्याची मला भीती वाटत होती. मी धडधडत्या अंतःकरणाने त्याच्याकडे पाहिले तेव्हा सर्व श्रोतृवृंद उभा राहिला होता. आणि क्षणार्धात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. दहा मिनिटे श्रोते टाळ्या वाजवीत होते. लोक व्यासपीठाकडे आले आणि अनेकांनी मला कडकडून आलिंगन दिले. माझे डोळे अश्रूंनी डबडबून आले होते. थोड्या वेळाने रुपेरी केसांचा एक वाकलेला म्हातारा काठी टेकीत टेकीत माझ्या जवळ आला आणि म्हणाला,

"एकोणिसशे पाचपासून पक्षाचा सदस्य आहे. मी तुझी सदस्यत्वासाठी शिफारस केली तर आवडेल का तुला ?"

पश्चात मी माझ्या "मीही कम्युनिस्ट" या कवितेवरचे परीक्षण वाचले होते. या परीक्षणात टीकाकाराने लिहिले होते की, सदस्यत्व देण्याबद्दलच्या सभेला मी स्वतः जर उपस्थित राहिलो, तर मीच स्वतः विरुद्ध मत देईन; इतके माझे अपराध अक्षम्य आहेत. या परीक्षणाचे नाव होते 'मी विरुद्ध'.

"तू जे क्यूबाबद्दल व 'बाबीयार' बद्दल बोललास ते सारे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे." म्हातारा बोलत होता. "दोन्हीही क्रांत्याच. आम्ही क्रांती केली तिचा विश्वासघात करण्यात आला. तरी अजून ती सुरू आहे. जिवंत आहे. पंधरा वर्षे स्टॅलीनच्या 'कॅम्प'मध्ये काढून आल्यावर आपले बोल्शेव्हिक कार्य सुरू असल्याचे पाहून समाधान वाटतेय बघ."

तसा मी हळूवार वृत्तीचा माणूस नाही, तरी सुद्धा त्यावेळी माझ्या डोळ्यांतून नकळत अश्रू वाहू लागले.

मी कविता घेऊन 'लिटररी गॅझेट'च्या कचेरीत गेलो. तेथे स्टाफमध्ये माझा एक मित्र कामाला आहे. त्याला ती वाचून दाखविली. कविता ऐकल्यावर तो घाईघाईने उठून शेजारच्या खोलीत गेला आणि त्याने आपल्या सहकाऱ्यांना जवळ जवळ ओढीतच तिथे आणले. पुन्हा मी कविता वाचून दाखविली. "तू मला या कवितेची एक प्रत देऊन ठेव. मला ती इतकी आवडली आहे की, माझ्या-

# एवटुशिंकोच्या आत्मचरित्रातील एक झलक

जवळ ती असावी असे मला वाटते. " माझा मित्र म्हणाला. इतरानी देखील प्रतीची मागणी केली.

" अरे पण बाबा, मी ही प्रसिद्धीसाठी घेऊन आलोय, याचा अर्थ काय समजावा मी ? "

त्या सर्वांनी थडपणे एकमेकाकडे पाहिले. कवितेच्या प्रसिद्धीची कल्पना तिळमात्र त्याच्या मनात आलेली नव्हती. त्यांच्यातील एक सह संपादक पुटपुटला, " अजून आमच्यातला पिसाट स्टॅलीन जिवंत आहे." त्याने माझ्याजवळच्या एकुलत्या एक प्रतीवर लिहिले, ' प्रेस '.

" आताच जाऊ नकोस." माझा मित्र म्हणाला; " अजून मुख्य संपादकाचा शिक्कामोर्तब व्हावयाचा आहे. कदाचित तुला काही प्रश्न विचारण्याची आवश्यकता त्यांना भासेल."

जवळ जवळ दोन तास मी अस्वस्थपणे बसून राहिलो. निरनिराळ्या विभागातले लोक येऊन दबलेल्या आवाजात मला प्रोत्साहन देत होते. टायपिस्टानी मला चॉकलेट्स दिली. एक म्हातारा जुळारी आत आला. त्याचे दोन्ही हात खिशात कोंबलेले होते. " पोरा, तूच का रे एवटुशेंको ? माझ्याशी एकदा हस्तांदोलन कर. मलाच तुझी कविता जुळवावयची आहे. फारच छान मसाला आहे बघ. " त्याने आपल्या लांब कोटातून दोन्ही हात बाहेर काढले. एका हातात व्होडकाची पावशेर बाटली होती आणि दुसऱ्या हातात एक काकडी होती. ते सर्व माझ्यापुढे ठेवीत तो पुन्हा म्हणाला, " ही तुझ्यासाठी आमच्या विभागाने खास भेट दिलीय. नाही म्हणू नकोस...आणि उगाच कपाळाला आठ्या चढवून बसू नकोस. मी तरुणपणी कामगाराच्या एका स्वयंसेवक दलात होतो. तेव्हा आम्ही ज्यूविरोधी दंगलीत त्याच्या बाजूने खंबीरपणे उभे राहात असू. कुठलाही सज्जन माणूस ज्यूविरोधी असू शकत नाही. "

म्हातारा बोलत होता आणि हळूहळू माझ्या छातीवर पडलेले दडपण नाहीसे होत होते.

शेवटीं एकदाचे मला संपादकांचे बोलावणे आले. मध्यम वयाचे हे गृहस्थ आपल्या जाड भुवयातून एखाद्या अनुभवी शेतकऱ्याच्या नजरेने मला न्याहाळीत होते. अनेक पावसाळे पाहिलेली ही नजर होती. तिच्यातून एक प्रकारची सहानुभूती ओसंडत होती.

" छान कविता आहे ही. " आपल्या अनुभवी दृष्टीने माझे मूल्यमापन करीत त्यानी उद्‌गार काढले.

माझ्या नेहमीच्या अनुभवावरून मी ओळखले की, या वाक्याने सुरवात, याचा अर्थ आपली कविता ' साभार परत ' केली जाणार हे नक्की.

" हिच्यातल्या भावना प्रामाणिक आहेत. खऱ्या आहेत. " त्याच सुरांत ते बोलत होते. मनातल्या मनात आपणाला नकार मिळणार हे मी निश्चित केले होते.

" आम्ही ही जरूर प्रसिद्ध करू. " सपादक म्हणाले त्याच्या नजरेतून एक प्रकारची चमक ओसंडत होती.

" मी कम्युनिस्ट आहे. " ते म्हणाले, " नीट ध्यानात घे हे. मी हाडाचा कम्युनिस्ट आहे. तुझी कविता प्रसिद्ध करायला मला नकार देता येत नाही ... पण लक्षात ठेव ... काहीही घडेल. मला वाटते तू त्याला तोंड द्यावयास तयार असशील. "

" हूं ! " मी मारलेल्या मनाने रुकार दिला.

" प्रती बाहेर पडेपर्यंत थांबणार असशील ना ? "

" होय. " मी म्हणालो. मी परत उपसंपादकाच्या खोलीत जाऊन बसलो. सर्वसाधारणतः सायकाळी सात वाजता पेपर पूर्ण झालेला असतो. आपले काम संपले तरी अनेक जण मागे रेंगाळले होते. सातचे टोल पडले, परतु अद्यापही सपादकानी काम पुढे सुरू करण्याची आज्ञा पाठविली नव्हती. आठ वाजता ... संपादकांनी आपल्या पत्नीला व मुलीला आणण्यासाठी आपली गाडी घरी पाठविली नऊ वाजले ... छपाईखात्यात प्रमुख असलेली एक नाजूक पोरगी माझ्याजवळ आली आणि काही एक न बोलता तिने माझ्यासमोर कच्ची प्रत (proof) ठेवली. त्यानी सर्व मजकूर तयार केला होता. फक्त माझ्या कवितेसाठी राखून ठेवलेली जागा मोकळी होती. दहाचा ठोका पडला. ... म्हाताऱ्या जुळाऱ्याने पुन्हा पावशेरी व्होडकाची बाटली बाहेर काढली. आम्ही थोड्याच वेळात पुन्हा तिचा फडशा पाडला. अकरा वाजले ... एकदाच्या प्रमुख सपादकांच्या पत्नी आल्या. साडे अकरा वाजता संपादकानी मला बोलावले.

" मी तुमच्याबरोबर येते. " फोरमन मुलगी गभीरपणे म्हणाली, " जर काही गडबड झाली तर ? ... तर मी सांगेन की आता ले-आऊट बदलणे शक्य नाही म्हणून. ... पुरुषाना तोंड देण्याची मला भारी भीती वाटते. "

आम्ही आत गेलो. सपादक आणि त्याच्या पत्नी प्रुफाकडे नजर टाकून जाण्याच्या तयारीत उभे होते. माझ्या थकलेल्या चेहऱ्याकडे बघून त्या दोघांनी मंद स्मित केलें.

शेवटचा हात फिरवून झाल्याचे पाहून फोरमनने घाईघाईने प्रुफे गोळा केली आणि क्षणार्धांत ती दिसेनाशी झाली.

" माझ्या पत्नीचा सल्ला घेण्याचे मी ठरविले होते. " सपादक म्हणाले, " मी नेहमीच तिच्यावर अवलबून असतो. तिने रुकार दिला आहे हे तुझ्या लक्षात आलेच असेल... आता तू जाऊन प्रेसमधून बाहेर पडणारी तुझी कविता पाहून घे. " मुख्य सपादक म्हणाले.

मी खाली छपाईखात्यात गेलो. तेथल्या कामगारानी माझे अभिनंदन केले. फोरमनने खूण केली आणि छपाईचे यंत्र फिरू लागले. इतक्यात कुठेतरी काहीतरी पिचल्यासारखा घरघर आवाज करीत मशीन थांबले. मशीन थांबल्याबरोबर एखादा धक्का बसावा तसा मी गागरून गेलो. तेवढ्यात म्हाताऱ्या जुळाऱ्याने माझ्या पाठीवर थोपटीत म्हटले, "क्षणभर दम काढ ... सगळं व्यवस्थित आहे "

पुन्हा मशीन पूर्ववत फिरू लागले आणि पहिली प्रत झर्‌कन येऊन माझ्या पायाजवळ पडली. म्हाताऱ्याने माझे दड दाबीत म्हटले, " उद्यापासून तुझ्याभोवती ते जाळ विणू लागतील. तुझा मागोवा घेतील ... जपून राहा. "

आम्ही प्रत्येकजण एकमेकाला कडकडून भेटलो. आम्ही सर्वांनीच मिळून कविता लिहिली आहे असे मला वाटत होते. मी आणि माझा मित्र माझ्या जुन्या मोटारीत जाऊन बसलो. गमतीची गोष्ट अशी की, कोणीतरी सीटवर फ्रेंच दारूची बाटली आधीच ठेवलेली होती. माझा मित्र परत ऑफिसमध्ये गेला आणि संपादकाची लांबलचक कात्री घेऊन आला. तिच्या साहाय्याने

आम्ही बाटलीचे बूच काढले ... गाडीतच तिचा यथेच्छ समाचार घेतला. आम्ही घरी पोहोचलो तेव्हा मध्यरात्रीचा एक वाजला होता.

दुसऱ्या दिवशी थोडयाच अवधित " लिटररी गॅझेट "च्या सर्व प्रती विकल्या गेल्या. दुपारपर्यंत अनोळखी माणसांकडून माझ्या अभिनंदनाच्या तारा यावयास सुरवात झाली. पण जगात सगळीकडेच आनंद पसरलेला असतो असे नाही. चार दिवसांनी " लिटरेचर अँड लाईफ " या पत्रिकेने मला उत्तर देणारी अॅलेक्सी मार्कोव्ह यांची कविता प्रसिद्ध केली. तीत माझे वर्णन ' स्वतःच्या जनतेला विसरलेला खुजा (pigmy) असे केले होते. पुढे दोन दिवसांनी प्रसिद्ध झालेल्या माझ्यावरील टीकालेखात ' मी लेनिनची आंतरराष्ट्रीय तत्वे पायदळी तुडवून राष्ट्रीय विद्वेषांची भावना पसरविल्याचा ' माझ्यावर आरोप करण्यात आला होता.

असला भयंकर आणि विचित्र आरोप माझ्यावर केला जाईल याची मला काडीचीही कल्पना नव्हती. परंतु लेखकांचे वेडेवाकडे आरोप आणि मानभावीपणा त्यांचेच बुद्धिदारिद्र्य प्रदर्शित करीत होता.

देशाच्या कानाकोपऱ्यातून माझ्यावर पत्रांचा पाऊस पडत होता. एके दिवशी सकाळी जवळजवळ सात फूट उंचीचे, दोघेजण मला भेटायला आले. त्यांनी आपल्या दंडावर 'मास्टर ऑफ स्पोर्टस्' च्या फिती बांधलेल्या होत्या. त्यांनी मला सांगितले की, कॉमसोमॉल संघटनेकडून माझे संरक्षक म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. " पण कुणापासून ? " मी अचंबित होऊन त्यांना विचारले. ते दोघे थोडावेळ घुटमळले. त्यांच्याकडून मला कळले, की माझ्या कवितेचे जनतेने हार्दिक स्वागत केलेले असले तरी आपण अजून संपूर्ण समाजसत्तावाद स्थापन केलेला नसल्यामुळे आपल्या आजूबाजूला अनेक अक्करमाशे अस्तित्वात आहेत असे संघटनेचे मत आहे. बरेच दिवस ते दोघे माझ्या पावलावर पाऊल टाकून वावरत होते. त्यांच्याशी बोलल्यानंतर मला कळले की, त्या दोघांना काव्याचा फारच थोडा गंध होता. त्यांच्या दुसऱ्याच गुणाखातर त्यांची खास नेमणूक करण्यात आलेली होती. त्यापैकीं एकजण मुष्टियोद्धा होता आणि दुसरा कसलेला पहिलवान होता.

हा सगळाच प्रकार हास्यास्पद असला तरी त्यामुळे मी भारावून गेलो होतो.

निश्चितच मला कोणाहीपासून भीती नव्हती. ' बाबी यार ' बद्दल मला आलेल्या सुमारे वीस हजार पत्रांपैकी तीसचाळीस पत्रांमध्येच फक्त धमकीवजा भाषा वापरलेली होती. अर्थातच ही पत्रेही घाणेरडया हस्ताक्षरात लिहिलेली होती. खरे पाहिले तर आमच्या देशात या ' अक्करमाशां ' नाच खरा धोका होता. माझ्यापेक्षा मार्कोव्हलाच भीती वाटावी अशी अवस्था आहे. सध्यातर त्यांच्या चेहऱ्याच्या आकारात काही बदल होण्याची शक्यता असल्याची सभासंयोजकांनी सूचना दिल्यावरून सार्वजनिक ठिकाणीं जाण्याचेच त्यांनी टाकून दिले.

पाश्चिमात्य वृत्तपत्रांनी ' बाबी यार ' वर झालेल्या टीकेचे भलतेच भांडवल करून रशियात ज्यू-विरोध जिवंत असल्याचा जावईशोध लावला आहे. त्यापैकी अनेकांनी आपल्या हेतूच्या पूर्तीसाठी माझ्या कवितेचा लाजिरवाणेपणे विपर्यास केला आहे. परंतु माझ्या दृष्टीने एकदोन दुरभिमान्यांशिवाय बाकीच्या रशियन जनतेने केलेले या कवितेचे स्वागतच ज्यास्त बहुमोल आहे. या अडचणीच्या वेळी मला पाठिंबा देणाऱ्यांमध्ये कामगार, सहकारी शेतकरी, बुद्धिवादी आणि विद्यार्थी असे सर्व प्रकारचे लोक होते. मी क्यूबाला प्रयाण करण्यापूर्वी मॉयकोव्हस्की चौकात काव्यवाचन केले त्यावेळी जवळजवळ दहा हजार जनसमुदाय हजर होता. आणि माझ्या दृष्टीने या जनतेने मला दिलेला हा निरोप हीच माझी सर्वश्रेष्ठ संपत्ती आहे.

मी माझी ' स्टॅलीनचे वारसदार ' ही कविता लिहून सार्वजनिक स्थळी तिचे वाचन करण्यास सुरवात केली तेव्हा कोणीतरी ही कविता सोव्हिएटविरोधी असल्याची अफवा पसरविली. वास्तविक हे विशेषण त्यांनाच जास्त लागू होत होते. परंतु माणसाला आपलीच प्रतिबिंबे सर्वत्र दिसत असतात. संपादक ही कविता प्रसिद्ध करण्यास कचरत होते; पण या कवितेचे जाहीर वाचन करण्यापासून कोणीही मला परावृत्त करून शकले नाही. मी जेथे जेथे जाई तिथे तिथे या कवितेच्या वाचनाची मागणी श्रोते करीत होते. जवळजवळ वर्षभर ही कविता प्रसिद्धीवाचून पडून राहिली होती. तरी मी कुढत बसलो नाही. असे काहीतरी होईल याची जाणीव मला होती.

मी ही कविता सरळ क्रुश्चेव्हकडे पाठवून दिली आणि मग ती ' प्रवदा ' मध्ये प्रसिद्ध झाली. रूढिवाद्यांमधली अस्वस्थता दिवसेदिवस वाढतच होती. त्यांच्यापैकी अनेकांना धक्का देणारी आणखी एक घटना याच सुमारास घडली. क्रुश्चेव्हच्या सरळ हस्तक्षेपाने सेल्जानिस्टायची 'एक दिवस...'ही वैशिटचपूर्ण कादंबरी प्रसिद्ध झाली.

आपल्या समाजात सुरू झालेला लोकशाहीचा हा प्रवाह थांबविण्याची कुठलीही संधी रूढिवादी दवडणार नाहीत हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. त्याचा हा विरोध असाच सतत चालू राहील.

मला या बाबतीत कसलाही मोहक भ्रम नाही.

आता रूढिवाद्यांनी आपली जागा भरून काढण्यासाठी नवीन तरुणांना प्रोत्साहन देण्याचाही चंग बांधलेला आहे. आणि हे असे तरुण हाच आजचा सर्वात मोठा अंतर्गत धोका आहे. आमच्या पुरोगामी तरुणांच्या मानाने हे लोक अतिशय अल्प आहेत आणि त्यांच्या विजयावर माझा विश्वासही नाही.

● ● ●



राजकन्या मलाया आणि तिची सखी



कु. रोहिणी ओक आणि कु. मीना जोशी



# मंतरलेले पाणी

## बालांसाठी मद्रासी करमणूक ! !

बालांसाठी नाटके लिहून ती सादर करणे ही गोष्ट अत्यंत कष्टप्रद. तीसचाळीस मुलामुलींची ज्याच्यात कामे आहेत असा प्रयोग सादर करणे म्हणजे 'आवळ्यांची मोट' बांधणेच होय. एवढ्या मोठ्या संख्येने मुलामुलींना व त्यांच्या पालकांना जिंकून 'सोशल क्लब', पुणें यांच्या 'बालरंगभूमी' या शाखेने ही 'आवळ्याची मोट' बांधली आहे. गेले तीनचार महिने बालकांना मंत्रवण्यासाठी बालरंगभूमीचे हे कार्यकर्ते अविरत झटत होते.

बालांसाठी कथा निवडून ती सुबोध नाटचरूपांत बांधणे ही गोष्ट वर वर पहाता जितकी सोपी तितकीच ती प्रत्यक्षात अवघड. बालांसाठी लिहिणारे म्हणून जी काही नावे आहेत ती हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढीच आहेत, यावरून त्याची कल्पना सहज करतां येईल.

श्री. कृष्णदेव मुळगुंद या अत्यंत खटपटी लेखकाने हे 'मंतरलेले पाणी' तयार केले आहे.

एक असते राजकन्या. तिला नेहमी वाटत असते की, आपल्या बरोबरीच्या मुलांत खेळावे, बागडावे. पण तिला तसे खळू बागडूं दिले जात नाही. इतकेच नव्हे तर तिच्या राजमंदिराशेजारी इतर कुठल्याही मुलांना फिरकूसुद्धा दिले जात नाहीं. असे कां केले जाते ? तर त्या राजाचा जो प्रधान असतो तो असतो स्वार्थी. त्याला वाटते की ही राजाची एकुलती एक कन्या आपल्या मुलाला मिळावी......पण त्याचा मुलगा असतो वेडा. तो शहाणा होण्यासाठी त्याच राज्यात असलेल्या, 'मंतरलेल्या पाण्या'च्या विहिरीतील पाण्याची गरज असते. पण हे पाणी कसे आणि कोण आणणार ? म्हणून तो एक युक्ती योजतो. तो राजाकडून अशी दवंडी पिटवतो की, जो कोणी ते 'मंतरलेले पाणी' आणील त्याला मी माझी राजकन्या देईन......पण ते पाणी आणण्याचे धाडस कुणी करीत नाही. कारण ते पाणी आणायला गेलेला कुणी परत जिवंत येतच नाही. त्याच राज्यात असतो एक असाच उमदा आणि धाडसी तरुण. पूर्वी असतो तो राजपुत्र, पण राज्य गेल्याने आता झालेला असतो तो गरीब. तो सांगतो की, मी आणीन पाणी. राजाचा तो स्वार्थी प्रधान विचार करतो की, आपणही जावे याच्या पाठोपाठ. याने पाणी आणले की, त्याला मारून मंतरलेले पाणी त्याच्याकडून घ्यावे आपण काढून, म्हणजे आपला वेडा मुलगाही शहाणा होईल आणि त्याला राजकन्याही मिळेल. पण अखेर प्रधानाचे सारेच बेत फसतात आणि त्या उमद्या तरुणाला ती राजकन्या अखेर मिळते.

ही कथा अशी असावी असे आम्हांस वाटते. प्रत्यक्षात प्रधानाने मंतरलेले पाणी आणण्याचा डाव सुरवातीपासूनच रचला होता हे मुलांना उमगत नाही. कारण संबंध पहिला अंक या पाण्याचा उल्लेख नाही. प्रधान दुष्ट आहे एवढेच फक्त या अंकात कळते. या दृष्टीने नाटकाचा पहिला अंक हा नाटकात पुरेसा एकरूप झालेला वाटत नाही.

श्री. मुळगुंदांनी ही कथा अत्यंत सुबोध रीतीने मांडली आहे. मुलांना आवडणारे वीर, अद्भुत आणि करुण रसाचा परिपोष उत्तम केला आहे. पण त्यांनी केलेली संवादाची काहीशी अनुप्रासयुक्त घडण खटकते. संवादांमध्ये एक तऱ्हेची लय अवश्य हवी पण केवळ

शब्दांच्या कोलांटचा नसाव्यात. संवादाच्या दृष्टीने पाहिल्यास, एकाच लयीत चाललेले हे नाटक थोडे खटकते आणि वाटते की, सरळ सोपी वाक्यरचना हवी होती. आशय लक्षात ठेवून वाक्य पाठ करणे मुलांना थोडे कठीण. लयबद्ध रचना त्यांचे लक्षात चटकन् राहते. तरीही अशी रचना वैशिष्टचापेक्षा मर्यादेचीच जास्त जाणीव करून देते. शिवाय अनुप्रासाच्या मागे लागून ... मी नाही ' भित्रा मला भितो कोल्हा कुत्रा' असे हास्यास्पद अनुप्रास नाटकात घुसतात. या दृष्टीने विचार केल्यास राजा, प्रधान, राक्षस अशा मोठ्या पात्रांच्या तोंडी घातलेली वाक्यरचना बाळबोध व क्वचित् चांगल्या अनुप्रासांसाठी काव्यात्मक केल्यास नाटक जास्त उठले नाही तरी घसरणार नाही.

या नाटकाच्या बांधणीत हे नाटक मुलांसाठी आहे, हा विचार अनेक ठिकाणी सुटला आहे. बाप सज्जन असताना, राजकन्येने प्रियकराला खिडकीतून बोलावणे, प्रेमाचे स्वप्न दाखवताना 'प्रदीपकुमार' प्रमाणे नायकाने पऱ्यांमधून फिरणे व 'झोपलेल्या बाईला उठवण्यातील मजा' रंगभूमीवर साभिनय दाखवणे या गोष्टी नाटक मुलांसाठी असेल तर निश्चित खटकणाऱ्या आहेत. आमच्या शेजारी बसलेल्या एका सुशिक्षित स्त्री-पालकाने मध्येच उद्गार काढले, " हे नाटक मुलांपेक्षा मोठ्या माणसांनाच जास्त आवडेल बाई ! " यावर अधिक सांगणे नलगे. हे सर्व घोटाळे आपण नेमके किती वयाच्या मुलांसाठी नाटक सादर करीत आहोत याचे मोजमाप न केल्यामुळे झाले आहेत.

तसेच नायकाचे आजोबा " पोरा कुठे रे गेलास ? " म्हणून उपाशीपोटी टाहो फोडीत असताना नायकाने राजकन्या मिळविण्यासाठी टुणकन् उडी मारून जाणे हे पहाणेही खटकते. हे दाखवण्यात परिणामाचा विचार सुटला आहे ! याचे काय करायचे याचा विचार नाटककाराने करावा. कारण कथानकाला फक्त ' नागीण ' छाप प्रेमप्रकरणाची अवकळा येऊ नये !


वरील गोष्टी जमेस धरल्या, तरी एकूण नाटकाचा प्रयोग अप्रतिम होतो. दिग्दर्शक वसंत दाते यांनी घेतलेली मेहेनत क्षणोक्षणी जाणवते. नायकाचे स्वप्न दाखविण्यासाठी तयार केलेला सेट आणि सजावट पाहून लहानाप्रमाणे मोठेही मंत्रमुग्ध होऊन जातात. सौ. मंगला मुळगुंद यांनी बसविलेली नृत्येही डोळ्यांत भरतात. त्याप्रमाणेच मनोहर केतकर यांनी चढविलेला संगीताचा साजही तितकाच उल्लेखनीय आहे. श्री. दाते, केतकर आणि श्री. व सौ. मुळगुंद यांनी हा प्रयोग बसविण्यास किती कष्ट घेतले आहेत याची कल्पना प्रत्यक्ष प्रयोग पाहिल्यासच यथार्थतेने येईल. उल्लेखच करावयाचा झाल्यास या नाटकाच्या ड्रेपरीसंबंधाने करता येईल. श्री. मुळगुंद यांनी अत्यंत क्षुल्लक आणि टाकाऊ वस्तूंचा अत्यंत कल्पकतेने केलेला उपयोग पाहून त्यांच्या चिकाटीची आणि कल्पकतेची साक्ष पटते.

या नाटकात असलेली मोठी माणसे तर कामे चांगली करतातच. पण विशेष कौतुक करायला हवे ते कांही बाल कलाकारांचे ! राजकन्या मलायाचे काम करणारी कु. मीना जोशी आणि तिच्या सखीचे–झुलारीचे काम करणारी कु. रोहिणी ओक यांच्या भूमिका अप्रतिम झाल्या आहेत. उमरेद, आणि वेडा वरंग यांची कामे करणारे अनुक्रमे शरद साठे आणि विजय जोशी हेही नजरेत भरतात. नृत्यांत असलेल्या अनेक मुलींनीही अप्रतिम कामे बजावली आहेत.

नाटक पाहायला आलेला बालप्रेक्षक दुसऱ्या अंकापासून नाटक उचलू लागतो. टाळ्या पिटून प्रयोगाची पावती देऊ लागतो.

मुंबईत बालप्रेक्षकांसाठी नाटके सादर करणाऱ्या दोन-तीन नामवंत संस्था आहेत. पुण्यांत अशा तऱ्हेची नाव घेण्यासारखी संस्था नव्हती सोशल क्लबने ' बालरंगभूमी ' कार्यवाहीत आणून पुण्याच्या बालगोपालांची सोय केली आहे. उत्तरोत्तर प्रगतीचे टप्पे ती गाठीत जाईल एवढा विश्वास हे ' मंतरलेले पाणी ' पाहून वाटतो. या मंतरलेल्या पाण्यांतले काही 'मंत्र' मागेपुढे झाले असले तरी तंत्र मात्र ' बालरंगभूमी'च्या चालकांना बरोबर सापडले आहे यात शंका नाही. आगे बढो ! !

—श्रीकृष्ण पोंक्षे




तुमच्याकडे लिपस्टिक आहे का ?



गुलजार-चित्र

# श्रीमान बाळासाहेब

## गारठलेला भुईनळा

यांची बस आता चुकलेली दिसते

थोडा वेळ चमकून नाहीसे होणे, हा लखलखणाऱ्या विजेचा गुणधर्म असला, तरी नटांनी तो उचलणे चांगले नाही. मराठी चित्रपटातील विनोदी वीरांत राजा गोसावी यांनी बऱ्यापैकी खुर्ची मिळवली होती. दामूअण्णा मालवणकरांपेक्षा किंचित उजवा व मा. विनायकांच्या किंचित जवळपास येणारा अभिनय ही राजा गोसावींची कमाई होती. परंतु काही काही नटांचा पुरेपूर उपयोग करणारा योजकच अखेरपर्यंत लाभत नाही असे दिसते. राजा गोसावी हे असेच कमनशिबी दिसतात, असे त्यांच्या प्रमुख भूमिकेवर घेतलेला 'श्रीमान बाळासाहेब' हा अलीकडील चित्रपट पाहून वाटले. पहिली गोष्ट राजा गोसावी आता वयाच्या दृष्टीने उताराकडे झुकलेले जाणवतात व अभिनयाच्या बाबतीतही त्यांची समज अजून आहे तियेच आहे हे लक्षात येते. त्यांची बस आता निश्चित चुकलेली दिसते.

**'वैभव' ची आठवण**

'श्रीमान बाळासाहेब' या चित्रपटाची कथा श्री. राम केळकर यांची आहे. 'वैभव' चित्रपटाची कथा यांचीच होती. 'वैभव'च्या परीक्षणाचे वेळी आम्ही लिहिले होते —

"राम केळकर यांची कथा, म्हणजे कथानकाचा सांगाडा बऱ्यापैकी आहे. (तसा बऱ्याच मराठी चित्रपटांच्या मूळ कथा बऱ्या असतात.) पण 'पटकथा' नावाची जी चीज आहे तीत मात्र अलीकडचे नवे पटकथाकार नेहमी गोता खातात. फालतू कथानकावरचे हिंदी चित्रपट चांगले वाटतात, यशस्वी होतात आणि चांगल्या कथेवर आधारित असूनही मराठी चित्रपट साफ कोसळतात (कला आणि धंदा या दोन्ही दृष्टींनी). याचे एक प्रमुख कारण या पटकथांतील दोषात आहे. सुसूत्र व सुसंबद्ध मांडणी, ओघवती लय आणि त्या लयीत उलगडत जाणारे कथानक यांपैकी कोणताच गुण मराठी पटकथात आढळत नाही. त्यामुळे त्या पटकथा म्हणजे वेगवेगळ्या प्रसंगांची एक गोधडी एवढेच त्यांचे स्वरूप बनते. आधीचा प्रसंग लिहिताना हे लोक पुढच्या प्रसंगांचा विचार करीत नाहीत आणि पुढचा लिहिताना मागचा विसरून जातात की काय अशी शंका येऊ लागते. श्री. राम केळकर यांच्याजवळ चांगल कथानक आणि संघर्ष सुचण्याची शक्ती आहे."

'माणस,' एप्रिल १९६३

या चित्रपटालाही हे सर्व तंतोतंत लागू आहे. जहागिरदार कुटुंबात एकुलता एक मुलगा. तसा, वयातील प्रेमभंगामुळे वेडा व्हावा व त्याच्या पायी त्याच्या आईवडिलांची फरफट व्हावी, हा कथाविषय बऱ्याच अपेक्षा उंचावणारा आहे. त्यातल्या त्यात सर्व जगाने वेडा ठरवल्यानंतर, तो सुधारेल या आशेपायी तळमळणारी आई, आजच्या बिटनिक् युगातहि या घरात एक सापडेल. या मुलाला (राजा गोसावी) सुधारण्यासाठी 'तसा' स्त्रीसहवास आवश्यक आहे असे मत डॉक्टर (राजा नेने) देतात. मग जहागिरदार (साळवी) व त्यांची पत्नी (सुमति गुप्ते) या नव्या आशेने पालवतात. वेड्या मुलाला मुलगी मिळवणे किती कठीण हे त्यांच्या लक्षात येते. परंतु हा प्रश्न डॉक्टरच सोडवतात. एका कलावंतिणीची मुलगी (वंदना) ही लग्नासाठी आतुर असते. आईच्या धंद्याचा तिला वीट आलेला असतो. जहागिरदाराच्या

घरात जाऊन राहण्याची कामगिरी डॉक्टराच्या सल्ल्यावरून ती उचलते. श्रीमान बाळासाहेबाना ही मात्रा लागू पडते. व निराळाच प्रश्न उपस्थित होतो. आपली भावी सून कलावंतिणीची मुलगी आहे हे आई-वडिलांना मंजूर नसते. म्हणजे थोडा वेळ वडिलांना मंजूर नसते– थोडा वेळ आईला मजूर नसते. साधारणपणे चारपाच हजार फूट फिल्म गिळकृत झाल्यावर डॉक्टर त्याची समजूत काढतात आणि मग ! वाजवा रे वाजवा !

### कलात्मक श्रेयफलक

या कथानकातील बाळासाहेब ज्या प्रेमप्रकरणामुळे वेडे होतात तो भाग श्रेयफलकातच रेखाटने देऊन सांगितला आहे. हे अत्यत कलात्मकतेने केले आहे. परंतु शेपटचाला अडकवलेल्या रिबिनीसारख्या टायटल्स उगाचच असतात अशा समजुतीने प्रेक्षक या रेखाटनाकडे फारसा कुतुहलाने पहात नसावा ! ज्या अर्थी एक महत्त्वाचे प्रेमप्रकरण श्रेयनामावलीतच सागून टाकले त्या अर्थी चित्रपटात पुष्कळच काही सांगावयाचे असावे असे वाटू लागते. चित्रपट संपला तेव्हा लक्षात आले, की पहिला भाग चट्कन उडवला तो केवळ काटकसर असावी, कारण पुढचे चित्रण नेहमीप्रमाणे ठिसाळ, उगाचच लाववलेले निघाले.

वयात आलेल्या कलावंतिणीच्या मुलीने जर कुठेतरी वाजत असलेले सनईचे सूर ऐकताच, "आई, माझ्या आयुष्यात असा मंगलप्रसग कधी ग येईल ?" असे बडबडायला सुरवात केली तर ही मुलगीही वेडसर असावी असे प्रेक्षकास वाटल्यास काय चूक ? लग्न करावेसे वाटते म्हणून डॉक्टरकाका सागतात त्या घरी जाऊन रहाण्याचे ही मुलगी मान्य करील ही दुसरी असभाव्य घटना. त्यातून या मुलीचे काम करणारी वदना... याचा असा गैरसमज की, आपण 'रामजोशी'च्या बयाबाईचेच काम करीत आहोत ! पाण्यासाठी जाताना, घरात वावरताना कसे चालायचे याचेही व्यवस्थित ज्ञान वा निर्देशन याना नाही.

समजून काम करण्याची उमेद धरली आहे ती साळवी आणि सुमतीबाई गुप्ते यांनी. बाळासाहेबांच्या आईवडिलाची कामे

## कथालेखकाचा अभिनेता

आज फिल्मी दुनिया व प्रेक्षकवर्ग नझीर हुसेन याना एक उत्कृष्ट चरित्र-अभिनेता म्हणून ओळखतो. आपल्या भारदस्त अभिनयाची त्यानी प्रेक्षकावर इतकी मोहिनी टाकली आहे, की त्याचा खरा पिंड चित्रपट कथालेखकाचा आहे हे सागून कोणालाही खरे सुद्धा वाटणार नाही.

पण होय, चित्रपटसृष्टीत त्यांचा प्रवेश झाला तो कथालेखनाच्या गुणामुळेच. चित्रपटव्यवसायात येण्यापूर्वी हुसेन हे सुभाषबाबूच्या आझाद हिंद सेनेत होते. तेथील सैनिकाच्या मनोरंजनासाठी ते नाटके लिहीत. आझाद हिंद सेनेतील आपल्या अनुभवावरून त्यानी 'सिपाही का सपना' नाटक लिहिले. आणि याच नाटकाने त्याना चित्रपटसृष्टीची दालने उघडी करून दिली.

न्यू थिएटर्स या मातबर चित्रसस्थेने हे त्याचे नाटक चित्रपटासाठी घेतले, व त्यावरून 'पहेला आदमी' हा चित्रपट निर्माण केला. या चित्रपटाचे संवाद व पटकथा नझीर हुसेन याचीच होती. शिवाय त्यानी या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकासुद्धा केली होती.

या चित्रपटामुळे हुसेन याना कथालेखक म्हणून प्रसिद्धी मिळाली नसली तरी नट म्हणून मात्र त्याचा चागलाच बोलबाला झाला. आणि मग हा कथालेखक प्रथमश्रेणीचा चरित्र-अभिनेता झाला.

*

## खरा संगीत–दिग्दर्शक

चित्रपटसृष्टीत असंख्य संगीत-दिग्दर्शक मध्येच धूमकेतूसारखे उगवतात. काही सिनेमांना उत्कृष्ट सगीत देऊन एकदम प्रसिद्धीच्या शिखरावर चढतात. आणि जसे अल्पकाळात चढले तसेच अल्पकाळात प्रसिद्धीच्या शिखरावरून ते कोलमडून पडतात; व मग त्याचे नाव ऐकू येईनासे होते.

पण सगीत-दिग्दर्शक सी. रामचंद्र यांनी मात्र आपली लोकप्रियता जवळवळ तीन तपे टिकवून धरली आहे. अजून तिने उच्चासनावर बैठक मारली आहे. सी रामचद्र याची लोकप्रियता अजूनही कायम आहे. सर्वसाधारणपणे हिंदी चित्रपटसृष्टीत आज आधी सगीत-दिग्दर्शक हा चाल तयार करून देतो व मग त्या चालीत बसणारे गाणे रचण्यास कवीला सांगतो.

पण सी. रामचंद्र या हाडाच्या सगीत-दिग्दर्शकाला ही गोष्ट साफ नामंजूर आहे. चालीत बसणारे गाणे लिहावयास सांगण्याने कवीच्या प्रतिभेवर मर्यादा येतात असे त्याचे ठाम मत आहे. आणि म्हणूनच आपल्या संगीत-दिग्दर्शनाखाली चित्रपटाला सगीत देताना ते आधी कवीस त्याच्या मनाप्रमाणे काव्य लिहिण्यास परवानगी देतात व मग त्या गाण्याला चाल लावतात.

हेच त्याचे वैशिष्टय ! आणि म्हणूनच तर कदाचित ते प्रसिद्धिशिखरावर अजून कायम आरूढ होऊन बसले नसतील ना ?

रमेश के. सहस्रबुद्धे

त्यांनी अत्यंत मेहनतीने उभी केली आहेत. परंतु बाळासाहेबांच्या जहागिरदार बापाला मुलीच्या बापाचे उंबरठे झिजवण्याचे अवास्तव प्रसंग चित्रपटात घुसडून दिग्दर्शकांनी साळवींना पेचात टाकले आहे.

राजा गोसावी यांनी श्रीमान बाळासाहेबांचे काम दिग्दर्शक सांगेल तेव्हा वेडच्यासारखे व सांगेल तेव्हा शहाण्यासारखे केले आहे. प्रेमभंगातून आलेल्या वेडसरपणाचे नेमके स्वरूप काय याची निश्चित कल्पना लेखक व दिग्दर्शकाजवळ नसल्यामुळे राजा गोसावींची पंचाईत झाली आहे. त्यामुळे वेडा मुलगा सुधारण्याच्या मार्गात असताना, जरीची टोपी घालून शेतात नेहमी नायक-नायिका धावपळ करून द्वंद्वगीत म्हणतात, तसे कांही करू लागला की हा विनोद आहे असे समजून प्रेक्षक हसतात ! करुणरस जेव्हा थोडा फार येतो तिथेही लोक हसतातच.


जाऊद्या. . . ढिसाळ आणि तर्कशून्य कथावांवणीची नेहमीचीच शोकांतिका इथेही आहे. तरीही हा चित्रपट शेवटपर्यंत पाहवतो याचे कारण राजा गोसावींचा विनोद व साळवी आणि सुमती गुप्ते यांची अभिनयातील समजूत.

गाणी फार नाहीत. आहेत दोन ती चांगली आहेत. ऐकायला ! पहायला नव्हे.

पेटवलेला भुईनळा गारठलेला असला की जसा तो फुसफुसतो, तसे चित्रपटगृहात हास्याचे फुसफुसणे चालू असते. बाहेर पडताना समाधान मात्र शून्य !

–महेश

● ● ●



## वास्तवता-निर्मितीचा खटाटोप

'कांचनगंगा' या नावाजलेल्या मराठी चित्रपटाचे चित्रीकरण चालले होते. या चित्रपटाचा नायक सूर्यकांत हा उषा किरणच्या तोंडात भडकावितो, या प्रसंगाचे चित्रीकरण चालले होते.

काम करताना भूमिकेच्या आवेशात तगडचा सूर्यकान्ताकडून नाजूक उषा किरणच्या तोंडात जोरात थप्पड बसण्याची शक्यता होती; म्हणून 'थप्पड हळूच मारू ना ?' असे त्याने उषा किरणला विचारले.

हळू थप्पड मारण्यासाठी चित्रीकरणाच्या वेळी त्याचा हात आखडणार व त्यामुळे भूमिकेतील सजीवता नष्ट होणार हे उषा किरणने जाणले, आणि भूमिकेला योग्य वाटेल तेवढचा जोरात थप्पड मारण्यास तिने त्याला सांगितले.

प्रत्यक्ष चित्रीकरणाचे वेळी भूमिकेच्या आवेशात एक जोरदार थप्पड त्याने उषा किरणच्या तोंडात खाडकन मारली ! बोलूनचालून तगडा गडी तो ! त्याच्या जोरदार थपडीमुळे उषा किरण भोवळ आल्यासारखी होऊन ती संवाद विसरली.

"माझ्या हातून चुकून जोराने थप्पड मारली गेली त्याबद्दल क्षमा असावी" असे सूर्यकान्ताने म्हणताच समजूतदार उषा किरण म्हणाली, "छे ऽऽ छे ऽ ! त्यात कसली आलीय माफी ! त्या प्रसंगात वास्तवता येण्यासाठी अशी जोरदार थप्पड आवश्यक होती आणि शिवाय मी तुम्हांला तशी परवानगी पण दिली होती.

**रमेश के. सहस्रबुद्धे**



–दुःखाची गोष्ट एवढीच की, शेवटी पतंग झाडावरच राहिला !

# माणूस

१५ सप्टेंबर १९६४



## या अंकांत

**कथा :**

व. मो. पुरंदरे

वसुधा पाटील

शरद् विनायक काळे

दि. बा. **मोकाशी यांची पहिलीवहिली** कविता

' नाझी भस्मासुराचा उदयास्त '

या लेखमालेचा पुढील हप्ता

चित्रपट, नाटक, क्रीडा, विनोद..................

इत्यादी नेहमीची लोकप्रिय सदरे आणि

एका ध्येयनिष्ठ आणि सेवाभावी

डॉक्टराची स्फूर्तिदायक मुखपृष्ठकथा

MANOOS MAGAZINE 1ST SEPTEMBER 1964 : FIFTY TWO PAISA R. N. B 9504

# त्यांसी माझा नमस्कारु

॥ श्रीराम ॥ ओंनमोजि गणनायका । सर्वसिद्धि फळदायका । अज्ञान भ्रांति
छेदका । बोधरूपा ॥ १ ॥ माझिये अंतरीं भरावें । सर्वकाळ वास्तव्य करावें ।
मज वाक्शून्यास वदवावें । कृपाकटाक्षेंकरूनी ॥ २ ॥ तुझिये कृपेचेनि बळें ।
वितुळती भ्रांतीची पडळें । आणी विश्वभक्षकें काळें । दास्यत्व कीजे ॥ ३ ॥
येतां कृपेची निज उडी । विघ्नें कांपती बापुडीं । होऊनि जाती देशधडी ।
नाममात्रें ॥ ४ ॥ म्हणोनि नामें विघ्नहर । आम्हा अनाथांचें माहेर ।
आदिकरूनी हरिहर । अमर वंदिती ॥ ५ ॥ वंदूनियां मंगळनिधघी । कार्य
करितां सर्वसिद्धी । आघात अड्थाळे उपाधी । बाधू सकेना ॥ ६ ॥ जयाचें
आठविता ध्यान । वाटे परम समाधान । नेत्रीं रिघोनियां मन । पांगुळें
सर्वांगीं ॥ ७ ॥ सगुणरूपाची ठेव । महालावण्य लाघव । नृत्य करितां
सकळ दवे । तटस्थ होती ॥ ८ ॥ सर्वकाळ मदोन्मत्त । सदा आनंदें डुल्लत ।
हरूषें निर्भर मुदित । सुप्रसन्नवदनु ॥ ९ ॥ मव्यरूप वितंड । भीममूर्ति महाप्रचंड ।
विस्तीर्ण मस्तकीं उदंड । सिधूर चर्चिला ॥ १० ॥ नाना सुगंध परिमळें ।
थबथबा गळती गंडस्थळें । तेथे आली षट्पद कुळें । झुंकारशब्दें ॥ ११ ॥ मुर्डींव
शुंडादंड सरळे । शोभे अभिनव आवाळें । लंबित अधर तिक्षण गळे । क्षणाक्षणा
मंदसत्वी ॥ १२ ॥ चौदा विद्यांचा गोसांवी । हरस्व लोचन ते हिलावी । लवलवित
फडकावी । फडै फडै कर्णथापा ॥ १३ ॥ रत्नखचित मुकुटीं झळाळ । नाना
सुरंग फांकती कीळ । कुंडलें तळपती नीळ । वरी जाडिले झमकता ॥ १४ ॥ दंत
शुभ्र सद्दट । रत्नखचित हेमकट्ट । तया तळवटीं पत्रें नीट । तळपती लघु
लघु ॥ १५ ॥ लवथवित मलपे दोंद । वेष्टित कट्ट नागबंद । क्षुद्र घंटिका
मंदमंद । वाजती झणत्कारें ॥ १६ ॥ चतुर्भुज लंबोदर । कासे कासिला पीतांबर ।
फडके दोंदिचा फणीवर । धुधुकार टाकी ॥ १७ ॥ डोलवी मस्तक जिव्हा
लाळी । घालुन बैसला वेंटाळी । उभारोनी नाभिकमळीं । टकमका पाहे ॥ १८ ॥
नाना-याति कुसुममाळा । व्याळपरियंत रुळती गळा । रत्नजाडित हृदयकमळा ।—
वरी पदक शोभे ॥ १९ ॥ शोभे फरश आणि कमळ । अंकुश तिक्षण तेजाळ ।
येके करीं मोदकगोळ । तयावरी अतिप्रीति ॥ २० ॥ नटनाट्य कळाकसरी ।
नाना छंदें नृत्य करी । टाळ मृदुंग भरोवरी । उपांग हुंभारे ॥ २१ ॥ स्थिरता
नाहीं येक क्षण । चपळविषयीं अग्रगण । साजिरी मूर्ति सुलक्षण । लावण्य-
खाणी ॥ २२ ॥ रुणझुणा वाजती नेपुरें । वांकी बोभाटती गजरें । घागरियासहित
मनोहरें । पाउलें दोनीं ॥ २३ ॥ ईश्वरसभेस आली शोभा । दिव्यांबरांची
फांकली प्रभा । साहित्यविषईं सुल्लभा । अष्टनायका होती ॥ २४ ॥ ऐसा
सर्वांगें सुंदरु । सकळ विद्यांचा आगरु । त्यासी माझा नमस्कारू । साष्टांग
भावें ॥ २५ ॥

*इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे ...*

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे मासिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रायव्हेट लि., ३८३ नारायण पेठ, पुणे, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **संपादक : श्री. ग. माजगावकर**